* यवतमाळ *
* वर्ष ३४ * अंक ६५ *
शनिवार, दिनांक ६ सप्टेंबर २०२५
किंमत रु. २/- + वितरण खर्च रु. १/-
एकूण किंमत रु. ३/-
Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in
मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com



# संबंध नव्या वळणावर; परंतु सावध!

**डोनाल्ड ट्रम्प यांनी लादलेल्या टॅरिफनंतर भारताविषयी चीनला आपुलकी वाटू लागली आहे. चीनला शह देण्यासाठी अमेरिका भारताला जवळ करत होती. आता अमेरिका आणि भारतातील संबंध बिघडत असल्याने चीनने मैत्रीचा हात पुढे केला असला, तरी पूर्वानुभव पाहता भारताला सावध पवित्रा घ्यावा लागेल. नरेंद्र मोदी यांनी शांघाय सहकार्य परिषदेप्रसंगी चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्या घेतलेल्या भेटीतून ते दिसले.**

विश्लेषण

प्रा. अशोक ढगे

चीनच्या तियानजिन शहरात दोन महासत्तांच्या नेत्यांची बैठक झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्यात द्विपक्षीय चर्चा झाली. मोदी यांनी चीनच्या दौऱ्याचे निमंत्रण आणि द्विपक्षीय बैठकीबद्दल जिनपिंग यांचे आभार मानले. आम्ही परस्पर विश्वास, आदर आणि संवेदनशीलतेच्या आधारावर परस्परसंबंध पुढे नेण्यास वचनबद्ध आहोत, हे त्यांचे उदगार या दृष्टीने महत्वाचे ठरले. त्याच वेळी, चिनी अध्यक्षांनी द्विपक्षीय बैठकीदरम्यान परस्पर संबंध मजबूत करण्यावर भर दिला. ते म्हणाले, जग बदलाकडे वाटचाल करत आहे. अशा परिस्थितीत आशियातील दोन मोठ्या शक्तींनी मित्र बनणे, चांगले शेजारी असणे आणि ड्रॅगन-हत्ती एकत्र येणे खूप महत्वाचे आहे. भारताला हत्तीची उपमा देऊन जिनपिंग यांनी एक प्रकारे भारताची ताकद अधोरेखित केली. एकीकडे मोदी यांचे चीनमध्ये अभूतपूर्व स्वागत होत असताना दुसरीकडे मोदी आणि जिनपिंग यांच्या भेटीत पूर्वीसारखा जिव्हाळा नव्हता, औपचारिकता होती. हस्तांदोलनात मित्रत्त्वाची प्रचिती नव्हती, तर दोन देशांमधील नेते भेटतात, त्या वेळी राजशिष्टाचार म्हणून पाडावी लागणारी औपचारिकता पहायला मिळाली. पूर्वीसारखी मोदी आणि जिनपिंग यांची गळाभेट झाली नाही. त्याला गलवान खोऱ्यासह अन्य ठिकाणी चीनने केलेली आगळीक कारणीभूत आहे. असे असले, तरी दोन्ही देशांमधील व्यापार थांबला नव्हता. वाढतच होता. मध्यंतरी काही गोष्टींवर निर्बंध आणून कोंडी करण्याचे प्रयत्न झाले. त्यामुळे होणारे नुकसान आणि परस्पर अवलंबित्व लक्षात आल्याने वाटाघाटी सुरू झाल्या. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आयात शुल्क वाढवल्यानंतर या प्रयत्नांना गती आली.

मोदी आणि जिनपिंग यांनी द्विपक्षीय चर्चेदरम्यान संबंध म




जबूत करण्यावर भर दिला. तथापि, दोन्ही राष्ट्रप्रमुख भेटले, तेव्हा हस्तांदोलन करून एकमेकांचे स्वागत केले. या भेटीदरम्यान पंतप्रधान मोदी यांनी शी जिनपिंग यांची गळाभेट घेतली नाही. अशा परिस्थितीत, त्यांच्या संबंधांमधला उबदारपणा संपला आहे का, असे प्रश्न उपस्थित झाले. हे प्रश्न उपस्थित होण्याला अनेक कारणे आहेत. अलिकडच्या काळात चीन आणि भारत यांच्यातील संबंध सुधारत असले, तरी भारत-पाकिस्तान संघर्षात ड्रॅगनने शेजारी देशाला पाठिंबा दिला होता, हे विसरता कामा नये. मोदी यांना चीनची शैली समजली आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये चीनशी संबंध सामान्य झाले आहेत, हे मोदी विसरले नसतील. २०२० मध्ये पूर्व लडाख सीमेवरील तणावानंतर दोन्ही राष्ट्रांमधील संघर्ष वाढला. विमानांची थेट वाहतूक थांबवण्यासह अनेक कठोर निर्णय घेण्यात आले. तथापि, आता परिस्थिती बदलताना दिसते आहे.

विशेषतः २०२४ च्या ब्रिक्स शिखर परिषदेत मोदी आणि जिनपिंग यांच्यात सकारात्मक बैठक झाली. या संबंधांमध्ये पुन्हा सुधारणा होण्याची आशा निर्माण झाली. त्यामुळेच सात वर्षांनी पंतप्रधान मोदी चीनला गेले. चीनलाही मोदी यांच्या या भेटीचे महत्त्व समजले आहे. मोदी आणि जिनपिंग यांच्यातील चर्चाही महत्त्वाची होती. ट्रम्प यांच्या टॅरिफ हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर ती झाली. त्याचा परिणाम जगभरातील जवळजवळ सर्व प्रमुख अर्थव्यवस्थांवर झाला आहे.

जिनपिंग यांच्याशी झालेल्या द्विपक्षीय बैठकीबद्दल मोदी यांनी सांगितले की, गेल्या वर्षी कझानमध्ये आमची खूप अर्थपूर्ण चर्चा झाली. आमच्या संबंधांना सकारात्मक दिशा मिळाली. सीमेवरील सैन्य मागे घेतल्यानंतर शांतता आणि स्थिरतेचे वातावरण निर्माण झाले आहे. सीमा व्यवस्थापनाबाबत आमच्या विशेष प्रतिनिधींमध्ये एक करार झाला आहे. कैलास मानसरोवर यात्रा पुन्हा सुरू झाली आहे. दोन्ही देशांमधील थेट उड्डाणेदेखील पुन्हा सुरू होत आहेत. दोन्ही देशांच्या २.८ अब्ज लोकांचे हित आमच्या सहकार्याशी जोडलेले आहे. यामुळे संपूर्ण मानवतेच्या कल्याणाचा मार्गही मोकळा होईल. परस्पर विश्वास, आदर आणि संवेदनशीलतेच्या आधारे संबंध पुढे नेण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत. या प्रसंगी बोलताना चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांनी पंचशील कराराचा उल्लेख केला. दोन्ही नेत्यांनी एकमेकांना प्रतिस्पर्धी म्हणून नव्हे, तर भागीदार म्हणून पाहण्याचे महत्त्व अधोरेखित केले आणि परस्पर आदर आणि सहकार्याद्वारे विश्वास निर्माण करण्याच्या गरजेवर सहमती दर्शवली. जिनपिंग यांनी पंचशील कराराचा उल्लेख केला. हा करार नेहरू यांच्या काळात झाला होता. नेहरू यांच्या परराष्ट्र धोरणावर, त्यातही चीनबाबतच्या धोरणावर मोदी सातत्याने टीका करत आहेत. त्यांच्यासमोरच जिनपिंग यांनी पंचशील कराराचा उल्लेख केला हा काव्यगत न्याय झाला. पंचशील करार हा शांततापूर्ण मार्गाने जगण्यासाठी पाच प्रमुख कल्पनांचा संच आहे. ही तत्त्वे मूलतः १९५४ मध्ये दोन्ही देशांमधील कराराचा भाग होती आणि परस्पर आदर आणि एकमेकांच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप न करण्यावर केंद्रित आहेत.

श्री. जिनपिंग पंचशील कराराचा उल्लेख भारत-चीन संबंधांसाठी मार्गदर्शक चौकट म्हणून करत असताना मोदी यांनी दोन्ही देशांमधील स्थिरता आणि दीर्घकालीन सहकार्याचा उल्लेख केला. त्यांनी परस्पर आदर, परस्परहित आणि परस्पर संवेदनशीलतेचे महत्त्व सांगितले. मोदी यांचा चीन दौरा दोन दिवसांच्या शांघाय सहकार्य परिषदेनिमित्ताने होता. या परिषदेत रशिया, मध्य आशिया, दक्षिण आशिया, आग्नेय आशिया आणि मध्य पूर्वेतील नेते एकत्र आले होते. या शिखर परिषदेकडे जागतिक दक्षिणेतील एकतेचे प्रदर्शन म्हणून पाहिले जात आहे. त्यात सदस्य राष्ट्रे प्रादेशिक सुरक्षा, आर्थिक सहकार्य आणि बहुपक्षीय संवादावर लक्ष केंद्रित करत आहेत. जिनपिंग यांच्या मनोगतामुळे दशकांपूर्वीच्या चौकटीकडे लक्ष वेधले गेले आहे. या चौकटीने एके काळी नव्याने स्वतंत्र झालेल्या



राष्ट्रांमधील शांततापूर्ण संबंधांचे स्वप्न पाहिले होते. पंचशील, किंवा शांततापूर्ण सहअस्तित्वाची पाच तत्वे ही परस्परआदर आणि विनाहस्तक्षेपावर आधारित आंतरराष्ट्रीय संबंधांसाठी एक चौकट आहे. २९ एप्रिल १९५४ रोजी चीन आणि भारताच्या तिबेट प्रदेशात स्वाक्षरी केलेल्या व्यापार आणि वाणिज्य करारात ते प्रथम औपचारिकपणे सादर करण्यात आले. एकमेकांच्या प्रादेशिक अखंडतेचा आणि सार्वभौमत्वाचा आदर, दोन्ही बाजूंनी आक्रमकता न दाखवणे, एकमेकांच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप न करणे, समानता आणि परस्पर लाभ, शांततापूर्ण सहअस्तित्व यांचा त्यात उल्लेख होता.

जून १९५४ मध्ये पंडित नेहरू आणि चीनचे पंतप्रधान झोउ एनलाई यांनी पंचशीलची व्याप्ती वाढवणारे संयुक्त निवेदन जारी केले. त्यानंतर ते केवळ भारत-चीन संबंधांचा आधार म्हणूनच नव्हे, तर जागतिक शांतता आणि राजनयिकतेचे एक मॉडेल म्हणूनदेखील प्रस्तावित करण्यात आले. या कराराचा उल्लेख जिनपिंग यांनी केला. दोन्ही नेत्यांमध्ये दहशतवाद, सीमा तणावात शांतता प्रस्थापित करणे आणि व्यापार यासह अनेक जागतिक मुद्द्यांवर चर्चा झाली. दहशतवादाच्या मुद्द्यावर मोदी यांनी चीनकडून पाठिंबा मागितला. त्यावर चीनने त्यांना पाठिंबा देण्याचे मान्य केले. यानंतर मोदी म्हणाले, की सीमेवर शांतता आणि सौहार्द राखणे हे संबंधांच्या एकूण विकासासाठी विम्यासारखे आहे. सीमेवरील परिस्थिती कोणत्या ना कोणत्या प्रकारे एकूण संबंधांवर परिणाम करेल. मोदी आणि शी यांनी भारत आणि चीनमधील मतभेद वादात बदलू देऊ नयेत, अशी भावना व्यक्त केली. जिनपिंग यांनी द्विपक्षीय संबंध आणखी सुधारण्यासाठी चार सूचना केल्या. भारत-चीन संबंध दोन्ही देशांच्या २.८ अब्ज लोकांना लाभदायक ठरू शकतात यावर एकमत झाले. मोदी आणि जिनपिंग यांनी अनेक जागतिक समस्या आणि चालू आव्हानांवरही चर्चा केली. शुल्कांवर चर्चा करताना दोन्ही नेत्यांनी आंतरराष्ट्रीय आर्थिक परिस्थितीवर चिंतन केले. आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घडामोडी अनेक आव्हाने निर्माण करत आहेत. या पार्श्वभूमीवर दोन्ही देशांमध्ये सामंजस्य कसे विकसित करावे आणि या बदलत्या आव्हानांमध्ये परस्पर संबंध कसे पुढे नेऊ नयेत यावरही दोन्ही नेत्यांनी विचारविनिमय केला. भारत आणि चीनमधील व्यापारी भागीदारी जगात सर्वाधिक आहे. असे असले, तरी पाकिस्तान हा चीनचा व्यूहात्मक भागीदार आहे. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत भारताच्या असहाय्यतेचा फायदा घेऊन नंतर सीमेत घुसखोरी करण्याची त्याची पूर्वीची मानसिकता लक्षात घेऊन 'हिंदी चिनी भाई भाई' या घोषणेला किती महत्त्व द्यायचे, हे आपल्याला ठरवावे लागेल. त्याची जाणीव असल्यानेच मोदी यांनी गळाभेट टाळली असावी...

# पुन्हा वादाचा मुद्दा

**लिंग गुणोत्तरात घट झाल्यामुळे महिलांवरील बलात्कार आणि असभ्य वर्तनात झालेली वाढ विशेषतः उच्च लिंग पूर्वाग्रह असलेल्या भागात दिसून येत आहे. महिला सक्षमीकरणाविरुद्ध पुरुषांच्या प्रतिक्रियेमुळे अशा गुन्ह्यांमध्ये वाढ झाली असून जागतिक बँकेने अशा हिंसाचाराला जागतिक महामारी म्हणून संबोधले आहे. भारतात महिला आणि मुलींवरील सततचा हिंसाचार हा सामाजिक आणि धोरणात्मक चिंतेचा विषय बनत आहे.**

पैलू

मधुरा कुलकर्णी

कोलकाता असो की पुणे; महिलांवरील अत्याचारांच्या घटनेने समाजमन आधी प्रक्षुब्ध होते आणि नंतर शांत होते. काही दिवस गेले की पुन्हा हिंसाचाराच्या घटना घडतात. त्यातील काही घटना बनावही असू शकतात; परंतु जग २१ व्या शतकात येऊन २५ वर्षे झाली असली तरी भारतीय पुरुषप्रधान संस्कृती आणि त्याचा समाजमनावरचा पगडा अजूनही कमी झालेला नाही. एकीकडे महिला शिकल्या आहेत. त्या कोणतीही आव्हाने पेलण्यास तयार झाल्या आहेत. संधी मिळाली की त्या सोने करतात. दुसरीकडे महिलांचा होत असलेला उत्कर्ष पुरुषांच्या प्रगतीत गतिरोधक निर्माण करतो, अशी मानसिकता दुर्दैवाने आणखी घट्ट रुजते आहे. त्यातून निर्माण होणाऱ्या असुरक्षित भावनेमुळे महिलांचा छळ करण्याचे प्रकार वाढत चालले आहेत. गेल्या काही महिन्यांमध्ये महिलांवरील हिंसाचारात अभूतपूर्व वाढ झाली आहे. त्याहूनही चिंताजनक बाब म्हणजे शाळा आणि महाविद्यालयीन परिसर किंवा कामाच्या ठिकाणी गुन्हे घडत आहेत. या जागा सहसा सुरक्षित आश्रयस्थान मानल्या जातात. अलिकडेच बालासोरमधील फकीर मोहन स्वायत्त महाविद्यालयातील वीस वर्षीय विद्यार्थिनीने आत्मदहनाच्या प्रयत्नात ९० टक्के भाजून आत्महत्या केली. एका वरिष्ठ शिक्षिकेविरुद्ध लैंगिक छळाच्या वारंवार तक्रारी केल्यानंतर बी.एड.च्या विद्यार्थिनीने मुख्याध्यापकांच्या कार्यालयाबाहेर हे टोकाचे पाऊल उचलले होते. आरोपी शिक्षक समीर साहू आणि प्राचार्य दिलीप घोष यांना अटक करण्यात आली; परंतु या मुलीच्या तक्रारी वेळेवर सोडवल्या गेल्या असत्या, तर एक मौल्यवान जीव गेला नसता.

ही मुलगी न्यायासाठी अनेक ठिकाणी फिरत राहिली, मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातही गेली; पण तिच्या गंभीर तक्रारीकडे कोणीही लक्ष दिले नाही. पश्चिम बंगालमध्ये गेल्या वर्षी आर. जी. कर मेडिकल हॉस्पिटलमधील पदव्युत्तर विद्यार्थिनीच्या क्रूर हत्येला एक वर्ष उलटूनही या जूनमध्ये कॅम्पसमध्ये एका लॉ कॉलेजच्या विद्यार्थिनीवर सामूहिक बलात्कार करण्यात आला. कर्नाटकमधील मंगळुरूमध्ये एका विद्यार्थिनीवर बलात्कार केल्याच्या आरोपाखाली दोन व्याख्यात्यांना अटक करण्यात आली. दिल्लीमध्ये नऊ वर्षांच्या मुलीवरील बलात्कार आणि हत्येमुळे कायदा आणि सुव्यवस्था ढासळल्याबद्दल विरोधकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. २०१२ मध्ये दिल्लीमध्ये निर्भयावर झालेला बलात्कार आणि हत्येनंतर जमिनीवर फारसे काही बदल झालेले नाहीत. ओडिशाच्या विद्यार्थिनीच्या दुर्दशेने कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ कायदा,




सरकारने सर्व महाविद्यालयांना २४ तासांच्या आत समित्या स्थापन करण्यास सांगितले होते. असे होऊन आणि अनेक प्रतिबंधक उपाय योजले जाऊनही अत्याचारांची घृणास्पद मालिका संपत नाही.

'नॅशनल क्राइम रेकॉर्ड्स ब्यूरो (एनसीआरबी)चा २०२३ चा वार्षिक भारतातील गुन्हे अहवाल अद्याप प्रसिद्ध झालेला नाही. २०२२ च्या उपलब्ध आकडेवारीनुसार महिलांविषयक एकूण चार लाख ४५ हजार २५६ गुन्हे नोंदवले गेले. २०२१ च्या तुलनेत त्यात चार टक्के वाढ दिसते. महिलांविरुद्धचे बहुतेक गुन्हे (३१.४ टक्के) पती किंवा नातेवाइकांकडून केले गेले आणि ते क्रूरतेच्या कलमाअंतर्गत नोंदवले गेले. महिलांच्या विनयभंगाच्या उद्देशाने महिलांवर होणारे हल्ले एकूण गुन्ह्यांपैकी १८.७ टक्के होते तर बलात्कारांचे प्रमाण ७.१ टक्के होते. अनेक गुन्हे नोंदवले जात नाहीत, हे इथे लक्षात घेण्यासारखे आहे. या पार्श्वभूमीवर लैंगिक हिंसाचार आणि लिंगभेद यावर संवाद आवश्यक आहे आणि तो लवकरच सुरू झाला पाहिजे. काही दिवसांनी गुन्ह्याविरुद्ध न्यायाची मागणी कमी होता कामा नये. बिहार, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, आंध्र आणि केरळ या राज्यांमध्ये महिलांवरील गुन्ह्यांमध्ये झपाट्याने वाढ झाली आहे. संसदेत भारतातील महिलांवरील गुन्ह्यांबाबत एक प्रश्न विचारण्यात आला होता. त्याच्या उत्तरात पाच वर्षांचे आकडे सादर करण्यात आले. २०१८ ते २०२२ दरम्यानचे हे आकडे दर्शवतात की २०१८ मध्ये महिलांवरील अत्याचाराचे तीन लाखांहून अधिक गुन्हे नोंदवले गेले, तर २०२२ मध्ये चार लाखांहून अधिक गुन्हे नोंदवले गेले. देशभरात महिलांवरील गुन्ह्यांमध्ये वाढ झाली आहे.

२०१२ चा निर्भया खटला संपल्यानंतर आणि आरोपींना शिक्षा झाल्यानंतर आता निर्भया होणार नाही अशी आशा होती; परंतु त्या प्रकरणानंतरही अशी अनेक भयानक प्रकरणे दररोज समोर येत आहेत. कोलकाता विधी महाविद्यालयातील एका मुलीवर बलात्कार करून हत्या करण्यात आल्यानंतर संसदेत उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नावर देण्यात आलेल्या उत्तरात २०२२ मध्ये देशभरात महिलांवरील गुन्ह्यांचे चार लाखांहून अधिक गुन्हे दाखल झाले आहेत, हे स्पष्ट झाले. सरकारने यासंदर्भात पाच वर्षांचे आकडे सादर केले. या आकड्यांवरून स्पष्ट होते की महिलांवरील गुन्ह्यांमध्ये वाढ झाली आहे. २०११ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १२१.१ कोटी होती. त्यात महिलांचे प्रमाण ४८.५ टक्के होते. भारतातील प्रत्येक क्षेत्रात आपले स्थान निर्माण करण्यासाठी महिलांनी दीर्घ लढाई लढली. त्याच वेळी त्या अजूनही रात्रीच्या अंधारात सुरक्षित रस्त्यांवर चालण्याची लढाई लढत आहेत. सार्वजनिक ठिकाणी सुरक्षित वाटण्यासाठी त्या लढत असलेली लढाई अजूनही सुरू आहे. २०२२ मध्ये उत्तर प्रदेशमध्ये सर्वाधिक गुन्हे नोंदवले गेले आहेत.

देशातील महिलांवरील गुन्हे रोखण्यासाठी उच्च-जोखीम असलेल्या क्षेत्रांवर लक्ष ठेवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित चेहऱ्यावरील ओळख प्रणाली, स्मार्ट प्रकाश व्यवस्था आणि ड्रोन वापरण्यात येणार आहेत. देशातील महिलांवरील वाढत्या गुन्ह्यांबद्दल सर्वोच्च न्यायालयाच्या महिला वकील संघटनेने दाखल केलेल्या जनहित याचिकेवर मंत्रालयाने दिलेल्या उत्तरात ही माहिती देण्यात आली. गृह मंत्रालयाने म्हटले आहे की दिल्ली, मुंबई आणि इतर शहरांमधील सात रेल्वे स्थानके लवकरच कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालींनी सुसज्ज केली जातील. उच्च-जोखीम असलेल्या क्षेत्रांवर लक्ष ठेवण्यासाठी स्वयंचलित परवाना प्लेट ओळख, स्मार्ट लाइटिंग सिस्टीम आणि ड्रोन यासारख्या इतर उपाययोजनादेखील अंमलात आणल्या जातील. मंत्रालयाने सर्वोच्च न्यायालयाला सांगितले की राष्ट्रीय डेटा शेअरिंग अँड एक्सचेंज प्लॅटफॉर्ममध्ये बलात्कार, पाठलाग आणि बाल शोषण यासारख्या विविध लैंगिक गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या व्यक्तींची नावे, पत्ते, छायाचित्रे आणि फिंगरप्रिंट तपशीलांसह संवेदनशील माहिती आहे. सध्या या डेटाबेसमध्ये २०.२ लाख नोंदी आहेत, ज्या देशभरातील सर्व पोलिस ठाणी आणि कायदा अंमलबजावणी संस्था इंटर-ऑपरेबल क्रिमिनल जस्टिस सिस्टीम डेटाबेसद्वारे वापरल्या जाऊ शकतात.



तंत्रज्ञानाच्या मदतीने पोलिस, न्यायालये, तुरुंग, न्यायवैद्यक प्रयोगशाळा आणि खटले एकत्रित करण्याच्या उद्देशाने राबवण्यात येत असलेला हा एक उपक्रम आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या महिला वकील संघटनेने युक्तिवाद केला की महिलांवरील गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी पुढील उपाययोजनांची आवश्यकता आहे. भारताच्या राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्यूरोच्या आकडेवारीवरून दिसून आले आहे की महिलांवरील गुन्ह्यांमध्ये वाढ झाली आहे. २०१८ मध्ये ५८ लाख असलेला हा आकडा २०२२ मध्ये ६६ लाखांवर पोहोचला. उत्तर प्रदेश ६५,७४३ महाराष्ट्र ४५,३३१, राजस्थान ४५,०५८, मध्य प्रदेश ३२,७६५, पश्चिम बंगाल ३४,७३८, ओडिशा २३,६४८, तेलंगणा २२,०६६, कर्नाटक १७,८१३, हरियाणा १६,७४३, आंध्र प्रदेश २५,५०३ अशी सर्वाधिक गुन्हे दाखल झालेल्या राज्यांची संख्या आहे. गेल्या पाच वर्षांमध्ये महिलांवरील गुन्ह्यांमध्ये महाराष्ट्र दुसऱ्या किंवा तिसऱ्या क्रमांकावर आहे. २०१८ मध्ये देशभरातील महिलांवरील गुन्ह्यांमध्ये ते दुसऱ्या क्रमांकावर होते. २०१९ मध्ये ते तिसऱ्या क्रमांकावर होते. २०२० मध्ये ते आघाडीच्या तीन राज्यांमध्ये नव्हते. अनेकांची कधीही गुन्हा नोंदवण्याची हिंमत होत नाही. हे आकडे आपल्यासमोर आरसा धरतात आणि सांगतात की महिला सक्षमीकरणासाठी अजूनही बराच लढा बाकी आहे.

नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com




* वर्ष ३४ * अंक ६५ * * यवतमाळ * शनिवार, दिनांक ६ सप्टेंबर २०२५ * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## परमपूज्य दादा, स. न. वि. वि.

आदरणीय दादा प्रत्येक वादा निभावण्यात जगभरात त्यांची ख्याती आहे. पण ही ख्याती आता मातीत मिसळते की काय अशी भीती आम्हाला वाटत आहे. दादा बोलतील तो वज्रआवाज, दादांनी आश्वासन दिले म्हणजे वज्रलेख, दादा म्हणजे एक घाव दोन तुकडे पण आता आपले सरळ सरळ दादा वाकड्या मार्गाने का जात आहेत, हा प्रश्न आहे. दादांनी म्हटले येणार म्हणजे दादा येणार, पण आज दादांनाही आपला शब्द फिरवावा लागला त्यामुळे त्यांच्या बिचाऱ्या कार्यकर्त्यांना अगदी जिवाभावाने दादांच्या दरबारात आपली व्यथा मांडण्याची जी संधी मिळाली होती ती हुकली. परंतु दादांनी आपल्या गणेश दर्शन दौऱ्याचा कार्यक्रम रद्द करून दौऱ्याचा सगळा सातबारा कोरा केल्यामुळे जिकडे तिकडे चोहीकडे, चर्चेवर चर्चाच घडे अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. काका शरद पवार यांच्या छत्रछायेतून बाहेर पडल्यावर दादा आपली दादागिरी विसरलेत की काय, असे प्रश्न आम्हा मानवांच्या समोर उभे राहिलेले आहेत. दादा म्हणजे आपले आधार कार्ड आहे असे केवळ सामान्य जनांनाच वाटत नाही, तर ज्यांच्याजवळ पॅन कार्ड आहे त्यांनाही तसे वाटते. आपल्या या नावलौकिकाची तमा बाळगणे हा या पवारांचा प्लस पॉइंट होता. तावा तावात येऊन काहीतरी बोलणे आणि राजधानीत जाऊन विसरणे हा दादांचा स्वभाव नाही. म्हणूनच दादांच्या शब्दाला भाव आहे आणि शब्द पाळण्याच्या बाबतीत दादांचे नाव आहे. यामुळेच आज सर्वत्र दादांच्या अचानक थांबलेल्या चाकांची चर्चा होत आहे. दादांनी आपल्या प्रियजनांना असे अनाथ सोडण्याचे कारण काय, हा प्रश्न आता दादाप्रेमी लोकांच्या चचेर्चा मोठाच विषय बनलेला आहे. आजच्या राजकारणात बोललेले शब्द पाळणे यापेक्षा ते शब्द गाळणे, हाच बहुतेक राजकारणी लोकांचा धंदा असतो. पण दादांचे तसे नाही त्यामुळे दादांचे सच्चे मित्र असलेल्या त्यांच्या कार्यकर्त्यांना दादांचे न येणे हा हृदयभंगासारखा धक्का वाटतो. आपले दादा येतील, काहीतरी करतील आणि आपले जीवन बदलेल अशा आशेवर असलेल्या कार्यकर्त्यांची दादांच्या अचानक न येण्याने पार निराशा झालेली आहे. त्यामुळे दादांनी यापुढे तरी आपण दिलेला शब्द पाळावा, अशी त्यांना नम्र सूचना आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र घसरला!

### तीन महिन्यांत महाराष्ट्रात ४५,९२१ कोटींची गुंतवणूक : कर्नाटकने महाराष्ट्राला टाकले मागे

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :
राज्यात थेट परकीय गुंतवणुकीचा ओघ कमी होत असल्याचे समोर आले आहे. या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत (एप्रिल ते जून) थेट परकीय गुंतवणुकीच्या बाबतीत कर्नाटकने महाराष्ट्राला मागे टाकले असून महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर फेकला गेला आहे.

काही दिवसांपूर्वी पुण्यातील हिंजवडी आयटी पार्कच्या रस्त्यांची दुरवस्था पाहून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपले आयटी पार्क बंगळुरूला चालले आहे, अशी चिंता व्यक्त केली होती.

आता या तिमाहीतील आकडेवारी पाहता त्यांची ती भीती खरी ठरत असल्याचे दिसून येत आहे. डिपार्टमेंट फॉर प्रमोशन ऑफ इंडस्ट्री अँड इंटर्नल ट्रेडच्या आकडेवारीनुसार, एप्रिल ते जून २०२५ या तीन महिन्यांत महाराष्ट्रात ४५,९२१ कोटी रुपयांची एफडीआय गुंतवणूक आली. याच काळात कर्नाटकने मात्र ४८,८०४ कोटी रुपयांची गुंतवणूक मिळवून देशात प्रथम क्रमांक पटकावला.

विशेष म्हणजे गेल्या काही वर्षांच्या तुलनेत महाराष्ट्रातील गुंतवणुकीत मोठी घट झाल्याचे दिसून येते. एप्रिल-जून २०२४ मध्ये महाराष्ट्रात ७०,७९५ कोटी रुपयांची गुंतवणूक आली होती, तर याच कालावधीत २०२३ मध्ये ६५,५०२ कोटी, २०२२ मध्ये ४०,३८६ कोटी आणि २०२१ मध्ये ३०,१४१ कोटी रुपयांची गुंतवणूक आली होती.

ही आकडेवारी पाहता महाराष्ट्रातील गुंतवणुकीचा ओघ अचानक घटल्याचे स्पष्ट होत आहे.

#### गुंतवणुकीनुसार क्रमवारी

कर्नाटक ४८,८०४ कोटी रुपये
महाराष्ट्र ४५,९२१ कोटी रुपये
तामिळनाडू २२,९०२ कोटी रुपये
गुजरात १०,२४५ कोटी रुपये
दिल्ली ९,४०३ कोटी रुपये
हरियाणा ८,८२२ कोटी रुपये
राजस्थान ४,६७८ कोटी रुपये
तेलंगण ३,३८० कोटी रुपये
उत्तर प्रदेश ६८८ कोटी रुपये
झारखंड २५ कोटी रुपये

#### सॉफ्टवेअर कंपन्या कर्नाटककडे

या आकडेवारीवरून काँग्रेस प्रवक्ते सचिन सावंत यांनी सरकारवर जोरदार टीका केली आहे. जेव्हा गुंतवणूक वाढते तेव्हा श्रेय घेणारे आता घटल्यावर शांत का आहेत? असा सवाल त्यांनी केला. या तिमाहीत सर्वाधिक गुंतवणूक कॉम्प्युटर आणि सॉफ्टवेअर क्षेत्रात झाली असून ती मोठ्या प्रमाणात कर्नाटककडे गेली.
सावंत यांनी काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुण्यातील हिंजवडी आयटी पार्कच्या रस्त्यांची दुरवस्था पाहून व्यक्त केलेल्या चिंतेची आठवण करून दिली. आपले आयटी पार्क बंगळुरूला चालले आहे, असे पवार त्या वेळी म्हणाले होते. आता एफडीआयच्या आकडेवारीवरून त्यांची ती भीती खरी ठरत असल्याचे दिसून येत आहे, असे सावंत यांनी या वेळी बोलताना सांगितले.

#### सुटीची सूचना

अनंत चतुर्दशीनिमित्त शनिवार दि. ६ सप्टेंबर २०२५ रोजी महासागर कार्यालयास सुटी असल्याने रविवार दि. ७ सप्टेंबर २०२५ चा अंक प्रकाशित होणार नाही. सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.
■ व्यवस्थापक

## गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुंबईत बॉम्बस्फोटाची धमकी



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :
गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुंबई पोलिसांना मोठी धमकी मिळाली आहे. व्हॉट्स?पवरून ट्रॅफिक पोलिसांच्या अधिकृत नंबरवर पाठवलेल्या संदेशात शहरात भीषण बॉम्बस्फोट घडवून आणण्याचा दावा करण्यात आला आहे. या संदेशामुळे सुरक्षा यंत्रणेत खळबळ उडाली असून पोलिसांनी तत्काळ शहरात हाय अलर्ट जारी केला आहे.

धमकीच्या संदेशात ३४ वाहनांत बॉम्ब लावल्याचा उल्लेख आहे. यासोबतच, तब्बल ४०० किलो फ्ऊ आणण्यात आले असून त्याद्वारे एक कोटी लोकांना ठार मारण्याची क्षमता असल्याचा दावा करण्यात आला आहे. तर, १४ पाकिस्तानी दहशतवादी भारतात घुसल्याचेही या संदेशात आहे.

एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, ज्या व्हॉट्सॲप नंबरवरून हा मेसेज पाठवण्यात आला होता. तो नंबर शोधण्याचे प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत. ₹मुंबई पोलिस नेहमीच सतर्क आहेत आणि आम्ही सर्व गोष्टींवर लक्ष ठेवून आहोत. जनतेने घाबरू नये, परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आहे आणि सर्व काही शांत आहे. अशी धमकी देण्याची ही पहिलीच वेळ नाही.

या घटनेनंतर मुंबई पोलिसांनी तातडीने पावले उचलली. शहरात सर्वत्र नाकेबंदी, संशयित वाहनांची तपासणी आणि महत्त्वाच्या ठिकाणांवर सुरक्षा कडेकोट करण्यात आली आहे. गणेशोत्सव काळात मोठ्या प्रमाणावर भाविक मुंबईत दाखल होत असल्याने, पोलिसांनी मंडप परिसर, रेल्वे स्थानके, विमानतळ, बाजारपेठा आणि गर्दीच्या भागांमध्ये गस्त वाढवली आहे.

दरम्यान, सायबर सेल आणि दहशतवादविरोधी पथकाने मिळालेल्या संदेशाचा सखोल तपास सुरू केला आहे. हा संदेश खरा आहे की खोटा, याचा शोध घेण्यासाठी तांत्रिक मदतीचा वापर करत आहेत. अशा प्रकारे मिळणाऱ्या धमक्या अनेकदा खोट्या निघाल्या असल्या तरी, पोलिस अलर्ट मोडवर आहे.

पोलिसांनी नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे, तसेच कोणतीही संशयास्पद वस्तू अथवा हालचाल आढळल्यास लगेच पोलिसांना कळविण्याचे आवाहन केले आहे.

## न्या. चंद्रशेखर यांनी घेतली मुख्य न्यायमूर्ती पदाची शपथ



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :
मुंबई उच्च न्यायालयाचे प्रभारी मुख्य न्यायमूर्ती न्या. चंद्रशेखर यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ती पदाची शपथ घेतली.
राजभवन येथे झालेल्या एका छोटेखानी शपथविधी समारंभामध्ये राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी न्या. चंद्रशेखर यांना पदाची शपथ दिली. शपथ दिल्यानंतर राज्यपालांनी व त्यांच्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी न्या. चंद्रशेखर यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

शपथविधी सोहळ्याला विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, लोकायुक्त न्या. (नि.) विद्यासागर कानडे तसेच राजस्थान, झारखंड, दिल्ली, अलाहाबाद, कर्नाटक व मुंबई उच्च न्यायालयातील न्यायाधीश व सेवानिवृत्त न्यायाधीश उपस्थित होते.

## महिला अधिकाऱ्यांबद्दल मला सर्वोच्च आदर

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :
सोलापूर जिल्ह्यात महिला आयपीएस अधिकारी डीएसपी अंजली कृष्णा यांच्या सोबत बोलताना अजित पवार यांचा एक व्हिडिओ समाज माध्यमावर चांगलाच व्हायरल झाला आहे. यासंबंधीचा वाद वाढल्यानंतर अखेर अजित पवार यांनी स्पष्टीकरण दिले आहे.



पोलिस दलातील महिला अधिकाऱ्यांबद्दल माझ्या मनात सर्वोच्च सन्मान आणि आदर आहे. त्यांच्या कामात हस्तक्षेप करण्याचा माझा उद्देश नाही. मी पारदर्शक प्रशासकीय कारभारासाठी आणि बेकायदेशीर वाळू, माती, खडक उपशासह प्रत्येक बेकायदेशीर कृतीवर कायद्याप्रमाणे कठोर कारवाई करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे म्हटले आहे.
त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले की, माझा उद्देश कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये हस्तक्षेप करण्याचा नव्हता, तर त्या ठिकाणी परिस्थिती शांत रहावी आणि ती अधिक बिघडू नये याची काळजी घेण्याचा होता.

आपल्या पोलीस दलाबद्दल तसंच धैर्यानं आणि प्रामाणिकपणे आपलं कर्तव्य बजावणाऱ्या महिला अधिकाऱ्यांबद्दल मला सर्वोच्च आदर आहे.

## मराठा समाजाची ओबीसीत घुसखोरी नाही

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :
ओबीसी समाजात वाटेकरी वाढत चालले असल्याचे ओबीसी नेते मंत्री छगन भुजबळ यांनी म्हटले आहे. मात्र, आम्ही त्यांच्यात नाही तर ते आमच्यात आले आहोत. मराठा समाज १८८१ पासून आतापर्यंत आरक्षणात होता. मात्र, छगन भुजबळ १९८९ मध्ये आरक्षणात आले आहेत. आम्ही पूर्वीपासून आरक्षणात होतो. आमच्या लेकरा बाळांना उंचीवर न्यायचे असेल, समाजाला पुढे न्यायचे असेल तर आम्हाला आरक्षण घ्यावे लागणार आहे. हे आमच्या आता लक्षात आले असल्याचेही मनोज जरांगे पाटील म्हणाले.



## सुरक्षा व्यवस्थेत नवे तंत्रज्ञान

### गिरगाव चौपाटीवर तयारी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :
भक्तांच्या गर्दीमुळे विसर्जन स्थळांवर सुरक्षेची मोठी जबाबदारी उभी राहते. यंदा मुंबईतील गिरगाव चौपाटीवर या पार्श्वभूमीवर पोलिसांनी काटेकोर बंदोबस्तासह आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केला आहे.

विसर्जनाच्या आदल्या दिवशी गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी गिरगाव चौपाटीवर भेट देऊन सुरक्षाव्यवस्थेचा प्रत्यक्ष आढावा घेतला. यावेळी पोलिस आणि प्रशासनाने केलेल्या तयारीची माहिती घेतली. चौपाटीवर यंदा विशेष वैशिष्ट्य म्हणजे एआयआधारित चेहरा ओळखणारे कॅमेरे प्रथमच बसवले गेले आहेत. गर्दीत कोणतीही संशयास्पद हालचाल त्वरित ओळखण्यासाठी हे तंत्रज्ञान उपयुक्त ठरणार आहे. याशिवाय एकूण ८९ सीसीटीव्ही कॅमेरे परिसरात बसवण्यात आले असून तेथील प्रत्येक हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवले जाणार आहे.

सुरक्षेसाठी तब्बल १०९४ पोलीस कर्मचारी तैनात असून, त्यांना सहाय्य करण्यासाठी आणखी १००० हून अधिक राखीव पोलीस दल सज्ज ठेवले गेले आहे.

## ४५ शिक्षकांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार



■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ५ :
शिक्षकांचे समाजातील स्थान सर्वोच्च असून शिक्षक मुलांमध्ये आत्मसन्मान आणि सुरक्षितता जागवतात. त्यांचे यश हेच शिक्षकांचे खरे बक्षीस आहे. भारताला कौशल्याची राजधानी आणि सुपर पॉवर बनवण्यात शिक्षकांची भूमिका निर्णायक आहे, असे प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी केले.

शिक्षक दिनानिमित्त विज्ञान भवन येथे आयोजित समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते देशभरातील ४५ शिक्षकांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. त्यात महाराष्ट्रातील सहा शिक्षकांचा समावेश आहे . यामध्ये शालेय शिक्षण क्षेत्रातील डॉ. शेख मोहम्मद वकि उद्दीन शेख हमीदोद्दीन (जि. प. हायस्कूल, अधार्पूर, नांदेड), सोनिया विकास कपूर (एटॉमिक एनर्जी सेंट्रल स्कूल नं. २, मुंबई) आणि उच्च शिक्षण क्षेत्रातील डॉ. संदीपन गुरुनाथ जगदाळे (दयानंद कॉलेज ऑफ आर्ट्स, लातूर), डॉ. नीलाक्षी जैन (शाह अँन्ड अँकर कच्छी अभियांत्रिकी महाविद्यालय, मुंबई), प्रा. पुरुषोत्तम पवार (एस व्ही पी एम इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड इंजिनीअरिंग, बारामती), आणि कौशल्य विकास क्षेत्रातील श्री. अनिल रामदास जिभकाटे (संत जगनाडे महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागपूर) यांचा समावेश आहे.

यावेळी शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान, शिक्षण राज्यमंत्री डॉ. सुकांत मजूमदार, जयंत चौधरी, शिक्षण मंत्रालयाचे सचिव संजय कुमार, कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाचे सचिव देबाश्री मुखर्जी यावेळी उपस्थित होते. मागील काही वर्षांपासून उद्योजकता मंत्रालयातील शिक्षकांनाही संधी देण्यात येत आहे.

## चारित्र्यावर संशयातून पत्नीचा खून

■ महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि. ५ :
कोरची तालुक्यातील सोनपूर गावाजवळील जंगल परिसरात पतीने पत्नीचा गळा दाबून खून केला. चारित्र्यावर संशय घेत पत्नीशी वाद घालणाऱ्या पतीने टोकाचे पाऊल उचलले. पोलिसांनी आरोपीस अटक केली आहे.

मृतक टामिनबाई पुरुषोत्तम कचलाम (३४) असून आरोपी पतीचे नाव पुरुषोत्तम गजराज कचलाम (३४, रा. सोनपूर) असे आहे. या दाम्पत्याच्या लग्नाला सुमारे दहा वर्षे झाली असून त्यांना दोन लहान मुले आहेत. पुरुषोत्तम हा स्वभावाने चिडखोर असून पत्नीच्या चारित्र्यावर तो वारंवार संशय घेत असे. पुरुषोत्तमने पत्नीला माहेरी सोडण्यासाठी पायी नेण्यास सुरुवात केली. मात्र सोनपूर-गोडगुलदरम्यानच्या कामेली जंगल परिसरात गळा दाबून तिचा खून केला. गवात परतून त्याने गावकऱ्यांसमोरच पत्नीचा खून केल्याची कबुली दिली.

## उत्तर भारत जलमय!



■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ५ :
देशात पाऊस आणि पुरामुळे कहर झाला आहे. दिल्ली-एनसीआरमधील अनेक भाग शुक्रवारीही यमुना नदीच्या पाण्यात बुडाले होते. मध्य प्रदेशात नद्या रस्त्यांवरून वाहत आहेत. हिमाचल प्रदेशात मणि महेश यात्रेकरूंना ११ दिवसांनी चिनूक हेलिकॉप्टरने वाचवण्यात आले. हरियाणामध्ये पूर टाळण्यासाठी रस्ते खोदण्यात आले.

डोंगराळ राज्यांपासून ते सपाट भागांपर्यंत पावसाने प्रचंड नुकसान केले आहे. दिल्ली-एनसीआरमध्ये सततच्या पावसामुळे यमुना नदी धोक्याच्या पातळीवरून वाहत आहे. त्यामुळे अनेक भागात पूर आला आहे. नोएडामधील सेक्टर-१३५ आणि सेक्टर-१५१ पाण्याखाली गेले आहेत. अनेक भागात ३ ते ४ फूट पाणी भरले आहे.

हरियाणातील पंचकुला, हिसार, रोहतक आणि झज्जरमधील सर्व शाळा बंद आहेत. फतेहाबाद, कुरुक्षेत्र, यमुनानगर आणि फरिदाबादमध्येही काही शाळा बंद ठेवण्यात आल्या आहेत. गुरुग्रामच्या सिग्नेचर ग्लोबल सलोरा सोसायटीमध्ये गुरुवारी पाणी शिरले होते. त्यामुळे महिला आणि मुले त्यांच्या घरात अडकली होती.

राजस्थानमधील अजमेर येथे गुरुवारी रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे बोराज तलावाची भिंत कोसळली. त्यामुळे १ हजाराहून अधिक घरांमध्ये अचानक पाणी शिरले. लोकांनी छतावर जाऊन आपले प्राण वाचवले. पाण्याचा प्रवाह इतका वेगवान होता की अनेक वाहने वाहून गेली.

## बेलतरोडीमध्ये आढळला भारतातील सर्वात लहान विषारी साप

### हेल्प फॉर ॲनिमल वेलफेअर असोशिएशनला दुसऱ्यांदा सापडल्याची नोंद

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :
आज दुपारी बेलतरोडी निवासी संग्राम मोहिते यांच्या घरी अंगनात अगदी छोटा रंगीबेरंगी साप साप दिसला, ही माहिती हेल्प फॉर ॲनिमल वेलफेअर असोसिएशन नागपूरचे सर्पमित्र अनिकेत खेरकर, निलेश रामटेके यांना मिळताच घटनास्थळ कूच केले व या दुर्मिळ सापाला सुरक्षितरित्या रेस्क्यू केले.
पोवळा हा साप (स्लेंडर कोरल) भारतात आढळणारा एक सर्वात छोटा, विषारी साप आहे, शास्त्रीय नाव कॅलिओफिस मेलनुरस असुन हा साप अत्यंत लहान असतो, हा साप प्रामुख्याने रात्रीच्या वेळी अधिक सक्रिय असतो. या सापाचे मुख्य खाद्य लहान साप, अळी आणि कीटकांची अंडी असते. ह्या सापाची लांबी २२ इंचापर्यंत असते, सापाचा रंग मातकट असून डोके काळे व डोक्यावर पांढरे



ठिपके असतात, शेपटीला दोन काळ्या रंगाच्या रिंग असतात, पोटाकडील बाजूस लालसर व शेपटीखाली निळसर राखाडी रंग असतो, हा साप घाबरल्यास शेपटीची गोल रिंग तयार करतो.
हेल्प फॉर ॲनिमल वेलफेअर असोसिएशन नागपूरचे स्वप्निल बोधाने यांच्या अनुसार भारतातील सर्वात लहान विषारी साप म्हणून ओळखला जातो. इलापिड कुळातील भारतातील सर्वात लहान विषारी साप आहे, सापाचे विष न्यूरोटॉक्सिक असुन मज्जासंस्थेवर हल्ला करते हा साप चावल्यावर सूज येणे, चक्कर येणे, बेशुद्ध पडणे अशी लक्षणं दिसू शकतात.

या सापाला भारतीय वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ अनुसार शेड्यूल २ मध्ये येतो. साप दुर्मीळ गटातील असल्याने अत्यावश्यक अशा अधिवासाचा विचार करुन त्यास निसर्गमुक्त करण्यात आले.

# महाराष्ट्रात अतिवृष्टीमुळे २९ जिल्ह्यांत शेती पिकाचे नुकसान

## कृषीमंत्री दत्तात्रय भरणेंची माहिती



**मुंबई :** महाराष्ट्रात दरवर्षी अतिवृष्टी, पुरामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होतं. नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे महाराष्ट्रातील तब्बल २९ जिल्ह्यांतील १९१ तालुक्यांमध्ये मोठे नुकसान झाले आहे. या काळात झालेल्या पावसामुळे ६५४ पेक्षा जास्त महसूल मंडळांमधील खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. दि.१५ ते २० ऑगस्ट दरम्यान पडलेल्या सर्वाधिक पावसामुळे शेती पिकांचे जास्त नुकसान झाले आहे. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, राज्यात १४, लाख ३६ हजार २७६ हेक्टर क्षेत्र (३५ लाख ९० हजार ६०९ एकर) बाधित झाले आहे. त्यापैकी १० हजार हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्र बाधित असलेले १२ जिल्हे आहेत. बाधित भागातील सुरु केलेले पंचनाम्याचे काम अंतिम टप्यात असून शेतकऱ्यांना योग्य ती मदत तातडीने देण्यात येईल, अशी माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली आहे. बाधित पिके सोयाबीन, मका, कापूस, उडीद, तूर, मूग या पिकांचे सर्वाधिक नुकसान झाले आहे. काही ठिकाणी भाजीपाला, फळपिके, बाजरी, ऊस, कांदा, ज्वारी व हळद या पिकांनाही फटका बसला आहे. नांदेड, वाशीम, यवतमाळ, बुलढाणा, अकोला, सोलापूर, हिंगोली, धाराशिव, परभणी, अमरावती, जळगाव, वर्धा, सांगली, अहिल्यानगर, छ. संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धुळे, जळगाव, रत्नागिरी, चंद्रपूर, सातारा, नाशिक, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, गडचिरोली, रायगड व नागपूर.

# चोरांचे सरकार राज्यात सत्तेवर : संजय राऊत



**मुंबई :** मुंबईत भाजपचा महापौर व्हावा असा आदेश भाजप नेते अमित शहा यांनी दिला होता. म्हणजे मराठी माणसाची उरली सुरली मुंबई गिळून टाका. तेव्हा शिंदे मागेमागे फिरत होते. मुंबईच्या महापौर पदाबाबत एकनाथ शिंदेंनी एक चकार शब्द ही काढला नाही, असे उबाठाचे नेते संजय राऊत यांनी म्हटले आहे. संजय राऊत म्हणाले की, शिंदे मुंबई महापौर पदाबाबत का बोलले नाही. भाजपचा म्हणजे अमराठी महापौर व्हावा असे त्यांचे मत आहे. अमित शहा यांनी चोरुन बाळासाहेब ठाकरेंची शिवसेना तुम्हाला दिली ना? ठाकरे बंधू ठरवतील तोच व्यक्ती मुंबईचा महापौर होईल. आमचे काय उखडायचे ते उखाडा हे मी दिल्लीतील नेत्यांना आणि एकनाथ शिंदेंना म्हणतोय, असेही त्यांनी म्हटले आहे. संजय राऊत म्हणाले की, एका आयपीएस अधिकाऱ्याला तुम्ही तुमच्या पक्षातील चोरांसाठी झापत आहात अजित पवार कुठे गेली तुमची शिस्त. उपमुख्यमंत्री म्हणून घेणाऱ्या अजित पवार यांना मंत्रिमंडळात राहण्याचा अधिकार नाही.

# आश्रमशाळांमध्ये अतिरिक्त तासिकेचे वेळापत्रक तयार करा : डॉ. अशोक वुईके



**मुंबई :** आदिवासी शासकीय आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, तसेच त्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी प्रत्येक शाळेत विद्यार्थी पटसंख्येच्या आधारावर अतिरिक्त तासिका घेण्याबाबत वेळापत्रक तयार करण्याचे निर्देश आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी आश्रमशाळांच्या मुख्याध्यापकांना दिले. मंत्री डॉ. वुईके यांच्या अध्यक्षतेखाली आश्रमशाळा मधील शिक्षक भरती संदर्भात बैठक मंत्रालयात घेण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीस आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे, आदिवासी विकास विभागाच्या आयुक्त लीना बनसोड, आदिवासी विकास विभागातील सर्व अप्पर आयुक्त, सर्व प्रकल्प अधिकारी, आश्रमशाळा मुख्याध्यापक दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. मंत्री डॉ. वुईके म्हणाले, आदिवासी मुलांचे भविष्य घडविण्यासाठी दर्जेदार शिक्षणाची गरज आहे. शिक्षकांची रिक्त पदे ही विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी अडथळा ठरत होती. आश्रमशाळांमध्ये मोठ्या प्रमाणावर शिक्षकांची पदे रिक्त असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर त्याचा परिणाम होत होता. या पार्श्वभूमीवर शासनाने बाह्यस्त्रोत पद्धतीचा अवलंब करून शिक्षकांची तत्काळ नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला आहे.

# ओबीसींना पद्धतशीरपणे खेळवले : विजय वडेट्टीवार



**सांगली :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा आरक्षणाच्या मुद्यावर मराठा व ओबीसी या दोन्ही समुदायांना पद्धतशीरपणे खेळवल्याचा आरोप काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी शुक्रवारी येथे आयोजित एका कार्यक्रमात बोलताना केला. महायुतीचे सरकार बाभळीच्या झाडाला दगड मारते आणि त्यानंतर आंबे पडले म्हणून ओरड करते, असेही ते यावेळी म्हणालेत. काँग्रेसचे दिवंगत ज्येष्ठ नेते डॉक्टर पतंगराव कदम यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ उभारण्यात आलेल्या लोकतीर्थ स्मारकाच्या लोकार्पण सोहळ्याला आज 1 वर्ष पूर्ण झाले. यानिमित्त आयोजित एका समारंभात बोलताना विजय वडेट्टीवार यांनी मराठा आरक्षणाच्या मुद्यावर सरकारने काढलेल्या जीआरवर संशय व्यक्त केला. ते म्हणाले, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री फार चतूर व चाणाक्ष आहेत. त्यांनी दोन्ही समाजांना पद्धतशीरपणे खेळवण्याचे काम केले. त्यांनी जो जीआर काढला आहे, त्याचा काहीच अर्थ लागत नाही. ओबीसींना काय दिले हेच समजत नाही. एकाने मारल्यासारखे करायचे आणि दुसऱ्याने रडल्यासारखे करायचे अशा पद्धतीचे स्क्रिप्टेड काम सध्या राज्यात सुरू आहे. भविष्यात या प्रकरणी सर्वांच्या तोंडाला पाने पुसल्याचे दिसून येईल. राज्य शासनाने काढलेल्या जीआरचा अर्थच कळत नाही. महायुतीचे हे सरकार बाभळीच्या झाडाला दगड मारते आणि आंबे पडले म्हणून ओरडते. पण प्रत्यक्षात जवळ गेले की, पायात काटे रुततात. जे-जे त्यांच्या जवळ गेले त्यांना ते कळेल, असे वडेट्टीवार म्हणाले.

# शासनाकडून जिल्हा नियोजनासाठी २२ हजार कोटी

## ग्रामपंचायतींनी निधीचा सुयोग्य वापर करावा : उपमुख्यमंत्री अजित पवार

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ५ :**




महाराष्ट्र शासनाने चालू आर्थिक वर्षासाठी जिल्हा वार्षिक नियोजनाखाली तब्बल २२ हजार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला असून, त्यातील मोठा हिस्सा जिल्हा परिषदेमार्फत थेट गावपातळीपर्यंत पोहोचतो. ग्रामपंचायतींनी हा निधी पारदर्शक व सुयोग्य पद्धतीने वापरून गावांचा सर्वांगीण विकास साधावा. भारताचा आत्मा खेड्यांत आहे. खेडी समृद्ध झाली तर देश समृद्ध होईल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. पुण्यातील गणेश कला क्रीडा रंगमंच येथे आयोजित मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी उपमुख्यमंत्री पवार बोलत होते.

यावेळी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, खासदार मेधाताई कुलकर्णी, आमदार शंकर मांडेकर , आमदार बाबाजी काळे, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, अपर जिल्हाधिकारी सुहास मापारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीकांत खरात, भूषण जोशी, माजी सनदी अधिकारी डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी यांच्यासह राज्यातील तज्ज्ञ मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, महाराष्ट्र शासनाने येत्या १७ सप्टेंबरपासून म्हणजेच मराठवाडा मुक्ती दिनापासून पुढील १०० दिवस मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या अभियानाद्वारे प्रत्येक गावाने स्वतःचा विकास आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे. शासनाने या अभियानासाठी तब्बल २४५.२० कोटी रुपयांची बक्षीस योजना आखली आहे. यातून राज्यस्तर, विभागस्तर, जिल्हास्तर आणि पंचायत समिती स्तरावरील स्पर्धा होणार असून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींचा गौरव केला जाणार आहे. स्वच्छता, शाश्वत विकास, हरित उपक्रम, महिला व बालकांच्या विकासासाठी घेतलेला पुढाकार आदी निकषांवर गावांचे मूल्यमापन होईल.

पवार म्हणाले की, मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान हे सर्वांना सोबत घेऊन चला या संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकासाच्या ध्येयावर आधारित उपक्रम आहे. त्याचे प्रमुख घटक म्हणजे सुशासनयुक्त पंचायत निर्माण करणे, पंचायत संस्थांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणे, जलसमृद्ध व हरित गावांची निर्मिती, मनरेगा व इतर योजनांचे अभिसरण साधणे, ग्रामपातळीवरील संस्थांचे सक्षमीकरण करणे, उपजीविका व सामाजिक न्याय सुनिश्चित करणे तसेच लोकसहभागातून लोकचळवळ निर्माण करणे हे आहेत.

आज प्रत्येक गावाला शासनाकडून मोठ्या प्रमाणात निधी मिळत आहे. तो योग्य ठिकाणी खर्च करणे, गावांच्या गरजांनुसार प्राधान्य ठरविणे आणि कामांचा दर्जा उंचावणे ही ग्रामपंचायतींची जबाबदारी आहे. पारदर्शकतेसह जनतेच्या विश्वासास पात्र राहून ग्रामविकासाची कामे झाली पाहिजेत.

# बारामती मेडिकल कॉलेजच्या अध्यक्षपदी सुनेत्रा पवार

## खा. सुप्रिया सुळे यांना अध्यक्षपदावरून हटवले



■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ५ :** बारामती येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयाच्या अभ्यागत मंडळावर आता खासदार सुप्रिया सुळे यांच्याऐवजी खासदार सुनेत्रा पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांच्या विभागाने याबाबतचा निर्णय घेतला आहे. 2021 मध्ये महा विकास आघाडी सरकार असताना या मंडळावर सुप्रिया सुळे यांची नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, राज्यातील सत्तांतरानंतर हा बदल करण्यात आला आहे. अभ्यागत मंडळाच्या अध्यक्षा म्हणून आता सुनेत्रा पवार काम पाहणार आहेत. या पदाचा कार्यकाळ दोन वर्षांचा असतो. मंडळातील सदस्यः सुनेत्रा अजित पवार (अध्यक्ष), ज्योती नवनाथ बल्लाळ, डॉ. कीर्ती सतीश पवार, डॉ. सचिन कोकणे, ॲड. श्रीनिवास वायकर, डॉ. दिलीप लोंढे, अविनाश गोफणे आणि बिरजू मांढरे या नऊ सदस्यांची या मंडळावर नियुक्ती करण्यात आली आहे. यापूर्वी या वैद्यकीय महाविद्यालयाच्या कार्यकारिणीवर सुप्रिया सुळे यांची नियुक्ती होती, पण आता राज्यसभेच्या खासदार सुनेत्रा पवार यांची निवड झाल्यामुळे राजकीय वतुर्ळात पुन्हा एकदा चचेर्ला उधाण आले आहे.

# फटाक्यांच्या दुकानाला भीषण आग

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :**



मुंबईतील मालाड परिसरात गुरुवारी सायंकाळी मोठी दुर्घटना घडली. मालाड पोलीस ठाण्यामागील उंद्राई मार्गावर असलेल्या फटाक्यांच्या दुकानाला सायंकाळी 7 वाजताच्या सुमारास भीषण आग लागली. आगीचे प्रमाण इतके मोठे होते की परिसरात एकच गोंधळ उडाला. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही; मात्र दुकानाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

दुर्घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान तात्काळ घटनास्थळी दाखल झाले आणि मदतकार्य सुरू केले. दुकानाला आग लागल्याचे समजताच आजूबाजूच्या नागरिकांनीही तातडीने सुरक्षित स्थळी धाव घेतली. अरुंद चाळीत असलेल्या या दुकानामुळे आणि प्रचंड धुरामुळे जवानांना आग विझवण्यात मोठ्या प्रमाणात अडचणी आल्या. आग सुमारे 30 बाय 30 चौरस फूट जागेत पसरली होती. तिची वाढती तीव्रता पाहता अग्निशमन दलाने सायंकाळी 7.27 वाजता क्रमांक एकची वर्दी दिली. यानंतर अतिरिक्त पथके घटनास्थळी दाखल झाली. जवानांनी अथक प्रयत्न करत पाणी व फोमचा वापर करून आगीवर नियंत्रण मिळवण्याचे काम हाती घेतले.

सुमारे तीन तास चाललेल्या प्रयत्नांनंतर रात्री 10.30 वाजता आग पूर्णपणे विझवण्यात यश आले. यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी दुकानातील माल, फटाके आणि इतर साहित्य जळून खाक झाले आहे. या घटनेनंतर परिसरात घबराटीचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी घटनास्थळ सुरक्षित करून चौकशी सुरू केली आहे. आगीचे नेमके कारण अद्याप समोर आले नसून शॉर्टसर्किटमुळे आग लागली असावी असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

# आयपीएस अधिकाऱ्याला जरा पण छळले तर कोर्टात खेचेन : अंजली दमानिया

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :**



सोलापूरमध्ये करमाळ्याच्या महिला आयपीएस अधिकारी डीएसपी अंजना कृष्णा आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात फोन आणि व्हिडिओ कॉलवरून जोरदार वाद झाला. प्रत्यक्षात, डीएसपी अंजली कृष्णा रस्ते बांधकामासाठी बेकायदेशीर वाळू उत्खननाच्या तक्रारीवर कारवाई करण्यासाठी माढा तालुक्यातील कुर्डू गावात पोहोचल्या होत्या. गावकरी आणि घटनास्थळी असलेल्या अधिकाऱ्यामध्ये वाद झाला. या वादातून राष्ट्रवादी कॉंग्रेसचे कार्यकर्ते बाबा जगताप यांनी थेट अजित पवारांना कॉल लावला होता. त्यानंतर अजित पवारांनी या महिला अधिकाऱ्याला दम भरल्याचे समोर आले. या प्रकरणावरून राजकीय वतुर्ळात चर्चा होण्यास तसेच अजित पवारांवर टीका होण्यास सुरू झाले आहे. अजित पवारांचा पुतण्या व शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार हे सातत्याने अजित पवारांवर टीका करत असतात, परंतु अशा वेळी मात्र रोहित पवारांनी अजित पवारांची पाठराखण केली असल्याचे समोर आले आहे. तर दुसरीकडे सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी मात्र कोर्टात खेचण्याची भाषा केली आहे. अजित पवारांच्या पक्षातील आमदार अमोल मिटकरी यांनी पोलिस अधिकारी अंजना कृष्णा यांच्या शैक्षणिक कागदपत्रांची तपासणी करण्याची मागणी केली आहे.

# पावसाचा जोर वाढणार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :**

मुंबईत आजपासून पावसाचा जोर वाढणार असल्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. मागील काही दिवसांपासून अधूनमधून हलका ते मध्यम पाऊस होत असला तरी, आता पुन्हा एकदा मुसळधार सरींची शक्यता वर्तवली गेली आहे. सकाळपासूनच शहरात आकाश ढगाळ असून, दुपारनंतर मुसळधार पावसाचा जोर वाढेल, असा अंदाज हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. विशेषतः दादर, अंधेरी, गोरेगाव, बोरीवली, मुलुंड, ठाणे आणि नवी मुंबई या भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाऊस होण्याची शक्यता आहे. मुंबईत पावसाचा जोर वाढल्याने रेल्वे वाहतुकीवर परिणाम होऊ शकतो, तसेच काही ठिकाणी पाणी साचण्याच्या घटना घडू शकतात. समुद्र किनाऱ्यालगत राहणाऱ्या नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

मुंबईसोबतच महाराष्ट्रातील इतर भागातही पावसाचा जोर वाढण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. कोकण, विदर्भ आणि मराठवाडा या भागांमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज असून, काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी वाऱ्यांची शक्यता आहे. पुणे, नाशिक, नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, परभणी आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. कोकणातील रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये मुसळधार सरींचा अंदाज वर्तवला गेला आहे. ग्रामीण भागात आधीच मोठ्या प्रमाणावर शेतीकामे सुरू झाली असून, या पावसामुळे खरीप हंगामाला गती मिळेल, असा अंदाज तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. मात्र, अतिवृष्टी झाल्यास शेतकऱ्यांच्या पिकांवर आणि जनजीवनावर परिणाम होऊ शकतो.

या मुसळधार पावसामागे अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्या कारणीभूत असल्याचे हवामान तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे. समुद्रावरून येणारे ओलसर वारे राज्यातील विविध भागांमध्ये ढगांचा विकास घडवत आहेत. याशिवाय मान्सूनची रेषा सध्या महाराष्ट्राच्या वरच्या भागावर सक्रिय आहे, त्यामुळे पुढील 3 ते 5 दिवस पावसाचा जोर कायम राहणार आहे. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, या काळात काही जिल्ह्यांत मुसळधार ते अति मुसळधार पावसाच्या सरींची शक्यता असून, नद्यांच्या पाणीपातळीत वाढ होण्याची भीती आहे. किनारी भागांत उच्च भरतीमुळे पाणी साचण्याचा धोका वाढू शकतो. हवामान विभागाच्या इशाऱ्यानंतर राज्य प्रशासनाने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सतर्क राहण्याचे आदेश दिले आहेत. विशेषतः कोकण आणि विदर्भातील नद्यांच्या काठावर असलेल्या गावांमध्ये पुरसदृश्य परिस्थिती उद्भवू नये यासाठी पथके तैनात ठेवण्यात आली आहेत. मुंबई महापालिकेने शहरातील नालेसफाईचे काम पूर्ण केले असल्याचे सांगितले असले तरी, मुसळधार पावसामुळे काही भागांत पाणी तुंबण्याची शक्यता कायम आहे. शाळा, महाविद्यालये आणि कार्यालयांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या असून, नागरिकांना अनावश्यक प्रवास टाळण्याचे आवाहन करण्यात आले.

# दरवर्षी वैद्यकीय तपासणीसाठी ५ हजार रुपये

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :**



राज्य शासनाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून आता त्यांना मुंबईतील प्रतिष्ठित बॉम्बे रुग्णालयात आरोग्यविषयक तपासण्या करण्याची परवानगी मिळाली आहे. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे राज्य सरकारच्या विविध विभागांमध्ये कार्यरत असलेल्या सुमारे १७ लाख कर्मचाऱ्यांना याचा थेट लाभ मिळणार आहे.

राज्य सरकारने शासकीय अधिकारी व सरकारी कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी यासंदर्भात बुधवारी शासन निर्णय जारी केला आहे. राज्य शासनाच्या सेवेत कार्यरत असलेले ४० ते ५० वयोगटातील सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना दोन वर्षातून एकदा व ५१ वर्षांवरील शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना दरवर्षी वैद्यकीय तपासणीसाठी ५ हजार रुपये अदा करण्यात येतात. आत्तापर्यंत कर्मचाऱ्यांना फक्त शासकीय वैद्यकीय महाविद्यालये आणि सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीत असलेल्या रुग्णालयांमध्येच तपासणी करण्याची परवानगी होती. मात्र, काही चाचण्या या ठिकाणी उपलब्ध नसल्यामुळे कर्मचाऱ्यांची गैरसोय होत होती. ही समस्या लक्षात घेता, सरकारने बाहेरील खासगी रुग्णालयात, म्हणजेच बॉम्बे रुग्णालयात चाचण्या करण्याची परवानगी दिली आहे.

कर्मचाऱ्यांना आता आवश्यक असलेल्या सर्व चाचण्या एकाच ठिकाणी आणि सोप्या पद्धतीने करता येणार आहेत. सरकारी कर्मचाऱ्यांनी सरकारच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे. एका कर्मचाऱ्याने सांगितले की, सरकारी रुग्णालयात काही चाचण्यांसाठी खूप वाट पाहावी लागत होती, तर काही उपलब्धच नव्हत्या. आता बॉम्बे रुग्णालयात तपासणी करता येणार असल्याने मोठा दिलासा मिळाला आहे.

# लालबागमध्ये गणपती विसर्जनासाठी यंदा खास तयारी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :**



मुंबईतल्या गणेशोत्सवात सर्वाधिक आकर्षण ठरणारा मानाचा पहिला गणपती लालबागचा राजा! गेल्या आठ दिवसांपासून लाखो भाविकांनी रांगा लावून दर्शन घेतलं. दिवसाला आठ लाखांहून अधिक भाविकांनी बाप्पाच्या मुखदर्शनाचा लाभ घेतल्याचा अंदाज आहे. आज मात्र या सोहळ्याची सांगता होणार आहे. गणेशभक्तांसाठी ही शेवटची रात्र विशेष महत्त्वाची आहे. कारण आज रात्रीपासून लालबागच्या राजाचे चरणस्पर्श थांबणार आहेत. दर्शनासाठी हजारो भाविक अजूनही रांगेत उभे आहेत. पण मध्यरात्रीनंतर ही रांग बंद केली जाईल. त्यामुळे ज्या भक्तांनी अद्याप दर्शन घेतलेलं नाही, त्यांच्यासाठी आजचा दिवस शेवटचा आहे.

दरम्यान, उद्या सकाळपासून विसर्जन मिरवणुकीची धामधूम सुरू होणार आहे. प्रत्येक वर्षी भाविकांच्या समुद्रात लाखोंच्या संख्येने लोक सहभागी होतात. मात्र यंदा या विसर्जनासाठी खास व्यवस्था करण्यात आली आहे. यंदा परंपरागत तराफ्याऐवजी मोटराइज्ड तराफा वापरण्यात येणार आहे. गुजरातमध्ये खास बनवलेला हा तराफा ३६० अंशात फिरू शकतो. इतकंच नव्हे तर विसर्जनावेळी या तराफ्याभोवती स्प्रिंकलर्समधून पाण्याचे फवारे उडणार आहेत. मुंबईकरांसाठी हा अनोखा अनुभव पहिल्यांदाच पाहायला मिळणार आहे. त्यामुळे उद्याच्या विसर्जन सोहळ्याकडे संपूर्ण शहराचं लक्ष लागून राहिलं आहे.

# तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर बलात्कार

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ५ :**

पुण्यात एका तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर बलात्कार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. यानंतर आरोपीने तरुणीला तिच्या खासगी फोटो आणि व्हिडिओच्या आधारे ब्लॅकमेल करत लाखो रुपये उकळले. पीडित तरुणीने खराडी पोलिस ठाण्यात या संदर्भात तक्रार दाखल केली असून, पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मॅट्रिमोनी वेबसाइटवर पीडित तरुणी आणि शेंडगे यांची ओळख झाली होती. लग्नाचे आमिष दाखवून अमितने तरुणीचा विश्वास संपादन केला. त्यानंतर तो पुण्यात आला आणि त्याने तरुणीला एका हॉटेलमध्ये नेऊन तिच्यावर बलात्कार केला. या वेळी त्याने तरुणीचे खासगी फोटो आणि व्हिडिओ आपल्या मोबाईलमध्ये रेकॉर्ड केले.

बलात्कारानंतर अमितने तरुणीशी लग्न करण्यास नकार दिला. याउलट, तिच्याकडे 2 लाख रुपयांची मागणी करत त्याने ते फोटो आणि व्हिडिओ नातेवाईकांना आणि सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी दिली.

जेव्हा पीडित तरुणीने लग्नाबद्दल विचारले, तेव्हा आरोपीने आत्महत्या करण्याची धमकी देऊन त्यात तिचे आणि तिच्या कुटुंबीयांचे नाव घेणार असल्याचे सांगितले.

# सुरक्षेसाठी गणेश मंडळांमध्ये फेस डिटेक्टर

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ५ :**



मुंबईतील प्रसिद्ध गणेश मंडळांच्या गणपतीचे दर्शन घेण्यासाठी लालबाग - परळ - गिरगावात भाविकांची प्रचंड गर्दी होत आहे. सुरक्षेच्या दृष्टीने लालबागचा राजा, जीएसबी मंडळांनी पुढाकार घेत फेस डिटेक्टर ही यंत्रणा कार्यान्वित केली आहे.

मुंबईतील प्रसिद्ध गणेश मंडळांच्या गणेशमूर्ती पाहण्यासाठी देशभरातून लाखो भाविक मुंबईत दाखल होतात. लालबागचा राजा, चिंचपोकळीचा चिंतामणी, मुंबईचा सम्राट, मुंबईचा राजा, राजा तेजुकायाच्या दर्शनासाठी प्रचंड गर्दी होत असते. या गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि सुरक्षेच्या दृष्टीने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याची मागणी काही वर्षांपासून केली जात आहे. सध्या लालबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ व जीएसबी सार्वजनिक गणेशोत्सव समितीने फेस डिटेक्टर ही यंत्रणा कार्यान्वित केली आहे. अन्य मंडळांमध्ये मेटल डिटेक्टर व अन्य यंत्रणा लावण्यात आली आहेत.

फेस डिटेक्टर ही यंत्रणा प्रचंड महाग असल्याने छोट्या मंडळांना ते परवडत नाही. तसेच, यंत्रणा कुठून विकत घ्यायची, कशी हाताळायची, भाड्याने मिळते का याबाबतही मंडळांमध्ये अनभिज्ञता आहे. त्यामुळे या यंत्रणेचा फारसा विचार केला जात नाही, असे परळ विभाग सार्वजनिक ट्रस्टचे विश्वस्त मिनार नाटळकर यांनी सांगितले. आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेल्या मंडळांना ही यंत्रणा बसविणे अवघड नाही. मंडळात भाडेतत्त्वावर मेटल डिटेक्टर यंत्र आणण्यात आले होते. मात्र, दोन - तीन दिवसांपूर्वी त्यात बिघाड झाल्याने ते पुन्हा पाठवले, अशी माहिती खेतवाडीतील मुंबईचा सम्राट ६ वी गल्लीचे किरण शिंदे यांनी दिली. सुरक्षेच्या दृष्टीने मंडळात ५४ सीसीटिव्ही कॅमेरे, ८ मेटल डिटेक्टर बसविण्यात आले आहेत. मात्र, फेस डिटेक्टर यंत्रणा उभारण्यात आलेली नाही, असे मुंबईचा राजा मंडळातर्फे सांगण्यात आले.

फेस डिटेक्टर हे तंत्रज्ञान आज जगभरात सुरक्षा व्यवस्थेसाठी वापरले जात आहे. संशयित व्यक्तींचा शोध घेणे, गुन्हेगारांवर लक्ष ठेवणे किंवा गर्दीतून धोका निर्माण करू शकणाऱ्यांची ओळख पटवणे यासाठी हे तंत्रज्ञान उपयुक्त ठरते. काही मोठ्या उत्सवांमध्ये, रेल्वे स्थानकांवर, विमानतळांवर हे तंत्रज्ञान वापरले जाते. डेटा संकलन करणे मंडळांसाठी कठीण फेस डिटेक्शनमध्ये व्यक्तीचा चेहरा हा बायोमेट्रिक डेटा म्हणून नोंदवला जातो. या डेटाचा गैरवापर होऊ नये, यासाठी कठोर नियम आहेत. अशा डेटाचे संकलन व साठवणूक करण्याची जबाबदारी घेणे मंडळांसाठी कठीण होते.

तसेच, परवानगीची प्रक्रियाही वेळखाऊ असते. त्यामुळेही सर्रास सर्व मंडळे या यंत्रणेचा वापर करत नाहीत. परंतु आता हळूहळू सुरक्षेच्यादृष्टीने फक्त व्यवस्थेवर अवलंबून न राहता मंडळे स्वतत्त्व सुरक्षेसाठी सतर्क झाली आहेत.

### पात्र अनुकंपा उमेदवारांना १५ सप्टेंबरला नियुक्ती आदेश

**यवतमाळ** : मुख्यमंत्र्यांनी १५० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत अनुकंपा नियुक्ती देण्यासाठी बुधवारी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मेळाव्यामध्ये यादीतील उमेदवारांना बोलावून, उमेदवारांच्या प्रतीक्षा सूचीनुसार गट क आणि ड मध्ये नियुक्तीसाठी उपलब्ध पदे विचारात घेऊन उमेदवारांची मेळावामध्ये नियुक्तीसाठी शिफारसपत्रे घेण्यात आली. शिफारसीनुसार कागदपत्राची पडताळणी करून पात्र उमेदवारांना शासन वेळापत्रकानुसार कार्यवाही करून अनुकंपा नियुक्तीचे आदेश १५ सप्टेंबरला निर्गमित करण्यात येणार आहेत. अनेक उमेदवारांना आपला नंबर लागेल अशी अपेक्षा आहे.

# वणी येथे रविवारी राज्यस्तरीय कापूस सोयाबीन उत्पादक परिषद



**वणी, दि.५, महासागर प्रतिनिधी**: येथे कापूस व सोयाबीन उत्पादक परिषद आयोजित केली आहे. परिषदेला किसान आंदोलनाचे नेते, अखिल भारतीय किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष का .राजन क्षीरसागर, विदर्भातील ज्येष्ठ अर्थतज्ञ. डॉ. श्रीनिवास खांदेवाले, ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते भाई तुकाराम भस्मे, किसान सभेचे राज्य अध्यक्ष ॲड. हिरालाल परदेशी, सरचिटणीस अशोक सोनारकर यांचा प्रमुख सहभाग सदर परिषदेमध्ये असेल. महाराष्ट्रातील कापूस सोयाबीन उत्पादक जिल्ह्यातील प्रतिनिधी सुद्धा असेल. महाराष्ट्रातील १९ जिल्ह्यामध्ये कापूस,सोयाबीन हे पीक घेतले जाते. राज्यातील ११५ तालुके कापूस उत्पादक तालुके म्हणून घोषित केलेले आहेत .महाराष्ट्रातील सात जिल्ह्यामध्ये सोयाबीन हे पीक घेतले जाते. शेतीमध्ये स्वतः कष्ट करून जगणारे शेतकरी या पिकांवर विसंबून आहेत .शेतकरी आत्महत्यांचा सर्वे करण्यात आला त्यामध्ये सर्वाधिक आत्महत्या कापूस उत्पादकांच्या आहेत. त्यातल्या त्यात त्या महाराष्ट्रातल्या आहेत, विदर्भातल्या आहेत, अमरावती व यवतमाळ जिल्ह्यातल्या आहेत. महाराष्ट्रातील विविध पीक परिस्थितीमध्ये कापूस या पिकाचा हक्काचा लढा ही गोष्ट महाराष्ट्राकरिता नवीन नाही.

सन १९७२ पासून कापूस उत्पादकांची ही लढाई सातत्याने सुरूच आहे. लढ्याच्या या काळात शेतकरी आत्महत्यां प्रचंड वाढल्या.

भारतीय संसदेने शेतकरी आत्महत्यांचे कारण शोधणे व इलाज शोधणे यासाठी डॉ. एम. एस. स्वामीनाथन आयोगाची स्थापना केली. सप्टेंबर १९८६ मध्येच भारतीय संसदेच्या पटलावर सदर आयोगाचा अहवाल सादर झाला. सरकारे आली आणि गेली. पण कापूस सोयाबीन उत्पादकांचे प्रश्न व आयोगाच्या शिफारशी आपल्या जागी खितपत आहेत. किसान सभेने सदर राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन केले आहे.

परिषदेला सर्व कापूस सोयाबीन उत्पादक जिल्ह्यातून शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन अनिल हेपट, अनिल घाटे, सतीश चौधरी, ओमप्रकाश कुठेमाटे ,विनोद जोशी, सुनील मेटकर, संतोष सुरजुसे, कैलास ठाकरे राजाभाऊ बाभुळकर ,प्रकाश सोनोने, चंद्रकांत वडस्कर ,संजय मंगळे, राहुल मंगळे ,संजय सुने ,प्रा.अरविंद वानखेडे, डॉ.नामदेव बजरके ,उमेश बनसोड, पंकजआवारे ,शुभम बाळापुरे, बाळासाहेब कोकाटे यांनी केले आहे.

# पुसद वाशिम रोडवर सत्तरमाळ घाटात भिषण अपघातात १ ठार ३ गंभीर



**पुसद, दि.५, महासागर प्रतिनिधी**: वाशिम वरून पुसद कडे KTC कंपनीचा सिंमेट घेवून येणा-या ट्रकने रस्याच्या कडेला थांबलेल्या नागरिकांना धडक दिल्याने त्यात १ ठार तर तीन जन गंभीर जखमी झाले.

घटनेचे सविस्वर वृत असे जामनाईक येथिल शे हबिल शे. रसुल वय ५५ त्यांची पत्नी हुसेना बी शे. हबिब वय ५० वर्ष व मुलगा शे . साजीद शे हबिब वय २४ वर्ष हे आपल्या मोटर सायकल ने अनसिंग वरून नवसाचे जेवन करून येत असताना, सतरमाळ घाटात गाडी बंद पडल्याने थांबले होते. दरम्यान श्रीराम शकला राठोड रा मारवाडी वय ६५ वर्ष त्यांच्या कडे गेले व का थांबले म्हणून गप्पा करत असताना सिंमेट ने भरलेला ट्रक T S । ० UC ५७६५ यांने येवून धडक दिली त्यामध्ये श्रीराम शकला राठोड हा जागीच ठार झाला.

घटना स्थळावरून चालक पसार झाला असून खंडाळा पोलीस त्याचा शोध घेत आहे.

## ओबीसी वरील अन्याय थांबवण्यासाठी दोन तारखेचा आदेश मागे घ्या

### ▪ ओबीसी आंदोलकांची मागणी




**यवतमाळ, दि.५, महासागर प्रतिनिधी**: राज्य सरकारने अतिशय चुकीच्या पद्धतीने भारतीय संविधानाचे विरोधात जाऊन २ सप्टेंबरला जीआर काढून ओबीसी मध्ये मराठयांना टाकून त्यांना कुणबी करण्याचा जो प्रयत्न चालू आहे, तो जीआर तात्काळ मागे घ्यावा ,याकरता आक्रोश आंदोलन प्रबोधन सभा महात्मा ज्योतिबा फुले चौकात आयोजित करण्यात आली होती ,परंतु पाण्यामुळे ती सभा नगरपालिकेच्या वाहन काळात घेण्यात आली ,याप्रसंगी ज्ञानेश्वर गोबरे ,सुनीता काळे ,प्राध्यापक सविता हजारे ,उमेश मेश्राम, सुनयना येवतकर, विनोद इंगळे, दीपक वाघ, शशिकांत लोळगे, उत्तमराव खंदारे , कमलताई खंडारे यांनी ओबीसीच्या जागृतीच्या संदर्भामधली भूमिका मांडली व ओबीसी जागृती चे जन आंदोलन तीव्र करण्याची भूमिका याप्रसंगी मांडली. जोपर्यंत जीआर मागे घेत नाही तोपर्यंत संवैधानिक न्यायालयीन व रस्त्यावरची लढाई आम्ही लढतच राहू या पद्धतीची भावना याप्रसंगी उपस्थित सर्वांनी व्यक्त केली.

## वाहन उलटले, सहा व्यापारी जखमी

**यवतमाळ**: अकोला बाजार मार्गावरील घाटामध्ये मालवाहू ॲपे वाहन उलटून दरीत कोसळले. यात सहा व्यापारी गंभीर जखमी झाल्याची घटना गुरुवारी दुपारी २ वाजता घडली. सुरेखा प्रकाश फुलमाई (वय ५५, पारवा), मंदा मोहन गभाने (वय ४५, पारवा), नीलेश रमेश जाधव (वय ४०, यवतमाळ), पृथ्वीराज सीताराम भवरे (वय ६०, रा. तळेगाव), प्रकाश महादेवराव फुलमाळी, अमोल विठ्ठलराव जगताप (वय ४५, रा. पारवा) अशी जखमींची नावे आहेत. हे सर्व जण आठवडी बाजारासाठी सावळी सदोबा येथे येत होते. चालकाचे नियंत्रण सुटल्याने वाहन सावळी सदोबा गावानजीकच्या घाटात उलटून दरीत कोसळले. अपघाताची माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळ गाठून जखमींना उपचारासाठी सावळी सदोबा प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले.

## आज मोरारी बापूंच्या राम कथेचा प्रारंभ होणार



**यवतमाळ, दि.५, महासागर प्रतिनिधी**: मागील अनेक वर्षापासूनची यवतमाळकरांची प्रतीक्षा संपली असून, ती मोरारी बापूंच्या राम कथेने आज पूर्ण होणार आहे. लोकमत ग्रुपचे प्रमुख विजय दर्डा यांनी मागील अनेक वर्षापासून मोरारी बापूंची तारीख घेण्यासाठी प्रयत्न केले होते, त्यात मागील महिन्यात यश आले आहे. ठरल्यानुसार मोरारी बापू उद्या दिनांक ६ सप्टेंबर रोजी, सकाळी ११ वाजता यवतमाळात येऊन, दर्डा उद्यानात दाखल होणार आहे.त्यानंतर ते उद्या शनिवारी २.३० वाजता दारव्हा मार्गावरील खासगी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या यार्डातील सभागृहात रामकथेचा शुभारंभ करणार आहेत. राम कथेदरम्यान जैन धर्मीय लोकेश मुनी. लोकमत परिवार प्रमुख विजय दर्डा, राजेंद्र दर्डा व परिवारातील अनेक सदस्य आणि यवतमाळ जिल्ह्यातील अनेक लोकप्रतिनिधी सामाजिक कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

## सरपंचासह दोघांवर विनयभंगाचा गुन्हा

**पुसद** : अतिक्रमण का काढले नाही, असे म्हणत सरपंचासह अन्य दोघांनी विवाहित महिलेचा विनयभंग केला. ही घटना मंगळवारी मुंगशी येथे घडली. सरपंच अमेय अभय चव्हाण (३२), अजय उत्तमराव चव्हाण (५२), जसपाल दिनकर चव्हाण (५०) (सर्व रा. मुंगशी) अशी गुन्हा नोंद झालेल्यांची नावे आहेत. रस्त्यावर अवैध अतिक्रमण काढून टाकण्याची नोटीस मिळाल्यानंतर अतिक्रमणधारकाने एक-दोन दिवसांत अतिक्रमण काढून घेतो, असे ग्रामसेवकाला सांगितले. त्यानंतरही दोन सप्टेंबरच्या सायंकाळी महिला आपल्या मुलीसोबत एकटी घरीत होती. दरम्यान, सरपंचासह अन्य दोघे घरी आले, अतिक्रमण का काढले नाही, असे म्हणत महिलेचा हात पकडून विनयभंग केला. बुधवारी पीडितेने पुसद ग्रामीण ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून सरपंचासह दोघांविरुद्ध गुन्हा नोंद केला आहे.

## मोरारी बापू यांच्या प्रवचनानिमित्त वाहतुकीत बदल

**यवतमाळ, दि.५, महासागर प्रतिनिधी**: यवतमाळतील औद्योगिक परिसर मधील श्री चिंतामणी कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये ६ सप्टेंबर ते १४ सप्टेंबर दरम्यान होत असलेल्या श्री मोरारी बापू यांच्या राम कथा प्रवचनानिमित्त गर्दीचा विचार करता या मार्गावरील वाहतुकीत बदल करण्यात आला आहे सकाळी आठ ते सायंकाळी चार वाजेपर्यंत हा बदल राहणार असल्याचे पोलीस विभागाकडून सांगण्यात आले.

राम कथेनिमित्त सकाळी साडेनऊ ते दुपारी दीड या दरम्यान शहरातून तसेच ग्रामीण भागातून रामकथा ऐकण्यासाठी हजारोंच्या प्रमाणात भाविकांची गर्दी राहणार आहे त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होऊन एखादा गंभीर अपघात होऊ शकतो तसेच वाहतुकीची कोंडी देखील निर्माण होऊ शकते यातूनच कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असू शकते. त्यामुळे पोलीस विभागाने सहा सप्टेंबर २०२५ ते १४ सप्टेंबर २०२५ या दरम्यान सकाळी आठ ते सायंकाळी चार वाजेपर्यंत दारव्हा रोडनी यवतमाळ शहरात येणारी जड वाहने, चार चाकी, मालवाहतूक करणाऱ्या वाहनांचे मार्ग बदल करण्यात आले आहे. यामधून अत्यावश्यक सेवेची वाहने रुग्णवाहिका, फायर बिग्रेड, बसेस, पोलीस वाहने, वगळून शहराबाहेरून भोयर बायपास मागनि वाहतूक वळविण्यात आली आहे. ६ सप्टेंबरला दुपारी दोन ते रात्री दहा पर्यंत दारव्हा मागनि यवतमाळ शहरात जड वाहनासाठी प्रवेश बंद करण्यात आला आहे.

दिनांक सात सप्टेंबर ते १४ सप्टेंबर सकाळी आठ ते सायंकाळी चार वाजेपर्यंत वाहतुकीस प्रवेश बंद करण्यात आला आहे.

दारव्हा रोडने यवतमाळ कडे येणारी जड वाहने ही भोयर बायपास मार्गाने आरनी रोडने वळविल्या गेले आहेत वाहतूक व्यवस्थित केलेला बदल वाहन चालकांनी समजून घ्यावा आणि पोलिसांना सहकार्य करावे असे आवाहन पोलीस अधीक्षक यांच्याकडून करण्यात आले आहे.

## गणरायाच्या विसर्जनासाठी न. प. प्रशासन सुसज्ज!

**यवतमाळ, दि.५, महासागर प्रतिनिधी**: लाडक्या गणरायाला शनिवारी निरोप दिल्या जाणार आहे. शहरातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ आणि कौटुंबिक स्तरावर मोठ्या प्रमाणात गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात येते. गणेश विसर्जन वेळी एकाच ठिकाणी गर्दी होऊ नये या दृष्टिकोनातून यवतमाळ नगर पालिकेने दरवर्षीप्रमाणे या वर्षीही विसर्जनाची जय्यत तयारी केली आहे. शहरातील ३१ ठिकाणी कृत्रिम टाके तयार केले आहेत. तर परंपरागत विसर्जन ठिकाणी असलेल्या विहिरी आणि टाक्यांचीही स्वच्छता करण्यात आली आहे. मुख्याधिकारी तथा प्रशासक शुभम क्यात्तमवार यांचे मार्गदर्शनात प्रत्येक विसर्जन स्थळी आरोग्य विभागासह न. प. ची कर्मचारी यंत्रणा सज्ज राहणार आहे. लकडगंज विहिर, तलाव फैल, दत्त चौक मोठे टाके, संकट मोचन तलाव, उमरसरा व अन्य परंपरागत विसर्जन स्थळी मोठ्या गणेश मूर्तींचे विसर्जन केले जाते. त्या प्रमुख १० ठिकाणी न. प. यंत्रणेद्वारा निर्माल्य कलश ठेवण्यात येणार आहेत. ३१ कृत्रिम टाके : चांदोर नगर, नारंगी नगर, गिरीजा नगर, मातामाय नगर, भातृमंडल कार्यालय, साईनगर सांस्कृतिक भवन, ढोले लेआऊट, अनुश्री पार्क, आदर्शनगर, संजय गांधी शाळा, विभागीय कार्यालय वाघापूर, वैभव नगर वाघापूर, कमलेश्वर मंदिर लोहारा, जय विजय चौक, शिवाजी ग्राउंड, संताजी शाळा, ग्यानेश्वर मंदिर, साईमंदिर, सूरजनगर, रवीनगर, रंगोली मैदान, लक्ष्मीनगर, विठ्ठल- रुखमाई मंदिर, दत्तात्रय नगर लोहारा, तिरुपती नगर, श्रद्धानगर, गुरुकृपानगर वाघाडी, भारती अपार्टमेंट, आठवडी बाजार, अग्निशमन कार्यालय आर्णी रोड इत्यादी ३१ ठिकाणी कृत्रिम टाके तयार केले आहेत. अशी माहिती अधिकृत प्रसिद्धी पत्रकातून देण्यात आली आहे.

## आक्षेप सुनावणी संपली

**यवतमाळ**: नगरपरिषद प्रभाग रचना तयार करण्यात आली असून त्यावर आठ नगपरिषदेतील प्रारूपावर एकूण ६८ आक्षेप दाखल झाले होते. यावर सुनावणीची प्रक्रिया जिल्हाधिकारी यांच्या कक्षा घेण्यात आली. २ सप्टेंबरपासून सुरू झालेली सुनावणी प्रक्रिया ही गुरुवारी ४ सप्टेंबर रोजी संपुष्टात आली. आता जिल्हाधिकारी यावर काय निर्णय देतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आक्षेप मान्य झाल्यास त्या सुधारणेचा प्रस्ताव विभागीय आयुक्ताकडे पाठविला जाणार आहे. त्यांच्या मान्यतेनंतरच सुधारणा होणार आहे. आक्षेप फेटाळला गेला तरीसुद्धा आयुक्तांच्या मंजुरीनेच हा प्रस्ताव पुढे जाणार आहे. आर्णी, पांढरकवडा नगरपरिषद आणि ढाणकी नगरपंचायत येथे एकही आक्षेप प्राप्त झाला नाही. तर दारव्हा, नेर, घाटंजी येथून प्रत्येकी एक आक्षेप आला होता. तर दिग्रसमध्ये दोन आक्षेप होते. वणी येथे आठ, उमरखेड येथे ६, यवतमाळमध्ये २७ तर पुसद २२ आक्षेप दाखल करण्यात आले होते.

## मूर्तीचे सोन्याचे डोळे, टिळक चोरी



**ढाणकी** : टेंम्बेश्वरनगरातील दत्त मंदिरातून कृष्ण मूर्ती व दत्त मूर्तीला लावण्यात आलेले सोन्याचे चार डोळे व दोन टिळक चोरट्यांनी लंपास केले. ही घटना २ सप्टेंबरला उघडीस आली. डोळे व टिळक सात ग्रॅमचे असून, किंमत ७७हजार रुपये आहे. दत्त मंदिर येथील सेवक श्रीकृष्ण नंद अमृते यांनी यांच्या लक्षात ही घटना आली. त्यांनी याबाबत इतर सेवकांना विचारपूस केली. त्यानंतर चोरीची तक्रार कृष्णा मुनी अमृते यांनी बिटरगाव पोलिस ठाण्यात दिली.

## महसूल व कृषी विभागाच्या शिवार फेरीद्वारे पंचनामे सुरू



**ढाणकी**: नुकत्याच झालेल्या अतिवृष्टी व पुराच्या पाण्यामुळे ढाणकी परिसरासह करंजी, सावळेश्वर, अकोली, मन्नाळी, बिटरगाव या गावांतील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. नदी, नाले आणि ओढे ओसंडून वाहिल्याने काठावरील शेत जमिनीतील सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद यांसारख्या खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. काही ठिकाणी पिके पाण्याखाली गेली, तर काही ठिकाणी वाहून गेल्याने शेतकऱ्यांच्या हातातील ऐन बहरात आलेला हंगाम उद्ध्वस्त झाला. या पार्श्वभूमीवर उमरखेड तहसीलदार यांच्या सूचनेनुसार महसूल विभाग आणि कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी युद्धपातळीवर कार्यरत झाले आहेत. तलाठी रामदास गारोळे व कृषी सहाय्यक राहुल कांबळे यांनी प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन सर्वेक्षण व पंचनाम्यांचे काम सुरू केले आहे.

## वाढदिवसानिमित्त अनेकांनी विजय चोरडिया यांना दिल्या शुभेच्छा



**वणी, दि.५, महासागर प्रतिनिधी**: सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक, राजकारण, अशा विविध क्षेत्रात ठसा उमटविणारे भाजपाचे राज्य कार्यकारणी सदस्य विजय चोरडिया यांच्या वाढदिवसनिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस, माजी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी तसेच पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक हितचिंतकांनी शुभेच्छा देऊन अभिष्टचिंतन केले.

विजय चोरडियांचा दि. ४ सप्टेंबर ला वाढदिवस होता. वाढदिवसानिमित्त विनायक मंगल कार्यालयात आयोजित अभिष्टचिंतन सोहळ्यात आ. संजय देरकर, माजी आ. संजीवरेड्डी बोदकुरवार, माजी आ.विश्वास नांदेकर, माजी नगराध्यक्ष तारेंद्र बोर्डे, भाजपाचे जिला उपाध्यक्ष संजय पिंपळशेंडे, शहर भाजपा अध्यक्ष अँड निलेश चौधरी, विलास झट्टे, शिवसेनेचे शहर अध्यक्ष शिवराज पेचे, विद्युत कंत्राटदार राजाभाउ बिलोरीया, विश्व हिंदू परिषद व रोटरी क्लब चे पदाधिकारी तसेच सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा, राजकीय, कला, सांस्कृतिक, वैद्यकीय, विधितज्ज्ञ, पोलीस, शासकीय अधिकारी विविध संस्था, संघटना, विविध पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी, हितचिंतकांनी त्यांचे अभिष्टचिंतन केले.

## बाभुळगावात अल्पवयीन मुलीचा विनयभंग

**यवतमाळ**: अल्पवयीन १३ वर्षीय मुलगी घरी एकटी असतांना आरोपी बबन दत्तु खंडारे वय ५५ वर्ष रा.नेहरु नगर बाभुळगाव याने त्या अल्पवयीन मुलीचा विनयभंग करून जिवे मारण्याची धमकी देवून निघून गेल्याची घटना दि.४ सप्टेंबर रोजी बाभुळगाव येथील वॉर्ड न.५ मध्ये घडली. पीडित मुलीच्या आईच्या तक्रारीवरून बाभुळगाव पोलीसांनी कलम ३३३,६४,६५(१),३५१(३) BNS सहकलम ४,८,१०,१२ पोक्सोचा गुन्हा दाखल करून आरोपी बबन दत्तु खंडारे याला अक केली.

## वाघाच्या हल्ल्यात दोन गाई ठार

### ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण



**यवतमाळ, दि.५, महासागर प्रतिनिधी**: मारेगाव तालुक्यातील मुक्ता शेतशिवारात गुरुवारी (दि. ४ सप्टेंबर) सायंकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास वाघाच्या हल्ल्यात दोन गाई ठार झाल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेमुळे परिसरात प्रचंड भीतीचे सावट पसरले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शेतकरी श्यामसुंदर ढवस यांच्या गाई चराईवरून परतत असताना शेतातच वाघाने अचानक हल्ला केला. यात दोन्ही गाईंचा जागीच मृत्यू झाला. मृत गाईंची किंमत सुमारे ५० ते ६० हजार रुपये असल्याने शेतकऱ्याला मोठा आर्थिक फटका बसला आहे. या घटनेनंतर गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, ग्रामस्थांमध्ये संताप उसळला आहे. रात्रीच्या वेळी शेतशिवारात जाणे धोकादायक झाल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. घटनेची माहिती मिळताच कुणाल सावरकर वनरक्षक मार्डी , अक्षय सराटे वनसेवक वनविभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले.

## कोल्ही पुनर्वसन येथे रविवारी घुगरी उत्सव

**बाभूळगाव**: तालुक्यातील कोल्ही क्र. २ (बेंबळा पुनर्वसन) येथे भबुतपुरी महाराजांचा घुगरी उत्सव रविवारी (दि. ७) आयोजित करण्यात आला आहे. यानिमित्त सकाळी हभप लक्ष्मण महाराज तराळ यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. यानंतर महाप्रसादाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष दिवाकर चांभारे आदींनी केले.

## तो ७० लाखांचा निधी नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूटला देण्याचा निर्णय : मानवसेवा समिती



**यवतमाळ, दि.५, महासागर प्रतिनिधी**: सन.२००२ मध्ये यवतमाळात रमेशभाई ओझा यांच्या भागवत कथेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी भागवत कथेसाठी मानव सेवा समिती द्वारा २६ लाख रुपयांचा निधी गोळा करण्यात आला होता.परंतु , भागवत कथेचा खर्च आयोजक विजय दर्डा यांनी स्वतः करण्याचा निर्णय घेतला होता, त्यामुळे मानव सेवा समितीने गोळा केलेला २६ लाख रुपयांचा निधी शिल्लक राहिला होता. ती रक्कम बँकेत ठेवून आजमितीस त्याचे ८५ लाख रुपये झाले. त्यापैकी १५ लाख रुपये इतरत्र खर्च झाले व सत्तर लाख रुपये शिल्लक आहेत. तो ७० लाखाचा निधी यवतमाळ आजपासून सुरू होणाऱ्या मोरारीबापू यांच्या राम कथेसाठी उपयोगात आणण्याचा मनोदय मानवसेवा समितीने व्यक्त केला होता.परंतु या राम कथेचा खर्च सुद्धा आयोजक दर्डा परिवाराने करण्याचा निर्णय घेतल्याने, मानवसेवा समिती कडील शिल्लक असलेला २६ लाख रुपयांचा निधी नागपूर येथील नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूटला देण्याचा निर्णय मानव सेवा समितीने घेतल्याचे पत्रकार परिषदेत, समितीचे सचिव डॉक्टर सुरेंद्र पद्मावार, कार्याध्यक्ष अरुणभाई पोबारू, कोषाध्यक्ष किशोर दर्डा यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेला डॉक्टर प्रकाश नंदुरकर,डॉ. अजित फडके,एड. अटल, गोपलानी, अनिल पांडे, जगजित ओबेरॉय,विलास पांडे व अन्य संचालक उपस्थित होते

मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली नुकतेच झालेले आंदोलन केवळ काही मागण्यांचा उच्चार नाही, तर समाजाच्या अस्तित्वाची व सन्मानाची ती हाक होती. या आंदोलनाला शांतता, संयम आणि सामाजिक सलोख्याचा आधार होता. महिलांचा सन्मान राखणे, शासकीय संपत्तीचे रक्षण करणे, कायदा हातात न घेणे या त्यांच्या सूचनांमुळे हे आंदोलन लोकशाहीचा आदर्श ठरले. गरीब कुटुंबांसाठी शिक्षण आणि नोकरीच्या संधी मिळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. शासनाने केवळ तात्पुरते आश्वासन न देता कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, जेणेकरून पुढे पुन्हा आंदोलन करण्याची वेळ समाजावर येणार नाही. महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासात मराठा समाजाने स्वराज्य स्थापनेपासून ते आजच्या घडीपर्यंत शौर्य, बलिदान, त्याग व कर्तृत्वाचा सुवर्ण अध्याय लिहिला आहे. राज्याच्या सामाजिक-आर्थिक घडणीत आपला रक्ताचा प्रत्येक थेंब वाहणाऱ्या या समाजाची आज अवस्था अत्यंत वेदनादायी व हृदयद्रावक आहे.

आज मराठा समाजाचा निष्ठावंत पुत्र, जनतेच्या हक्कांसाठी झगडणारा नेता मनोज जरांगे पाटील हे आरक्षणाच्या न्याय्य मागणीसाठी आमरण उपोषणास बसले होते. त्यांच्या उपोषणामुळे संपूर्ण महाराष्ट्राच्या जनमानसात तीव्र अस्वस्थता निर्माण झाली होती. समाजातील प्रत्येक कुटुंब, प्रत्येक तरुण, प्रत्येक शेतकरी हा त्यांच्या लढ्याशी आत्मीयतेने जोडला गेला होता. मराठा हा तो प्रवाह आहे जो एकदा वहायला लागला की, त्याखाली भले भले नेस्तनाबूत होतात. ही ताकद ही ऊर्जा साडेतीनशे वर्षांनंतरही या रक्तात अशीच आहे. एवढं लढण्याचं बळ छत्रपती शिवराय देऊन गेले आहेत. अन्यायाविरुद्ध लढण्याचं धाडस हे मराठ्यांना छत्रपतींच्या संस्कारातून जन्मतःच मिळालं आहे. मग भले समोर कोणीही कितीही बलाढ्य असो त्याला नडण्याची धमक हा समाज करतो. इतिहासाच्या पानात राष्ट्रावर आलेल्या बलाढ्य शासकाना या समाजाने दिल्लीत जाऊन पाणी पाजले आहे असा लढवय्या इतिहास या समाजाला आहे.

महाराष्ट्रातील ग्रामीण भागात अलीकडे जे निसर्गचक्र बिघडले आहे, जे जागतिक हवामान बदलाचा भाग आहे, त्यामुळे सामान्य मराठा शेतकरी शेतीतून केवळ पोटा पाण्यापूरते जमवू शकतो अशी दयनीय स्थिती त्याची झाली आहे. शिवाय भौगोलिक दृष्ट्या महाराष्ट्रातील मध्य भागाला दख्खनचे पठार म्हणतात. पठारी स्वरूपाचा प्रदेश आहे त्यात पाण्याची अत्यंत टंचाई आहे. त्यामुळे सुविधांचीही वानना आहे. याकारणाने या ग्रामीण भागातील मराठा समाजाला न्याय अपेक्षित होता. सामान्य मराठा बांधवांना त्यांचा न्याय त्यांच्या पद्धतीने मिळत असेल तर इतरांनीही तो मोठ्या मनाने मान्य करावा. केवळ आपला त्यात काहीही संबंध नसताना त्याबद्दल काहीही बरळू नये. शिवाय तुम्ही चार सुखाचे घास खात असाल तर ते तसेच सुखाने खावे. इतरांच्या यशाचा द्वेष बाळगू नये. कारण लढा लढणाऱ्यांच्या मेहनतीचे ते यश असते. त्यांना त्यांचा विजय साजरा करू द्यावा आणि इतरांच्या यशातच आनंद मानणे हेच निरोगी मानसिकतेचे लक्षण आहे ही समज असणे आवश्यक आहे. त्यामुळे ज्यांचा उद्धार झाला त्यांना त्यांचा घास खाऊ द्यावा, उगाचच त्यात येऊ इच्छित नसणाऱ्यानी किंवा संबंध नसणाऱ्यानी काहीही वेडीवाकडी वक्तव्य करू नयेत. बाकी मराठा शेतकरी हा ज्याप्रमाणे गावगाड्याचा भाग आहे तो गावगाड्यात एकोप्याने राहतो, यापुढेही तो असाच राहील आणि ज्यापद्धतीने यावेळी अनेक जण माणुसकीच्या नात्याने मराठा बांधवांना मदत करण्यासाठी पुढे सरसावले त्यांचे सहकार्य समुद्राच्या रूपाने वेळप्रसंगी मराठा समाज परत करेलही. चुकीला चूक आणि बरोबरला बरोबर म्हणत नेहमी हा समाज सर्व जाती घटकांशी मिळून मिसळून राहत होता यापुढेही राहील.

# मराठा समाजाला आंदोलनाची वेळ यायलाच नको!






जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९९४२०

शेवटी आंदोलन करणाऱ्या नेतृत्वाच्या तब्येतीचा विचार करणे आवश्यक आहे. त्यात मनोज जरांगे पाटील चळवळीतून तावून सुलाखून आलेले आहेत. त्यामुळे आरक्षणाची एकेक शिडी पार करत आजपर्यंत यश मिळाले. जवळपास ५८ मोर्च्यांनी मशागत केली. त्यावर रोपाची लागवड करून फळ चाखायला देण्याचं काम जरांगे पाटीलांनी केले आहे. त्यामुळे छत्रपतींच्या स्वराज्यातील गनिमी काव्याचे मूर्तिमंत उदाहरण या आंदोलनात दिसले.

गावखेड्यातला मराठा आंदोलनाच्या निमित्ताने मुंबईत पोहोचला होता. तो शेतीवाडीत राबणारा, धान्य पिकवणारा आहे. गुरं ढोरांच शेण काढणारा आहे. यातले अनेक अल्पभूधारक आहेत. मजूर आहेत, ड्रायव्हर आहेत, गावाकडे छोट छोटे उद्योग करणारे हे बहूजन मराठीजन आहेत. जगण्याच्या, शेतीच्या, पोरांच्या शिक्षणाच्या, नोकरीच्या संबंधी त्याच्या विविध अडचणी आहेत.

आरक्षणाच्या निमित्ताने त्या अडचणींवर उपायांची त्यांची मागणी होती. मागणी करण्याचा, आपली व्यथा सांगण्याचा नैतिक अधिकार सर्वांना आहे. मुंबईला जगवण्यात, वाढवण्यात यांच खेडवळ मराठीजणांचा वाटा आहे. त्यांनी पिकवलेलं धान्य, भाजी पाला, दुध मुंबईतल्या लोकांना रोज लागतं. पण हे मराठीजन मराठा आंदोलक मुंबई पासून कायम दूर राहिले.

मुंबई मोठं शहर, देशाची आर्थिक राजधानी. देशभरातून आलेले माणसांचे लोंढे, ऊंच इमारती, झगमगाट, गाड्याच्या रांगा, गोंगाट. मुंबईतला दमटपणा हे सगळं गावखेड्यातल्या लोकांना नकोसं. पण यावेळी आपल्या मागण्या, अडचणी घेवून त्यांनी इर्षेने मुंबई गाठली. जरांगे पाटलांच्या हाकेला ओ दिली. पहिला दिवस अडचणीत गेला. प्यायला पाणी नाही, जेवायला अन्न नाही, राहण्याची व्यवस्था नाही. कृत्रिम अडचण निर्माण केली गेली होती.

काहींनी लालबागच्या राजाचा दरवाजा बंद केला, तर दुसरीकडे मुसलमानांनी आपल्या मशिदी या मराठाजनांसाठी खुल्या केल्या, पाण्याची, जेवणाची सोय झाली. जरा कड काढली. पण मागे न हटता मुंबईतच मुक्काम पक्का झाला. दुसऱ्या दिवसापासून गावाकडून शिदोऱ्या पोहोच झाल्या. आणि सुरु झालं या गावखेड्यातल्या मराठी जनांचं हटके आंदोलन.

यातल्या कित्येकाने आपली मुंबई, आपल्या मराठीजनांनी छाती वर गोळ्या झेलून मिळवलेली, आपल्याच लोकांनी ऊभी केलेली मुंबई पाहिलेली नव्हती. यांना मुंबईचं कौतूक होतं. पण मनात संकोच होता मुंबईत जाण्याचा, वावरण्याचा. या आंदोलनाच्या निमित्ताने तो संकोच दूर झाला.

जगातल्या सर्वांत मोठ्या, जून्या महानगरपालिकेच्या समोर उघडे होवून, शड्डू ठोवून अंघोळी करणारे हे गावगाड्यातले मराठीजन पाहिले अन् ही मुंबई आपलीच, आपल्या पासून कोणी मुंबई काढून घेवू शकत नाही, असं मनोमन उमटायला लागलं.

आंदोलकांनी डान्स करणं, विविध खेळ खेळणं अगदी मैदानावर कुस्ती, कबड्डी देखील लढणं. हे सगळं अभुतपूर्व होतं. अनेकांनी आयुष्यात कधी समुद्र पाहिला नव्हता; ते मरिन ड्राईव्ह वर समुद्राला स्पर्श करत होते. ताज हॉटेल, गेट वे ऑफ इंडिया ज्यांनी फक्त सिनेमात पाहिलं ते जवळून पाहत होते. जगण्यातला अनोखा, अनपेक्षित आनंद मराठी अर्थात मराठा आंदोलक मिळवत होते.

गेल्या नऊ दहा वर्षात चाललेला हा शांततेतला संघर्ष मुंबईच्या नावाखाली बदनाम होवू नये म्हणून मानवी जगण्यातला आनंद कायम राहावा. बाकी गुजराथी, मारवडी, जैन, पारशी अन् उत्तर भारतातल्या अनेक परप्रातियांनी या मराठीजनांच्या मुंबईवर आपलं अघोषीत वर्चस्व स्थापित केलं आहे. त्या सर्वांना या आंदोलनाच्या निमित्ताने एकच संदेश आहे की ही मुंबई आम्हा मराठाजनांची आहे व कायम राहिल.

मुंबईत पोहोचलेले मराठे आंदोलन संपले म्हणून शांततेने घरी गेले. पण आपल्या हाती काय लागले, याचा आता विचार करण्याची वेळ आली आहे. शासन निर्णय मराठा समाजाला हैदराबाद गॅझेटिअरमधील नोंदींच्या आधारावर कुणबी, मराठा-कुणबी किंवा कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी कार्यपद्धती निश्चित करतो.

वरवर पाहता, हा जीआर समाजाच्या मागणीला प्रतिसाद देणारा वाटतो, परंतु त्यात अनेक कायदेशीर आणि व्यावहारिक अडचणी असाव्यात असे वाटते.

सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाची मर्यादा ५०% पेक्षा जास्त नसावी, असा स्पष्ट निर्णय दिला आहे. यापूर्वी मराठा समाजाला दिलेले आरक्षण याच कारणामुळे रद्द झाले होते. हा जीआर जरी कुणबी जातीच्या प्रमाणपत्राचा मार्ग दाखवत असला तरी, मोठ्या संख्येने मराठा समाजाचा ओबीसी प्रवर्गात समावेश झाल्यास, ते ५०% ची मर्यादा ओलांडेल आणि पुन्हा न्यायालयात याला आव्हान दिले जाईल. ज्यामुळे प्रक्रिया अत्यंत गुंतागुंतीची होते.

प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या किंवा पूर्वजांच्या कुणबी नोंदी असलेले दस्तावेज सादर करावे लागतील. जर असे दस्तावेज नसतील, तर 'नातेसंबंधातील' व्यक्तीचा दाखला विचारात घेतला जाईल. परंतु, आंदोलनाचे प्रमुख मनोज जरांगे पाटील यांची मुख्य मागणी 'सरसकट' मराठा समाजाला कुणबी दर्जा देण्याची आहे.

सरकारला माहित आहे की 'सरसकट' जीआर न्यायालयात टिकणार नाही. म्हणून, हा जीआर एकप्रकारे केवळ प्रक्रिया निश्चित करतो, ज्यामुळे सरकारला कायदेशीर पेचप्रसंगातून तात्पुरता दिलासा मिळतो, परंतु समाजाची मागणी पूर्ण होत नाही. आता इतर मागासवर्गीय संघटनांकडून तीव्र विरोध होण्याची शक्यता आहे.

त्यांचा असा आरोप आहे की मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्रे देऊन सरकार 'मागच्या दाराने' त्यांना ओबीसी आरक्षणात प्रवेश देत आहे. यामुळे ओबीसी समाजाच्या हक्कांवर गदा येईल. यामुळे राज्यात दोन समाजांमध्ये सामाजिक तणाव वाढू शकतो आणि पुन्हा न्यायालयात आव्हान दिले जाईल.

'नातेसंबंधातील' व्यक्तींच्या पुराव्यांवर आधारित दाखले देण्याची तरतूद आहे. या तरतुदीमुळे कुणबी दाखला असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या रक्ताच्या आणि नात्यातील व्यक्तींना दाखले मिळणे सोपे होईल. हे प्रावधान मोठ्या प्रमाणात वादाचा विषय बनले आहे आणि यामुळे मोठ्या प्रमाणावर 'बनावट' दाखले तयार होण्याचा धोका आहे. सरकार एका बाजूला मराठा समाजाची मागणी मान्य करत असल्याचे भासवते, पण दुसऱ्या बाजूला ते ज्या कायदेशीर मर्यादांमध्ये काम करत आहे, त्या मर्यादा समाजाला पूर्णपणे स्पष्ट करत नाही.

हा एकप्रकारे राजकीय तोडगा आहे, कायदेशीर नव्हे. सरकार दाखले मिळवण्याची प्रक्रिया सुलभ करत असल्याचे सांगत असले तरी, प्रत्यक्षात पुराव्याची जबाबदारी प्रत्येक व्यक्तीवर टाकली आहे. यामुळे अर्जदारांना मोठ्या प्रमाणात अडचणींचा सामना करावा लागू शकतो. कुणबी नोंदी शोधण्यासाठी समितीला ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंत मुदतवाढ दिल्याचे म्हटले आहे. याचा अर्थ, सद्यस्थितीत तातडीने दाखले मिळणे शक्य नाही. हे केवळ आंदोलन शांत करण्यासाठी वेळकाढूपणा करत असल्याचा संशय निर्माण होतो.

थोडक्यात, हा शासन निर्णय मराठा समाजाला आरक्षण मिळवून देण्याच्या दिशेने एक पाऊल असले तरी, तो 'अर्धवट' आहे. तो एक तात्पुरता राजकीय उपाय आहे, जो दीर्घकाळ टिकणार नाही आणि भविष्यात अनेक कायदेशीर वाद निर्माण करेल. सरकार जनतेची दिशाभूल करत नसले तरी, कायदेशीर मर्यादांमुळे पूर्ण मागणी मान्य करणे शक्य नाही, हे स्पष्टपणे सांगण्याऐवजी, प्रक्रियात्मक उपाययोजनांवर जास्त भर देत आहे.

तरी पण असे म्हटले जाते की, शंभर टक्के गुण मिळवण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या विद्यार्थ्यांना कधी कधी ९०% वरही समाधान मानावे लागते. पण नेसन तर नऊवारी नेसल नाहीतर... या म्हणी प्रमाणे उगाच आडून बसून प्रश्न सुटत नसतात. पाटलांनी घेतलेला आजचा निर्णय योग्यच आहे. नुकसान न होता कमावले यातच दुहेरी फायदा आहे!



## बाप्पा नका ना जाऊ....!!

निघालात बाप्पा तुम्ही ऊर येतोय भरून
पावसानं आभाळ भरलंय कंठही आलाय दाटुन

ढोल ताशांचा नाद चहूकडे घुमतोय
सूर तालाच्या आवाजात निरोप तुम्हाला देतेय

मन मात्र माझं कासावीस झालंय बाप्पा
तुम्ही गेल्यावर मी सांगा कोणाशी मारू गप्पा

होता तुम्ही तेव्हा मनाचं घर किती आनंदलेलं
चैतन्याचं तोरण जणू हृदयाच्या दाराला लावलेलं

निघालात तुम्ही बाप्पा बघा आरास कशी रुसली
तुम्ही येणार म्हणून किती हौशीने होती सजली

होता तेव्हा तुम्ही आनंदाला नव्हता पारावार
जाताय बाप्पा आम्हाला आता कुणाचा असणार आधार

वाटतंय बाप्पा मला आता सोबत तुमच्या यावं
पालक माझे तुम्ही मी बालक बनून चालावं

चालता-चालता तुमच्यात स्वतःला विसरून जावं
बाप्पा-बाप्पा बोलत तुमच्या नामात एकरूप व्हावं

आल्या दिवसापासून कसा मोदक नैवेद्याचा सजलेला थाट
किती अवघड जाईल वर्षभर पहावी लागेल तुमची वाट

रोज गोड धोड प्रसाद रोज रंगायची आरती छान
जाताय आज तुम्ही या विचारानेच हरवलाय भान

दर्शनासाठी किती लागायची भक्तांची रांग
आता हे काहीच नसेल कसं मन रमेल बाप्पा तूच सांग

म्हणूनच म्हणते बाप्पा नका ना जाऊ या ना परत
आसनावर विराजमान व्हा आशीवार्दाचा हात वर करत

बाप्पा या ना परत
तुम्ही या ना परत

■ **ज्योती रावराणे**
**कांजूरमार्ग, मुंबई.**

■ ■ ■

## देवाचे देवपण राहू द्या!

**वाचक लिहितात**

सार्वजनिक गणेश उत्सव म्हणजे गणपती बाप्पांचा जयजयकार करून वातावरण भक्ती पूर्ण आनंदी करण्याचा उत्सव. गणपती हा सुखकर्ता, दुखहर्ता, विघ्नहर्ता, मंगलमय करणारा, १४ विद्येचा अधिपती, सर्वप्रथम पूज्यनीय, वंदनीय, बुद्धी दाता, ज्ञानदाता असून या दहा दिवसात जागृत राहून आपल्या भक्ताला नवचैतन्य देऊन हजार पटीने कार्यरत असतो. पूर्वी गणपती उत्सवाचे स्वरूप धार्मिक, प्रेरणादायी होते. भक्तांनी केलेली भावपूर्ण सजावट, भजनी मंडळांचे सुरेख पोशाख आणि मधुर भक्ती गीत, गाण्याचा कार्यक्रम, विविध प्रकारचे खेळ, चर्चासत्र, स्पर्धा असा भावपूर्ण सोहळा असायचा.

आजच्या काळात पूर्वीचे धार्मिक उत्सवाचे स्वरुप लोप पावत आहे. गणपतीचे चित्र छापलेली पत्रिका घरोघरी अंगणात तर कधी रस्त्यावर पडलेली दिसते. त्यावर लोकांचे पाय पडतात. कधी वाऱ्याने कचऱ्यात पत्रिका पडलेल्या आढळतात. हल्ली मनुष्य देवाचे देवपण विसरत चालला आहे. सार्वजनिक मंडळांमध्ये स्पर्धा आहे. स्वतःचा उदो उदो होण्यासाठी प्रदर्शन, भव्य झाक्या ठेवून, गणपतीचे चित्र असलेले विचित्र पोशाख घालून स्त्रियांबरोबर नाचत आहे.

ही देवाची विटंबना होत आहे. गणपतीचे दर्शन घेण्यासाठी पैसे घेऊन पावती देतात. त्या पावतीवर देखील गणपतीचे चित्र असतं. ती पावती देखील पायदळी तुडवल्या जाते. ह्या गोष्टी तरुण पिढीला केव्हा समजेल? सार्वजनिक गणपती लोकमान्य टिळकांनी ज्या उद्देशाने सुरू केला तो उद्देश सांगायला हवा. ज्या गणपतीची तुम्ही पूजा करता, त्याचे चित्र पायदळी तुडवता यामुळे त्या देवतेचा अपमान होतो, विडंबन होतं हे मंडळांना लक्षात आणून द्यायला हवे.

आमच्या लहानपणी गणपतीचे विसर्जन आता होणार या कल्पनेनेच डोळ्यात अश्रू यायचे. आताच्या ह्या काळात लोकांचा सात्विक भाव कमी होत चाललेला आहे. काही ठिकाणी अनंत चतुर्दशीला गणपती विसर्जन न करता पितृपक्षात विसर्जन करतात.जणू त्यांच्या हातात सर्व देवांचं देवपण आल्यासारखं झाले आहे.

काही लोक अनंत चतुर्दशीला विसर्जन करण्याच्या वेळेला मिरवणूक काढतात. डीजे चा आवाज इतका कर्कश आणि त्यावर फिल्मी गाने लावतात. सर्वजण मद्यधुंद होवुन नाचतात. स्वतःचाच मनोरंजनाचा कार्यक्रम करतात आणि सगळ्यात पाठीमागे गणपतीची गाडी ठेवतात. ह्या सर्व गोष्टी दिवसेंदिवस वाढत चाललेल्या आहेत.

मी गणपती रायाला एवढीच प्रार्थना करते,' चांगली बुद्धी व सात्विक भाव या लोकांच्या मनात आणून आध्यात्मिक शक्ती जागृत होवु दे. ह्या गोष्टीला आळा घालण्याची शक्ती आम्हाला दे .देव हा भावाचा भुकेला आहे दिखावू पणाचा, नेतागिरीचा देव नाही. देवाचे देवपण राखा. देवाचा खेळ मांडू नका.सर्वांनी उत्सव सात्विक भावाने साजरा करुया.अशी गणपती चरणी प्रार्थना करूया.

■ **सौ. पल्लवी देशपांडे**
**पद्मनाभपूर, दुर्ग.**

■ ■ ■

## पारंपारिक वाद्य नामशेष

आधुनिक काळात सण आणि उत्सव साजरे करण्याची पद्धत बदलल्यामुळे अनेक बदल झाले आहेत. या बदलांचा अयोग्य परिणाम समाजमनावर होत आहे. गणेशोत्सवाच्या काळात वाद्यांच्या गजरात गणेशाचे आगमन होते. वाद्य वाजवून गणेशाचे स्वागत केले जाते. विसर्जन मिरवणुकीच्या वेळेस देखील गणेशाला निरोप देताना वाद्य वाजवली जातात.

परंतु सध्याच्या काळात झांज, लेझीम, नगारा, ढोल, ताशा यांची जागा डीजे आणि डॉल्बी यांनी घेतली आहे. डीजे-डॉल्बी यांच्या कर्णकर्कश्य आवाजामुळे समाजाला त्रास होतो. शाळा, हॉस्पिटल्स यांच्या परिसरातून मिरवणूक जाताना डीजे आणि डॉल्बी यांच्या आवाजाचा विद्यार्थ्यांना आणि हॉस्पिटल्समधील रुग्णांना त्रास होऊ शकतो. हृदयविकाराचा धोका असतो.पर्यावरण, जीवसृष्टीची हानी होते. कांठाळ्या बसवणाऱ्या आवाजामुळे कर्णदोष निर्माण होण्याची भीती असते.

पारंपरिक वाद्य वाजवताना त्या कलाकारांना त्यांची कला दाखवण्याची संधी मिळते. वाद्ये वाजवून उपजीविका करणाऱ्यांना त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नापासून वंचित रहावे लागते. डीजे आणि डॉल्बी यांच्या मदतीने रिमिक्स असलेली कर्णकर्कश्य वाद्ये वापरण्याऐवजी झांज,लेझीम, नगारा, ढोल, ताशा अशी वाद्य वाजवून गणेशाच्या मिरवणुकीमध्ये सात्विक गाणी आणि सात्विक संगीत लावल्यास सणाचा आनंद द्विगुणीत होऊ शकतो.

■ **भीमराव साळुंखे. सातारा.**

## तुम्ही तुमच्या मुलाला तुमच्या आवडीचे नाव देवू शकत नाही




**डेन्मार्कमध्ये पालकांना त्यांच्या मुलांची नावे त्यांच्या आवडीनुसार ठेवण्याचे स्वातंत्र्य नाही. याचे कारण म्हणजे २००६ पासून लागू असलेला वैयक्तिक नावे कायदा.**



**याअंतर्गत,** पालकांना सरकारने तयार **केलेल्या ७००० नावांच्या यादीतून त्यांच्या मुलाचे नाव निवडावे लागते. त्यात सुमारे ४००० मुलींची आणि ३००० मुलांची नावे आहेत.**

**सरकारचे म्हणणे आहे की हे नाव मुलांच्या संपूर्ण आयुष्यावर परिणाम करते. विचित्र किंवा मजेदार नावे मुलांसाठी समस्या बनू शकतात. म्हणून, अशा नावांवर बंदी घालण्यासाठी कायदा करण्यात आला आहे.**



**जर एखाद्या पालकाला यादीबाहेर नाव ठेवायचे असेल तर त्यांना सरकारच्या नाव तपासणी विभागाची परवानगी घ्यावी लागेल. त्यांना ते नाव का ठेवायचे आहे हे स्पष्ट करावे लागेल.**

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासात...

(कालच्या अंकावरून पुढे)

---

अनेक शैक्षणिक संस्थांमध्ये, संस्थांचे मालक शिक्षकांशी वाईट वागतात आणि त्यांना त्यांच्या वैयक्तिक कामात व्यस्त ठेवतात. अनेक संस्थांमध्ये शिक्षकांचे पगार महिने आणि वर्षे प्रलंबित ठेवले जातात, काही ठिकाणी पदोन्नती थांबवल्या जातात आणि मानसिक छळही केला जातो, म्हणूनच शिक्षकांमध्ये आत्महत्यांच्या घटनाही वाढत आहेत.

शिक्षणाच्या जगात आता विद्यार्थ्यांचे एक नवीन रूप दिसून येत आहे; लहान मुले देखील त्यांच्या शाळेच्या बॅगमध्ये नको असलेल्या वस्तू घेऊन फिरताना आढळतात, ज्यामध्ये अंमली पदार्थ, घातक शस्त्रे देखील असतात. पूर्वी, शिक्षक चुकांसाठी विद्यार्थ्यांना मारहाण करत असले तरी पालक त्याला काही विशेष आक्षेप घेत नव्हते. आता, चुकांसाठी विद्यार्थ्यांना मारहाण करणे तर दूरच, त्यांना फटकारणे देखील शिक्षकांना गुन्हा वाटू लागते.

डॉ. प्रितम भी. गेडाम
८२३७४ १७०४१
prit00786@gmail.com

काही महिन्यांपूर्वी, पंजाब आणि हरियाणामध्ये, शालेय विद्यार्थ्यांनी त्यांच्या मुख्याध्यापकांची चाकूने वार करून हत्या केली. आता शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांनी त्यांच्या शिक्षकांना धमकावल्याच्या घटनाही सातत्याने समोर येत आहेत. आपल्या देशात बालगुन्हेगारांचा ग्राफ झपाट्याने वाढत आहे. पालक व्यस्तता दाखवत आहेत,

शिक्षक व्यावसायिक होत आहेत, मग देशातील पिढी गुन्हेगारीच्या दलदलीत अडकणे अपरिहार्य आहे. महिला आणि बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी राज्यसभेत दिलेल्या माहितीनुसार, २०२२ सालच्या आकडेवारीवरून असे दिसून येते की, अल्पवयीन गुन्हेगारांच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य देशात पहिल्या क्रमांकावर आहे, त्यानंतर मध्य प्रदेश, राजस्थान, तामिळनाडूचा क्रमांक लागतो.

लोक म्हणतात की सरकारी शाळांची अवस्था वाईट आहे, मग तिथल्या शिक्षकांना पगार तर भरपूर मिळतो, तर शैक्षणिक गुणवत्ता का सुधारत नाही. दुसरीकडे, देशातील बहुतेक खाजगी संस्थांमध्ये शिक्षकांचे पगार खूपच कमी आहेत, मग अशा परिस्थितीत देशाची शिक्षण व्यवस्था कशी मजबूत होईल? शैक्षणिक गुणवत्तेचा स्तर कसा वाढेल? खाजगी संस्थांमध्ये, कमी पगाराचा शिक्षक देशाचे उज्वल भविष्य घडविण्यासाठी मनापासून चिकाटीने आणि मेहनतीने कसा काम करू शकतो? जेव्हाकी त्या शिक्षकाचा वर्तमान स्वतः अंधारात आहे.

देशातील बहुतेक ठिकाणी ही परिस्थिती आहे, हे सर्व पाहता, आजचा शिक्षक खरोखरच देशाच्या पिढीच्या उज्वल भविष्याचा शिल्पकार म्हणण्यास पात्र आणि सक्षम आहे का? केंद्रीय विद्यालय, आयआयटी, आयआयएम, एम्स सारख्या शैक्षणिक संस्था प्रत्येक गावाची, प्रत्येक शहराची गरज आहेत, प्रत्येक विद्यार्थ्याला कोणताही आर्थिक भेदभाव न करता समान दर्जाचे शिक्षण मिळालेच पाहिजे.

बिहारमधील खाजगी कोचिंग सेंटरचे प्रसिद्ध शिक्षक खान सर यांनी अलिकडेच दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, देशातील सरकारी शिक्षण व्यवस्था अतिशय वाईट परिस्थितीतून जात आहे, ज्याचा पुरावा म्हणजे खाजगी कोचिंग सेंटर विद्यार्थ्यांनी खचाखच भरलेले आहेत. शिक्षणासाठी खाजगी कोचिंग सेंटर्सवरील विद्यार्थ्यांचे अवलंबित्व प्रचंड वाढत आहे. सर्व विद्यार्थ्यांना नाममात्र पदवी मिळाली तरी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास त्याच्या उद्दिष्टापासून खूप दूर राहील.

आपण आपल्या आयुष्याचा सर्वात मोठा भाग शिक्षणात म्हणजे आपले शरीर, मन आणि पैसा खर्च करतो. जर ते शिक्षण आपल्याला चांगले राहणीमान प्रदान करण्यास सक्षम असल्याचे सिद्ध झाले तर ते चांगले आहे, अन्यथा जीवन एक संघर्षच बनून राहते, जे आपण बघतच आहोत. जोपर्यंत शिक्षकांना समाजसुधारक म्हणून त्यांची भूमिका समजत नाही, तोपर्यंत देशाच्या पिढीच्या उज्वल भविष्याबद्दल प्रश्न उपस्थित होत राहतील.

■ ■ ■



## वारंवार छातीत जळजळ किंवा ॲसिडिटी?

अवेळी झोप, जेवण किंवा धावपळीच्या दिनक्रमात जेवणाच्या चुकलेल्या वेळा आणि अनहेल्थी खाणं यामुळे ॲसिडिटी होणं सामान्य आहे. तर कधी कधी जास्त मसालेदार पदार्थ खात असाल, आंबट पदार्थ खात असाल तरी देखील बऱ्याचदा छातीत जळजळ होण्याची समस्या, पोटात दुखण्याची समस्या जाणवू लागते. या मागील कारण म्हणजे ॲसिडिटी. ॲसिडीटच आहे असं समजून आपण दुर्लक्ष करतो. पण दरवेळी ॲसिडिटी म्हणजे फक्त आपल्या खाण्या-पिण्यामुळे झालेली सामान्य बाब नसून बऱ्याच आजारांची लक्षणे असू शकतात.

आम्लपित्त ही एक अशी समस्या आहे ज्यामध्ये पचनसंस्थेचे नैसर्गिक संतुलन बिघडते. या स्थितीत अस्वस्थ लक्षणे दिसू लागतात. या आजारावर उपचार करणे कठीण नाही. जीवनशैलीत छोटे बदल करून या आजारावर सहज उपचार करता येतात. यासाठी योग्य कारणे ओळखणे महत्त्वाचे आहे. कारण वारंवार आम्लपित्त येणे ही केवळ पचनाची समस्या नाही तर अनेक गंभीर आजारांचे लक्षण असू शकते.

**गॅस्ट्रोएसोफेगल रिफ्लक्स रोग**

जर वारंवार छातीत जळजळ होत असेल, तोंडात आंबट पाणी येत असेल किंवा घशात आंबटपणा येत असेल तर ही ॠफऊ म्हणजेच गॅस्ट्रोएसोफेगल रिफ्लक्स रोगाची लक्षणे असू शकतात. ही अशी स्थिती आहे ज्यामध्ये पोटाच्या वरच्या भागात आम्लाचे प्रमाण वाढते. यामुळे रुग्णाला अपचन, उलट्या, पोटात अस्वस्थता, त्वचेची जळजळ, आंबट ढेकर येणे, पोट फुगणे आणि मळमळ अशा अनेक आरोग्य समस्यांना सामोरे जावे लागू शकते.

**अल्सरमुळे होणारी आम्लता**

वारंवार आम्लपित्त होणे हे देखील पोटाच्या अल्सरचे लक्षण असू शकते. अल्सर म्हणजे पोटाच्या आतील आवरणावरील जखमा. हे जखमा जास्त आम्लपित्त असलेल्या औषधांच्या दीर्घकाळ वापरामुळे किंवा पोटात एच. पायलोरी संसर्ग निर्माण करणाऱ्या बॅक्टेरियाच्या वाढीमुळे होतात.

**जठराची सूज** : जर पोटाच्या आतील आवरणाला अनेक वेळा सूज येत असेल तर या स्थितीला गॅस्ट्राइटिस म्हणतात. त्याचे मुख्य कारण म्हणजे जास्त प्रमाणात शरीरात आम्ल निर्माण होणे आणि पोटाच्या आरोग्यावर सतत परिणाम होणे. या स्थितीत वारंवार पित्त होणे, भूक न लागणे, उलट्या होणे किंवा मळमळ होणे अशी लक्षणे दिसून येतात.

**पित्ताशयाचे खडे होणे** : कधीकधी पित्ताशयात खडे असले तरी वारंवार आम्लपित्त होण्याच्या समस्या निर्माण होतात. तेलकट आणि जड अन्न खाल्ल्यानंतर रुग्णाला जास्त जळजळ आणि अपचन जाणवते.

**स्वादुपिंडाचा दाह** : पोटाच्या मागे असलेल्या स्वादुपिंडात जळजळ झाल्यास सतत आम्लता, उलट्या आणि पोटदुखीची तक्रार असते. ही एक गंभीर स्थिती आहे, ज्यामध्ये ताबडतोब डॉक्टरांशी संपर्क साधणे आवश्यक आहे.

ॲसिडिटीची समस्या 3 ते 4 आठवड्यांपेक्षा जास्त काळ सुरू आहे. ॲसिडिटीसाठी औषध घेतल्यानंतरही आराम मिळत नाही. खाल्ल्यानंतर लगेच पोटात जडपणा किंवा वेदना जाणवणे व अन्य त्रास असेल तर डॉक्टरांचा सल्ला घ्या.

■ ■

**अशोकायन**

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## जय हो महाभूपती..!

**ज्यांची मनोभावे**
**करीता भक्ति**
**जीवनातील विघ्ने**
**दूर होती**
**आम्ही नमितो**
**असा जो तो**
**पार्वतीनंदन महाभूपती !**

**कार्यारंभी श्रध्दा सदभावनेने**
**जो पुजे महाभूपती**
**निर्विघ्न त्यांचे**
**कार्य पार पडे**
**अशी भक्तांना**
**येतसे अनूभूती ..!**

**शक्ति युक्तिचा तो दाता**
**म्हणुनी म्हणती विघ्नहर्ता**
**जगा व जगू द्या चा संदेश**
**देई तो आपल्या भक्ता ..!**



## आंध्र प्रदेशने गिनीज रेकॉर्ड रचला: २४ तासांत १.६३ लाख लोकांनी स्टार्टअपसाठी साइन अप केले

**नागपूर, ५ सप्टेंबर :** आंध्र प्रदेश इनोव्हेशन सोसायटीने स्टार्टअप्स आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यात एक ऐतिहासिक कामगिरी केली आहे. संस्थेने २४ तासांत उद्योजकता/स्टार्टअप/व्यवसाय कार्यक्रमासाठी ऑनलाइन साइन अप करणाऱ्या सर्वाधिक लोकांचा गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड प्रस्थापित केला आहे. १९ ऑगस्ट रोजी दुपारी १२:३० ते २० ऑगस्ट रोजी दुपारी १२:३० दरम्यान १,६३,२५४ नोंदणींसह हा विक्रम रचला गेला.

आविष्करण आंध्र मोहिमेअंतर्गत हा पराक्रम साध्य करण्यात आला, ज्याचा उद्देश विद्यार्थी, गृहिणी, नवोन्मेषक आणि तरुणांना नाविन्यपूर्ण आणि उद्योजकीय विचारसरणी स्वीकारण्यास प्रेरित करणे आहे. या कार्यक्रमाचे उद्दिष्ट तळागाळात स्टार्टअप संस्कृतीला प्रोत्साहन देणे आणि रोजगार निर्मिती आणि आर्थिक विकासाला चालना देणे आहे.

आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू आणि आंध्र प्रदेश इनोव्हेशन सोसायटीचे सीईओ सूर्या तेजा यांना गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड प्रमाणपत्र गिनीजचे अधिकृत निर्णायक ऋषी नाथ आणि रणनीतिकार निश्चल बारोट यांनी एका औपचारिक समारंभात प्रदान केले. या विक्रमी प्रयत्नासाठी रणनीती आणि प्रमाणपत्र प्रक्रियेचे नेतृत्व बारोट यांनी केले.

राज्याचे सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्री कोंडापल्ली श्रीनिवास आणि उद्योग आणि आयटी मंत्री नारा लोकेश यांच्यासह अनेक उद्योग क्षेत्रातील दिग्गज यावेळी उपस्थित होते. उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि राज्याच्या भविष्याला एक नवीन दिशा देण्यासाठी आंध्र प्रदेश सरकारच्या प्रयत्नांचे या सर्वांनी कौतुक केले.

मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी आंध्र प्रदेशच्या स्टार्टअप इकोसिस्टमसाठी हा एक महत्त्वाचा टप्पा असल्याचे म्हटले आणि एक कुटुंब, एक उद्योजक या ध्येयाचा पुनरुच्चार केला.

भारतातील विविध राज्यांसाठी आतापर्यंत ६३ गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड प्रयत्नांचे यशस्वी नेतृत्व करणारे निश्चल बारोट यांनी ही कामगिरी जागतिक स्तरावर आंध्र प्रदेशची ओळख मजबूत करण्याच्या दिशेने एक पाऊल असल्याचे वर्णन केले.

या गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमुळे आंध्र प्रदेशला आंतरराष्ट्रीय मान्यता मिळते आणि प्रत्येक घरातील तळागाळात उद्योजकता आणि नवोपक्रमाच्या नवीन विचारसरणीच्या चळवळीची सुरुवात होते.

## सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत पुष्पासमोर नात्याचे आव्हान

**मुंबई, ५ सप्टेंबर :** प्रेरणादायक कथानक आणि भावनात्मक दृष्ट्या समृद्ध व्यक्तिरेखा यांच्यामुळे सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेने प्रेक्षकांचे मन काबिज केले आहे. पुष्पा (करुणा पांडे) आपले वकील बनण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी धडपड करत आहे, पण येथेही तिच्यासमोर नवी आव्हाने येत आहेत, ज्यामध्ये तिच्या दृढतेची आणि तिच्या जवळच्या नातेसंबंधांचीही परीक्षा होत आहे. अलीकडच्या भागांमध्ये आपण पाहिले की, प्रोफेसर शास्त्री (गौरव चोप्रा) आणि त्यांच्या मुलीला, रिया (काजल)ला पुन्हा एकत्र आणल्याबद्दल पुष्पाला रोहिणीचा (प्रीतिका) सामना करावा लागतो. त्यानंतर, कादंबरी (वृंदा त्रिवेदी) जुगल (अंशुल त्रिवेदी) ला विश्वासात घेऊन सांगते की ती गरोदर असून त्याचेच बाळ तिच्या पोटात आहे.

आगामी भागांमध्ये पुष्पा भयंकर गोंधळात सापडलेली दिसेल. सोनल (भक्ती राठोड) दीप्ती (गरिमा परिहार)ची काळजी घेण्यासाठी पुष्पाच्या घरी राहायला येते. त्यामुळे बापोद्रा (जयेश भारभाया) शी सतत खटके उडू लागतात, कारण दोघांना आपापल्या मुलीची काळजी आहे. यामध्ये पुष्पाची पंचाईत होते. दुसरीकडे, पुष्पा प्रोफेसर शास्त्रीला कोयल (ईशा)ला मागणी घालण्यासाठी आग्रह करते. पण तिला कोयलचे धक्कादायक सत्य अजून समजलेले नाही. इकडे, जुगल जोपर्यंत बाप्पाची मूर्ती घरी घेऊन येत नाही, तोपर्यंत कादंबरी अन्नप्राशन करण्यास नकार देते. जुगल मात्र ही मागणी पुरवण्यास साफ नकार देतो.

पुष्पाची भूमिका करणारी करुणा पांडे म्हणते, सध्या अनेक संकटे अनेक बाजूंनी पुष्पाच्या मागे लागली आहेत. घरच्या आघाडीवर सोनल आणि बापोद्रा आपापल्या मुलीवरून एकमेकांशी झगडत आहेत. तर बाहेर, राजवीर-कोयल आणि प्रोफेसर शास्त्रीच्या प्रकरणात ती गुंतली आहे. यात भर म्हणून, कादंबरी जुगलकडे हट्ट धरून बसली आहे त्यामुळे पुष्पा त्रासली आहे, तिला जुगलची काळजी वाटते आहे. असे कितीतरी वेळा झाले आहे की, आपल्याला वाटते की या दबावाखाली आपण तग धरू शकणार नाही, पण पुष्पाची भूमिका करताना मी हे शिकले आहे की, वादळ कितीही तीव्र असले तरी तुम्ही माघार घ्यायची नसते. माझ्या वैयक्तिक आयुष्यात देखील असे क्षण आले आहेत, ज्यावेळी व्यक्तिगत आणि व्यावसायिक जबाबदाऱ्यांमधील समतोल साधणे कठीण होऊन बसते, पण पुष्पाच्या भूमिकेने मला स्थिर राहण्यास आणि हळूहळू एक-एक समस्या सोडवण्यास शिकवले आहे.

## मारुति सुझुकीने लॉन्च केली ऑल-न्यू विक्टोरिस, अशी एसयूव्ही ज्यामध्ये आहे गॉट इट ऑल

**मुंबई, ५ सप्टेंबर :** भारतीय एसयूव्ही सेगमेंटला नव्याने परिभाषित करत मारुति सुझुकी इंडिया लिमिटेड (एमएसआयएल) ने आज आपली नवीनतम एसयूव्ही विक्टोरिस लॉन्च केली. नवीन बेंचमार्क्स स्थापित करण्याच्या उद्देशाने विकसित करण्यात आलेली विक्टोरिस हायपर-कनेक्टेड टेक्नॉलॉजी, ऑल-राऊंड सेफ्टी, भविष्यकालीन व स्लीक डिझाईन आणि रोमांचक परफॉर्मन्स यांचा अप्रतिम संगम आहे, जी खऱ्या अर्थाने एक अशी एसयूव्ही आहे ज्यात आहे गॉट इट ऑल. पेट्रोल विथ स्ट्रॉन्ग हायब्रीड, ऑल ग्रिप सलेक्ट (४४) आणि सेगमेंट-फर्स्ट अंडरबॉडी टाकी डिझाईनसह पर्यावरणपूरक एस - सीएनजी तंत्रज्ञानासह उपलब्ध, विक्टोरिस आजच्या डायनॅमिक तरुणांसाठी विविध पॉवरट्रेन पर्याय देते. ग्राहक ऑल-न्यू विक्टोरिसची बुकिंग ११,००० रुपये मध्ये करू शकतात.




विक्टोरिस चे सादरीकरण करताना मारुति सुझुकी इंडिया लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री हिसाशी ताकेउची म्हणाले, नव्या पिढीचा भारतीय ग्राहक तरुण आहे, जगभर फिरलेला आहे, हायपर-कनेक्टेड आहे, सामाजिकदृष्ट्या जागरूक आहे, तांत्रिकदृष्ट्या प्रगत आहे आणि पर्यावरणाबाबत संवेदनशील आहे. अशा ग्राहकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आमची नवी एसयूव्ही विक्टोरिस ही आवश्यकतेनं गॉट इट ऑल असणे गरजेचे होते. विक्टोरिस हा लॅटिन शब्द आहे ज्याचा अर्थ आहे विजेता. आम्हाला विश्वास आहे की विक्टोरिस आपल्या अत्याधुनिक तंत्रज्ञान, स्लीक डिझाईन, स्मार्ट आणि कनेक्टेड फीचर्स, ५-स्टार स्तरावरील सुरक्षा आणि विविध पर्यावरणपूरक पॉवरट्रेनसह भारतातील ग्राहकांची मने जिंकेल. विक्टोरिस च्या माध्यमातून आम्ही आमचे एसयूव्ही पोर्टफोलिओ आणि आमचा एकूणच बाजारातील हिस्सा अधिक मजबूत करत आहोत.

लॉंचिंगबद्दल बोलताना मारुती सुझुकी इंडिया लिमिटेडचे वरिष्ठ कार्यकारी अधिकारी (मार्केटिंग आणि सेल्स) पार्थो बनर्जी म्हणाले, मारुती सुझुकीमध्ये आम्ही नेहमी आमच्या ग्राहकांचे ऐकतो. आजची तरुण व गतिशील पिढी आपली गाडी ही स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रतीक मानते, ऊर्जावान, स्थिरचित्त, आत्मविश्वासू आणि नेहमी पुढे जाणारी. अगदी नवी व्हिक्टोरिस डिझाइन आणि इंजिनिअर करताना आम्ही हीच संकल्पना आमच्या टीमसमोर ठेवली. एसयूव्ही हा आज सर्वाधिक आवडता सेगमेंट असला तरी एसयूव्ही खरेदीदार आता बदलला आहे. ही नवी तरुण पिढी महत्वाकांक्षी, हायपरकनेक्टेड असून अनुभवसंपन्न जीवनशैलीला प्राधान्य देते. अगदी नवी व्हिक्टोरिस ही त्या बदलाला आमचे उत्तर आहे, डिझाईन, तंत्रज्ञान आणि बहुपयोगितेचा एक प्रगत संगम. ती खऱ्या एसयूव्ही डीएनए सह इंजिनिअर केली असून आजच्या ऑटोमोबाईल्स कशा असाव्यात यासाठी नवा मापदंड स्थापित करते. व्हिक्टोरिससह आम्ही केवळ आणखी एक एसयूव्ही लॉंच करत नाही, तर ड्रायव्हिंगच्या एका नव्या आयामाचा उत्सव साजरा करत आहोत, ज्यामध्ये खरोखरच गॉट इट ऑल आहे.

## अस्थिर बाजारपेठेत एसआयपी थांबवल्यास दीर्घकालीन मालमत्ता निर्मितीवर प्रभाव पडू शकतो

**नागपूर, ५ सप्टेंबर :** आपल्या रोड ट्रिपमध्ये कधी सरळसोट हायवे असतात तर कधी-कधी कठीण अडथळे येतात. तसेच गुंतवणूकीतही चढउतार असतात. बाजारपेठा अस्थिर होतात तेव्हा अनेक गुंतवणूकदारांना आपले सिस्टॅमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन्स (एसआयपी) रोखण्याची किंवा थांबवण्याची इच्छा होते. ही प्रतिक्रिया तात्काळ असली तरी तज्ञ अनिश्चित कालावधीत एसआयपी थांबवल्यामुळे दीर्घकालीन मालमत्ता निर्मितीवर परिणाम पडू शकतो असा इशारा देतात.

बाजारातील चढउतारांदरम्यान गुंतवणूकदारांनी थांबण्याचे कारण काय?

बाजारातील अस्थिरता अनेकदा भीती निर्माण करते. गुंतवणूकदारांना घसरत्या बाजारात एसआयपी सुरू ठेवल्याने आणखी नुकसान होईल, अशी भीती वाटते. थांबण्याचा मोह अल्पावधीत भांडवलाचे संरक्षण करण्याच्या इच्छेतून उद्भवतो. तथापि, ही बचावात्मक रणनीती अनेकदा गुंतवणूकदारांना कमी किमतीत खरेदी आणि चक्रवाढीच्या शक्तीचा फायदा होण्यापासून रोखून त्यांच्याविरुद्ध काम करते.

बाजारातील अस्थैर्य तात्पुरते आहे परंतु एसआयपी थांबवल्यामुळे तुमच्या दीर्घकालीन मालमत्तेच्या प्रवासाचे कायमस्वरूपी नुकसान होऊ शकते, असे मत एसबाय म्युच्युअल फंडच्या प्रवक्त्यांनी व्यक्त केले. एसआयपी बाजारातील विविध चक्रांमधून पुढे जाण्यासाठी तयार करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे शिस्तबद्ध गुंतवणूक करणाऱ्या ग्राहकांना दीर्घकाळात फायदा होतो.

एसआयपी थांबवल्याने गुंतवणूकदारांचे काय नुकसान होते

१. चक्रवाढीचे लाभ मिळत नाहीत- एसआयपीसाठी सातत्यपूर्णता खूप महत्त्वाची आहे. मध्येच थांबल्यामुळे चक्रवाढीचे चक्र थांबते आणि एकूणच मालमत्ता निर्मिती कमी होते.

२. रूपया खर्च सरासरीचे नुकसान अस्थिर बाजारपेठेमुळे कमी किमतीत अधिक युनिट्स खरेदी करण्याचा फायदा मिळतो. एसआयपी थांबवल्याने गुंतवणूकदारांना हा स्वयंचलित सरासरी लाभ गमवावा लागतो.

३. विलंबित आर्थिक उद्दिष्टे - निवृत्तीसाठी बचत असो, मुलांचे शिक्षण असो किंवा स्वप्नातील घर असो, गुंतवणूकीत आलेला व्यत्यय हा कालावधी वाढवू शकतो.

बाजारातील मंदीमध्ये एसआयपी सर्वोत्तम काम करतात

बाजारातील चढउतारांदरम्यान एसआयपी सुरू ठेवणे बहुतेकदा गुंतवणूकदारासाठी फायद्याचे ठरते. कमी मूल्यांकनावर अधिक युनिट्स खरेदी करून एसआयपीचे गुंतवणूकदार त्यांची सरासरी किंमत कमी करतात आणि बाजार पुन्हा वाढल्यावर अधिक नफा मिळवू शकतात. ऐतिहासिक पुराव्यांवरून असे दिसते की, मंदीदरम्यान गुंतवणूक केलेल्या गुंतवणूकदारांना अखेर बाजारातील पुनर्प्राप्तीचा फायदा झाला.

उदाहरणार्थ, २००८ आणि २०२० च्या बाजारातील सुधारणांदरम्यान ज्यांनी एसआयपी सुरू ठेवल्या त्या एसआयपीमध्ये बाजार पुन्हा उसळी घेत असताना लक्षणीय वाढ दिसून आली. त्यामुळे शिस्त वेळेपेक्षा जास्त महत्त्वाची आहे या तत्त्वाला बळकटी मिळाली.

## फ्लाईटची नवीन ब्रँड ॲम्बेसेडर सान्या मल्होत्रा



**मुंबई, ५ सप्टेंबर :** रिलॅक्सो फुटवेअर्स लिमिटेडचा एक ब्रँड असलेल्या 'फ्लाईट' ने प्रसिद्ध बॉलिवूड अभिनेत्री सान्या मल्होत्राला त्यांचा नवीन ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून घोषित केले आहे. फ्लाईट हा भारतातील एक आघाडीचा कौटुंबिक फॅशन फुटवेअर ब्रँड आहे. या घोषणेसोबतच, फ्लाईटने येणाऱ्या सण आणि लग्नसराईसाठी खास डिझाइन केलेली नवीन श्रेणी बाजारात आणली आहे. यामुळे ग्राहकांना प्रत्येक प्रसंगासाठी स्टाईलिश पर्याय उपलब्ध होतील. ही घोषणा एका दमदार ३६०-डिग्री मार्केटिंग मोहिमेला धरून आहे, जी आत्मविश्वास, वेगळेपणा आणि स्टाईलसह पुढे जाण्याचा संदेश देते.

गौरव कुमार दुआ, पूर्ण वेळ संचालक रिलॅक्सो फुटवेअर्स लिमिटेड म्हणाले, सान्याला 'फ्लाईट' चा चेहरा बनवून आम्हाला खूप आनंद झाला आहे. या वर्षी आम्ही तरुणाईला आकर्षित करणारी, त्यांच्या व्यक्तिमत्वाला साजेशी एक नवीन आणि आकर्षक डिझाईन बाजारात आणत आहोत. तरुण, महत्त्वाकांक्षी आणि डिझाइनची जाण असलेली सान्या आजच्या भारताचे प्रतिनिधित्व करते. फ्लाईट एक असा फॅशन फुटवेअर ब्रँड आहे जो आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर लोकांना साथ देतो, त्यांना स्टाईल आणि आत्मविश्वासाने पुढे जाण्यास मदत करतो. सान्याला फ्लाईट ची ब्रँड ॲम्बेसेडर बनवून आणि आमच्या नवीन मोहिमेसोबत, आम्ही 'सर उठा कदम बढा' हे ब्रीदवाक्य एका नव्या उंचीवर नेत आहोत. प्रत्येक पावलावर आत्मविश्वासाने आणि स्टाईलने पुढे जाण्यासाठी आम्ही भारताला प्रेरणा देत आहोत.

मनोज लालवाणी, उपाध्यक्ष मार्केटिंग, रिलॅक्सो फुटवेअर्स लिमिटेड, या मोहिमेबद्दल म्हणाले: सान्यासोबतची ही भागीदारी केवळ एक ब्रँड भागीदारी नसून, आमच्या प्रवासातील एका नवीन आणि रोमांचक अध्यायाची सुरुवात आहे. आम्ही ही भागीदारी ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी एक ३६० डिग्री मोहीम सुरू करत आहोत. ही मोहीम डिजिटल माध्यमांपासून रिटेलपर्यंतच्या अनेक ठिकाणांहून ग्राहकांशी जोडली जाईल. प्रत्येक पावलावर ग्राहकांना स्टाईल आणि आत्मविश्वास स्वीकारण्यासाठी प्रेरणा देईल. 'हर कदम स्टाईलिश' ही तुमची जीवनशैली आणि 'सर उठा कदम बढा' हा तुमचा पुढील मार्ग असावा, यासह आम्हाला विश्वास आहे की, देशभरातील ग्राहकांकडून या मोहिमेला जोरदार प्रतिसाद मिळेल आणि ती ग्राहकांच्या मनात घर करून बसेल.

या मोहिमेद्वारे, फ्लाईटने एक साधा पण शक्तिशाली संदेश दिला आहे: खरा आत्मविश्वास स्टाईलने सुरू होतो. आणि तुम्ही उचललेले प्रत्येक पाऊल, तुम्ही कोण आहात आणि कुठे जात आहात, हे ठळकपणे सांगू शकते.

## जयपूर रग्सचा रग उत्सव २०२५ : जिथे लक्झरी वारशाची भेट घेते आणि प्रत्येक धागा जीवन बदलतो




**नागपूर, ५ सप्टेंबर :** हस्तकला आणि सामाजिक उद्योजकतेचे जागतिक प्रतीक असलेले जयपूर रग्ज ३ सप्टेंबरपासून सर्जनशीलता, संस्कृती आणि प्रभावाचा भव्य उत्सव, रग उत्सव घेऊन येत आहे. या वर्षीची आवृत्ती इतर कोणत्याही आवृत्तीपेक्षा वेगळी आहे, ज्यामध्ये १४,००० हून अधिक हस्तनिर्मित रग्जांचा आश्चर्यकारक संग्रह प्रदर्शित केला आहे जो आजच्या डिझाइनसह भारताच्या विणकाम परंपरेच्या आत्म्याला सुंदरपणे मिसळतो.

या वर्षीच्या क्युरेशनमध्ये आलम, जेनेसिस, सवाना, कॉन्कोक्शन, दा हास, वंडरकॅमर, कॅलिडो, क्लॅन, बेसिस, लॅकुना, एर्बे, इंडसबार, नोर्मेडिक थ्रेड्स, आकार आणि कॉन्टूर असे स्वाक्षरी संग्रह आहेत. या महोत्सवाचे आकर्षण म्हणजे पुरस्कार विजेत्या मंचहा संग्रहातील जवळजवळ २०० अद्वितीय गालिचे, जे ग्रामीण कारागिरांच्या कल्पनेतून थेट विणलेले आहेत, प्रत्येक गालिचा वैयक्तिक आणि गहन कथा सांगतो.

संग्राहकांसाठी, रग उत्सव २०२५ एक दुर्मिळ संधी घेऊन येतो: २००० विंटेज रग्ज (३०-५० वर्षे जुने) आणि २५० ॲंटीक रग्ज (१०० वर्षांहून अधिक जुने). यामुळे हे त्याच्या प्रकारचे सर्वात मोठे रग्ज प्रदर्शन बनते.

बदलत्या जागतिक व्यापार समीकरणे आणि वाढत्या निर्यात शुल्कादरम्यान, जयपूर रग्जने ग्राहक-प्रथम पाऊल उचलले आहे: पहिल्यांदाच, संपूर्ण संग्रह ६०% पर्यंत सवलतीत ऑफर केला जात आहे, ज्यामुळे जागतिक स्तरावर ओळखले जाणारे, डिझायनर-निर्मित रग्ज डिझाइन प्रेमी आणि संग्राहकांसाठी अधिक सुलभ होत आहेत.

रग उत्सव हा केवळ डिझाइनचे प्रदर्शन नाही, तर तो सन्मान, वारसा आणि उद्देशाबद्दल आहे. या उत्कृष्ट निर्मिती सर्वोत्तम किमतीत देऊन, आम्ही जगभरातील घरांमध्ये कला आणत नाही तर त्या तयार करणाऱ्या कारागिरांना थेट पाठिंबा देत आहोत, असे जयपूर रग्सचे संचालक योगेश चौधरी म्हणाले.

रग उत्सवाच्या प्रत्येक आवृत्तीचा उद्देश एका उद्देशाशी जोडलेला आहे. २०२५ मध्ये, महोत्सवातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा एक भाग ग्रामीण विणकाम क्षेत्रात आरोग्यसेवा आणि स्वच्छ पाण्याच्या सुविधा निर्माण करण्यासाठी समर्पित केला जाईल, जे दोन्ही कारागीर समुदायांसाठी अत्यंत आवश्यक आहेत. या उपक्रमाचा हजारो विणकर आणि त्यांच्या कुटुंबांना फायदा होण्याची अपेक्षा आहे.

रग उत्सव २०२५ जयपूर रग्सच्या प्रमुख दुकानांमध्ये (दिल्ली, मुंबई, चेन्नई, रायपूर, जयपूर, गुजरात, पुणे आणि बंगळुरू) आणि जयपूर रग्सच्या वेबसाइटवर (www.jaipurrugs.com) ऑनलाइन अनुभवता येईल.

## दत्ता मेघे इंस्टिट्यूट सावंगी (मेघे), वर्धामध्ये १.९ किलो नवजात शिशुवर जीवनरक्षक हृदय शस्त्रक्रिया

**अकोला, ५ सप्टेंबर :** दत्ता मेघे इंस्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस येथे एका उल्लेखनीय कामगिरीत कार्डिओलॉजी विभागाने केवळ १.९ किलो वजनाच्या गंभीर आजारी नवजात शिशुवर पेटंट डक्टस आर्टेरिओसस स्टेंटिंग ही जटिल व जीवनरक्षक प्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडली. ही अत्यंत नाजूक आणि उच्च-जोखमीची शस्त्रक्रिया कार्डिओलॉजी विभागप्रमुख डॉ. गजेंद्र अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट्सच्या समर्पित टीमने केली. या टीममध्ये डॉ. आकाश लोखंडे, डॉ. वैभव राऊत, डॉ. अक्षय दफळ, डॉ. वैभव महल्ले, डॉ. पृथ्वी मुंदडा आणि डॉ. करण सिंह यांचा समावेश होता.

शस्त्रक्रियेपूर्वी बाळाचे ऑक्सिजन सॅच्युरेशन केवळ ४५% इतके धोकादायकरीत्या कमी झाले होते. मात्र पीडीए स्टेंटिंग यशस्वी झाल्यानंतर लगेचच ऑक्सिजन स्तर ८५% पर्यंत सुधारला आणि बाळाच्या प्रकृतीत आमूलाग्र बदल घडून आला.

पीडीए स्टेंटिंग ही एक जटिल इंटरव्हेन्शनल पद्धत आहे जी नवजात शिशूमध्ये डक्ट-डिपेंडंट सर्क्युलेशन असताना रक्तप्रवाहासाठी पर्यायी मार्ग उपलब्ध करून देते. कमी वजनाच्या बाळावर ही प्रक्रिया करणे अत्यंत कठीण असते, कारण रक्तवाहिन्या लहान, शरीररचना नाजूक व शस्त्रक्रियेतील धोके मोठे असतात.

शस्त्रक्रियेनंतरची देखरेख एनआयसीयू टीमने केली. या टीमचे नेतृत्व डॉ. सागर करोटकर आणि डॉ. महावीर लकडा यांनी केले. बारकाईने देखरेख केल्याने बाळाचे पुनर्वसन सुरळीत झाले.



सध्या बाळ पूर्णपणे बरे झाले असून सुरक्षितरीत्या डिस्चार्ज देण्यात आले आहे. या यशामुळे बाळाच्या कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला असून उपचार करणाऱ्या डॉक्टरांच्या टीममध्ये आनंद व समाधान व्यक्त होत आहे.

या यशाबद्दल बोलताना डॉ. गजेंद्र अग्रवाल म्हणाले, अशा गंभीर आजारी नवजात शिशूचे व्यवस्थापन करणे म्हणजे केवळ तांत्रिक कौशल्य नव्हे, तर काटेकोर टीमवर्क आणि नियोजन आवश्यक असते. आमचा विभाग सर्वांत कठीण प्रकरणांमध्येही अत्याधुनिक हृदयविकार उपचार उपलब्ध करून देण्यास कटिबद्ध आहे. दत्ता मेघे इंस्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस सावंगी (मेघे), वर्धा अशा गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियांसाठी आणि समाजाची सेवा करण्यासाठी सदैव तत्पर आहे.


## आज का अंदाज

शनिवार ६ सप्टेंबर २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | मुंबई बाजार |
|---|---|
| ० १ ४ ७ | |
| २८० १०० १६७ ८९० | |
| ३७० २९० ३४७ ३७७ | |
| ४६० ३८० २३९ ४६७ | |
| ०२ १२ ४३ ७३ | |
| ०५ १५ ४६ ७६ | |
| ०८ १८ ४९ ७९ | |

**६ सप्टेंबर : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| ३१ | ६१ | ७८ | ०८ |
| ३२ | ६२ | ७९ | ०९ |
| ३५ | ६५ | ७४ | ०० |
| १३९ | १७८ | १२४ | २३५ |
| २५६ | २६८ | २७८ | ४७९ |
| ३४६ | ३६७ | ४६७ | ३८९ |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

८ ९ ० १ २

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## एक दिव्य सुरुवात : कहानी हर घर की या आपल्या नवीन शोच्या प्रीमिअरपूर्वी जूही परमारने प्रतिष्ठित परेलचा राजा चे दर्शन घेतले!



**मुंबई, ५ सप्टेंबर :** या गणेश चतुर्थीनिमित्त झी टीव्हीने पुन्हा एकदा मुंबईतील प्रसिद्ध परेलचा राजा मंडळासोबत सणाच्या उत्साहात भर टाकली आहे. भक्तांना आपल्या लाडक्या बाप्पाचे आशीर्वाद घेण्यासाठी एक दिव्य असा अनुभव देणारी ही जागा सजवण्यात आली होती. सुंदररित्या साकारलेली मूर्ती भक्तांच्या श्रद्धेला आणि आपुलकीच्या भावनेला उजाळा देणारी होती, ज्यातून भव्यता आणि शांततेचा संगम अनुभवायला मिळत होता.

कहानी हर घर की या बहुप्रतिक्षित शोच्या लॉंचपूर्वी, शोची होस्ट जूही परमार हिने झी टीव्हीच्या परेलचा राजाचे दर्शन घेत बाप्पाचे आशीर्वाद मागितले. तिने महाआरतीत सहभाग घेतला, धान्यदान केले, चाहत्यांशी मनमोकळ्या गप्पा मारल्या आणि इतर भक्तांसोबत सणाच्या उत्सवात सहभागी झाली.

जूही परमार म्हणाली, दरवर्षी मी बाप्पाला घरी आणते आणि मोठ्या भक्तिभावाने गणेशोत्सव साजरा करते, पण यावर्षीचा अनुभव खरोखरच खास ठरला. मला पंडाल आणि मित्रांच्या घरी जाऊन बाप्पाचे आशीर्वाद घेण्याची संधी मिळाली, आणि झी टीव्हीच्या परेलचा राजा येथे येणे हा एक अद्भुत अनुभव होता. महाआरती करणे, धान्यदान करणे आणि इथल्या लोकांची भक्तीभावना व ऊर्जा अनुभवणे यामुळे मी कृतज्ञतेने भारावून गेले. कहानी हर घर की प्रेक्षकांच्या मनाला तितक्याच खोलवर भिडावी जितकी तिने माझ्या मनाला स्पर्श केला आहे अशी मी प्रार्थना केली. बाप्पा सर्वांना शांती आणि आनंद देवो. गणपती बाप्पा मोरया!

## राशीभविष्य

**मेष :** सामाजिक जीवनात तुम्ही लोकांना आकर्षित कराल आणि नवीन संपर्क साधण्यात यशस्वी व्हाल. हे सर्व तुमच्यासाठी उत्कृष्ट ठरेल. तुमचे विचार आणि भावना मोकळेपणाने व्यक्त करा.

**वृषभ :** आज व्यवसायात पैशाच्या व्यवहारात घाई करू नका. आज तुमचे लक्ष केंद्रित करून तुमचे काम पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. आज तुमचे वैवाहिक जीवन आनंदी राहील, मुले देखील आनंदी राहतील.

**मिथुन :** व्यवसायात काही अनियमितता असू शकतात, वैयक्तिक नातेसंबंधांमध्ये अंतर किंवा कटुतेची चिन्हे दिसू शकतात, म्हणून संयम आणि समजूतदारपणाने वागा. आरोग्याबाबत काळजी घ्या.

**कर्क :** आवडीच्या गोष्टी एक्सप्लोर करण्यासाठी हा एक आदर्श काळ आहे. तुमच्या शब्दांमध्ये विशेष शक्ती असेल. अंत:प्रेरणा आणि सर्जनशीलता तुमच्या विचारांमध्ये स्पष्टता आणेल.

**सिंह :** आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला असेल. आज तुम्हाला व्यवसायात चांगला नफा मिळेल, भौतिक सुखसोयी वाढतील. आज तुम्ही तुमच्या मार्गात येणाजया समस्या सोडवण्यात यशस्वी व्हाल.

**कन्या :** आजचा दिवस खूप सकारात्मक संकेत घेऊन येईल. आज तुमची संवेदनशीलता आणि सर्जनशीलता शिगेला पोहोचेल. तुम्ही तुमची भावनिक बाजू समजून घेण्यात आणि व्यक्त करण्यात यशस्वी व्हाल.

**तुळ :** तुम्हाला थोडे असुरक्षित आणि चिंताग्रस्त वाटू शकते. महत्त्वाचे निर्णय घेण्यापूर्वी नीट विचार करा. हा आत्मपरीक्षण करण्याचा काळ आहे; तुमच्या भावना समजून घेण्याचा प्रयत्न करा. धीर धरणे महत्त्वाचे आहे.

**वृश्चिक :** दिवस चांगला जाईल. आज तुम्ही भागीदारीत काही काम सुरू कराल, भविष्यात तुम्हाला चांगले फायदे मिळतील. अडकलेली कामं पूर्ण करा, म्हणजे तुमची इतर कामे देखील पुढे नेऊ शकाल.


**धनु :** तुम्हाला चांगल्या कंपनीकडून ऑफर मिळण्याची शक्यता आहे. आज ऑफिसच्या कामात इतरांचा सल्ला घेणे टाळा, तुमच्या जवळच्या व्यक्तीची मदत घेतल्यास तुमचे काम सहज यशस्वी होईल.

**मकर :** आजचा दिवस तुमच्यासाठी खूप चांगला जाणार आहे. तुम्ही तुमच्या दिवसाची सुरुवात एका चांगल्या सवयीने कराल ज्यामुळे तुमचे आरोग्य चांगले राहील. आज तुम्ही सामाजिक कार्यात व्यस्त असाल,

**कुंभ :** या राशीच्या विद्यार्थ्यांचा दिवस आनंदाचा जाईल, तुम्हाला परीक्षेच्या पेपरमध्ये चांगले गुण मिळतील. आज तुम्ही इतरांच्या म्हणण्याला महत्त्व द्याल आणि त्यांना चांगल्या प्रकारे समजून घेण्याचा प्रयत्न कराल.

**मीन :** या राशीचे लोक आज त्यांच्या जोडीदारासोबत एखाद्या धार्मिक स्थळी जाऊ शकतात. कामाच्या बाबतीत काही अडचणी येऊ शकतात, परंतु धैर्याने त्या सोडवण्यात यशस्वी व्हाल.

## शब्दकोडे क्रमांक २२१२



**आडवे शब्द :-**

१) जमिनीपासून मिळणारे सरकारचे उत्पन्न
६) संदेश
८) जिंकणारा
१०) संगीतातील एक राग
११) धक्का
१२) प्रजा
१३) मृत्यू
१५) नूतन
१७) धैर्य, हिंमत
१८) ठराविक पैसे
१९) दृढता, सोशिकपणा
२१) रसाळ
२३) पोते शिवण्याची सुई
२५) राबता, जाणेयेणे
२७) पराजय
२८) संगीतातील एक राग
२९) ओढा पण मनाचा
३०) बारदान
३१) मुसलमानांचा उपवासाचा महिना
३२) शपथ
३३) ढग
३६) कुराणातील वचने
३८) चामखीळ
४०) प्रसिद्धी, गप्पांचे आगर
४४) एक तारवाद्य
४६) कर्ज
४७) ताठा, गुर्मी, जोर
४८) ओझी वाहणारा
४९) सुसर
५०) कमीतकमी व जास्तीतजास्त
५३) आश्रय
५६) मोहरी
५७) पाणी वाहण्याची कातडी पिशवी
५८) बडबड
६०) बोटाच्या टोकावरील आवरण
६२) मणका
६३) दूध वा दुधाचे पदार्थ
६४) मडके
६५) पुरुष
६६) फुरसत
६७) लोटी
६८) विशेष
६९) नृत्य
७०) अंगारा, रक्षा
७१) पादत्राण
७२) टेहाळणी करणारा
७४) पृथ्वी
७६) दुर्गंधी येऊ लागलेला
७७) पागोट्याव बांधण्याचे रत्नजडित तुरा
७८) अहंकार

**उभे शब्द :-**

१) जलाशय, समुद्र
२) नेत्र
३) माझे
४) हत्या, खून
५) बारीक सारीक
६) आधार नसलेला
७) घराचा मागचा दरवाजा
८) वापर
९) आग्रा येथील ऐतिहासिक वास्तू
१४) पावसाचे साठवून ठेवलेले पाणी
१६) पराक्रमी
२२) दरवाजा
२४) महाराष्ट्राची देवता
२६) घोड्याची गाडी,
२८) मारणारा
२९) पाऊल
३०) गाईचे घर
३४) चंद्र,
३५) स्नानगृह
३७) हावरटपणा
३९) किरकोळ सामान
४०) कडक
४१) पत्र
४२) मवाळ धोरण
४३) आकाश
४५) खरकट्याचा ढीग
४८) नक्की, खात्रीने
५१) फक्त, केवळ
५२) संगीतातील एक घराणे
५४) हावरट,
५५) अवधान, लक्ष
५७) अनुमती
५९) जंगलात राहणारे प्राणी
६१) अफूचे बीज
६२) किंचित कडू चव
६३) मधुर
६४) गावातील जुनी वस्ती
६७) मोजणी करणारा
६८) मीठाची चव
७०) पोपट
७३) दुनिया
७५) मलई

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



### पुनवट येथे आरोग्य शिबिर रविवारी

**वणी** : पुनवट येथील शिवसेना (उबाठा) पक्षाच्या वतीने न्यू इंग्लिश हायस्कूलमध्ये ७ सप्टेंबर रोजी महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. आमदार संजय देरकर यांच्याहस्ते रविवारी सकाळी १० वाजता उद्घाटन करण्यात येणार आहे. गरजूंनी शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजक जिल्हा प्रमुख संजय निखाडे यांनी केले आहे. दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था आणि आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी मेघे यांच्या संयुक्त विद्यमाने शिबिरात सेवा पुरविण्यात येणार आहे. यावेळी विविध आजारांची मोफत तपासणी, उपचार आणि शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत, अशी माहिती शिबिराचे आयोजक संजय निखाडे यांनी दिली आहे.

# रोजगार हमी योजनेची प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करा- पालकमंत्री राठोड




**यवतमाळ, दि.५, महासागर प्रतिनिधी:** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत शासनस्तरावरून मंजूर दारव्हा, दिग्रस, नेर तालुक्यातील कामांच्या प्रगतीचा मृद व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांनी आढावा घेतला. रोजगार हमी योजनेची मंजूर कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी केल्या.

#### आदिवासी उपयोजना आढावा बैठक

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या आढावा बैठकीनंतर पालकमंत्री संजय राठोड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजनेची बैठक घेण्यात आली. यात सन 2025-26 अंतर्गत ऑगस्ट 2025 पर्यंत झालेल्या खर्चाचा सविस्तर आढावा पालकमंत्र्यांनी घेतला. यावेळी पालकमंत्री म्हणाले की, आदिवासी बांधवांची गरज पाहून त्यांना संबंधित योजनेचा लाभ थेट मिळावा यासाठी सर्व विभागप्रमुखांना सूचना केल्या.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, उपवनसंरक्षण धनंजय वायभासे, अपरजिल्हाधिकारी अनिल खंडागळे, निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी, उपविभागीय अधिकारी गोपाळ देशपांडे, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पांढरकवडाचे प्रकल्प अधिकारी अमित रंजन पुसद प्रकल्प अधिकारी अमोल मेतकर, दारव्हा, नेर, दिग्रस तालुक्यातील विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते. दारव्हा, दिग्रस, नेर तालुक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत एकूण ५८८ कामे मंजूर आहेत. त्यात दारव्हा २५८, दिग्रस १४१ व नेर तालुक्यातील १८९ कामांचा समावेश आहे. यापैकी ३८४ कामांना तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. यातील ५४ कामे पुर्ण झाली तर ३३ कामे प्रगतीपथावर आहे. प्रगतीपथावरील कामे तातडीने पूर्ण करा. जी कामे काही कारणास्तव सुरु झाली नाही, ती कामे सुरु करून लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी केल्या. मंजूर सर्व कामे ग्रामपंचायत व सार्वजनिक बांधकाम विभागाच्यावतीने केली जात आहेत. बांधकाम विभागाने तांत्रिक मान्यता दिल्यानंतर तहसिलदारांकडून प्रशासकीय मान्यता घेऊन कामे पुर्ण करणे अपेक्षित आहे. ज्या कामांच्या अद्याप मान्यता झाल्या नसतील त्या तातडीने देऊन कामांना गती देण्यात यावी. कामांमध्ये गावातील सिमेंट रस्ते, पेव्हर ब्लॉकचे कामे व सिमेंट रस्ता व पेव्हर ब्लॉक अशा कामांचा समावेश आहे. प्रलंबित कामे कालमर्यादेत पूर्ण करण्यासाठी आराखडा करण्याच्या सूचना देखील पालकमंत्र्यांनी केल्या.

#### पारधी समाजाच्या विविध मागण्याबाबत बैठक

यावेळी पारधी समाजाच्या विविध मागण्यांवरही चर्चा झाली. घरकुल मंजुरीसाठी तातडीने कार्यवाही करणे, शेतजमिनी, वनजमिनी आणि गायरान जमिनीचे नियमितीकरण करणे, घरकुलासाठी जागा नसलेल्या लाभार्थ्यांना शासकीय भूखंड उपलब्ध करून देणे, पारधी समाजातील गावांमध्ये समाज मंदिर, अंतर्गत रस्ते, वीज व पाणीपुरवठा यांसारखी विकासकामे पूर्णत्वास नेणे या बाबींवर भर देण्यात आला. तसेच आदिवासी प्रकल्प कार्यालयाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनेमध्ये पारधी समाजातील बचत गटांना प्रामुख्याने प्राधान्य देण्यात यावे व पारधी समाजातील योजनेचे वितरण करत असताना विहीत वेळेत वितरण करावे. अशा सूचना पालकमंत्री संजय राठोड यांनी केल्या.

## » संक्षिप्त...

### शेंद्री (बु.) येथील इरोबा महिला भजन मंडळाला प्रथम क्रमांक



**दारव्हा** : तालुक्यातील शेंद्री (बु) येथील इरोबा महिला भजन मंडळाने भगवान मुंसाजी महाराज देवस्थान, धामणगाव (देव) येथे आयोजित अखंड नाम सप्ताहातील भजन स्पर्धेत अव्वल क्रमांक मिळवला. या मंडळाच्या अध्यक्षा सुशीला तुकाराम चौधरी यांना मुंगसाजी देवस्थानतर्फ प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. अखंड नाम सप्ताहात उत्साहाने सहभाग घेऊन विनासेवा दिल्याबद्दलही मंडळाचे विशेष कौतुक करण्यात आले. या मंडळात सुशीला चौधरी, पुष्पा भोयर, सीमा साबळे, कल्पना ज्ञानेश्वर, सुवर्णा चौधरी, प्रतीभा कई, मनोज खंडारे, वंदना मनोज, संगीता तोडसाम, अंजली उमेश, सरस्वती झाले, छाया भोयर आदी सदस्यांचा समावेश होता.

### पुसद येथे जल झुलनी एकादशी उत्साहात



**पुसद** : येथील राजस्थान मंडळाच्या वतीने जल झुलनी एकादशी उत्साहात साजरी करण्यात आली. बालाजी मंदिरात गिरीश अग्रवाल व धीरज बगडे यांनी सपत्नीक भगवान श्रीकृष्णाची विधिवत मंत्र उच्चारात पूजा केली. बालाजी मंदिर येथून भगवान कृष्णाची पालखी गुजरी चौक, देवकृपा चौक, आझाद चौक या मार्गाने काढण्यात आली. या कार्यक्रमाला राजस्थान मंडळाचे अध्यक्ष विजय भांगडे, सचिव डॉ. सचिन कोठारी, कार्याध्यक्ष गोविंद वर्मा, उपाध्यक्ष संतोष दीक्षित, कोषाध्यक्ष गणेश अग्रवाल, किरण बगडे, डॉ. राजेंद्र जाजू, डॉ. सुनील जोशी, डॉ. राजेश अग्रवाल, राधेश्याम जांगिड, प्रकाश बजाज, प्रवीण अग्रवाल, बालाजी ईन्नानी, नरेंद्र मांनका, संतोष बजाज, नवल बजाज, कैलास गजबी, रमेश सोमानी, अमित बगडे, विजय बोथरा, विनोद मालू, आदींसह मोठ्या संख्येत महिला वर्ग उपस्थित होते.

## गणेश विसर्जनासाठी मार्गदर्शक सूचना जारी



**यवतमाळ:** जिल्ह्यात दिनांक ५ ते ६ सप्टेंबर पासून गणपती विसर्जन उत्सव सुरु होत आहे. विसर्जना दरम्यान कोणतीही अनूचित घटना घडू नये, याकरीता प्रशासनाच्यावतीने मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहे. निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सर्व तहसीलदार व मुख्याधिकारी यांनी आपल्या क्षेत्रात विसर्जन होत असतांना विशेष दक्षता घेण्याचे निर्देश दिले आहे. गाव तसेच शहरातील सार्वजनिक गणेश मंडळाचे गणपती हे मोठे प्रकल्प वाहणाऱ्या नदीत, तलावामध्ये विसर्जन केले जातात. असे विसर्जन ठिकाण निश्चित करुन गणेश मंडळांशी समन्वय साधून नदीमध्ये विसर्जन करतांना कमी खोलवर पाण्यात सिमांकन करुन त्या ठिकाणी विसर्जन करण्यास मंडळांना प्रेरित करावे. तसेच विसर्जन ज्या ठिकाणी आहे, त्या ठिकाणी तलाठी यांनी समन्वय साधून पट्टीचे पोहणारे व्यक्ती उपस्थित ठेवण्यात यावे. विसर्जनाच्यावेळी पाण्यात लहान मुले, महिला तसेच ज्यांना पोहणे नाही त्यांना पाण्यात प्रवेश देवू नये. शहरामध्ये मुख्याधिकारी यांनी जास्तीत जास्त ठिकाणी पर्यावरणपुरक कुंड तयार करुन त्या ठिकाणी घरगुती गणपतीचे विसर्जन करण्यास आवाहन करावे. तसेच विसर्जनानंतर Waste Management प्रक्रिया राबविण्यात यावी, असे निर्देश तहसीलदार व मुख्याधिकारी यांना देण्यात आले आहे.

## विनोदी किस्स्यांनी बंदीवानांच्या चेहऱ्यावर हास्य

### ▪ कारागृह दिनानिमित्त मनोरंजनातून प्रबोधन, अण्णाभाऊ साठे संस्थेने घेतला पुढाकार



**यवतमाळ, दि.५, महासागर प्रतिनिधी:** कारागृहात राहुन शिक्षा भोगणाऱ्या बंद्यांचे आयुष्य म्हणजे रटाळवाणी दिनचर्या आणि आपल्या हातुन घडलेल्या गुन्ह्याचा पश्चाताप यातच गुंतलेले असतात. अशा विचारात. राहणाऱ्या बंद्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्यासाठी अण्णाभाऊ साठे बहुउद्देशिय संस्थेने पुढाकार घेत कारागृहात विनोदी किस्यांचा कार्यक्रम पार पाडला. या कार्यक्रमामुळे काही काळासाठी का असेना बंदी बांधवांच्या चेहऱ्यावर हसु फुलल्याचे दिसुन आले. जन्माने कोणीच गुन्हेगार नसतो. कोणी अपघाताने, कोणी चुकून तर कोणी रागाच्या भरात गुन्हा करतो.मात्र गुन्हा केल्यानंतर त्याला पोलिस पकडतात, आणि न्यायालय शिक्षा ठोठावते. त्यानंतर शिक्षा ठोठावलेल्या आणि न्यायालीन कोठडी झालेल्या गुन्हेगारांना कारागृहात पाठवले जाते. तुरुंग, ज्याला कारागृह सुद्धा म्हणतात. कारागृहातील जीवन म्हणजे एक बंदिस्त जीवन, भक्कम आणि उंच उंच भिती, मजबूत लोखंडी सळाखींची दार. सारे सोबतीही गुन्हेगार. सोन्यासारख्या जीवनाची माती झालेली असते. सार आयुष्य अंधारात जाणार. थोडेफार अट्टल गुन्हेगार वगळता जवळपास सगळ्यांनाच पश्चात्ताप झालेला असतो. परिणामी चेहऱ्यावर पश्चाताप दिसू लागतो. अशा दु:खाच्या आणि पश्चात्तापाच्या विचारात घेरलेल्या बंदी बांधवांना मात्र खळखळून हसण्याचा योग आला. या निमित्त नेताजी नगरमधील हरहुन्नरी कलावंत गजानन वानखडे आणि त्यांच्या चमुचा म्हणजेच अण्णाभाऊ भाऊ साठे बहुउद्देशिय संस्था यवतमाळ या संस्थेचे कलावंतांनी मनोरंजनातून प्रबोधनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

यावेळी शाहीर गजानन वानखडे, गजानन जडेकर, आनंदा जवादे, प्रगती वरघट, उषा वानखडे, प्रशांत खोरगडे यांनी एकापेक्ष एक सुंदर विनोदी लघुनाट्य सादर केले. या वेळी वारेष्ठ तुरुंग अधिकारी सुरेंद्र ठाकरे, संत गाडगेबाबा समितीचे अध्यक्ष आनंद कसंबे, तुरुंग अधिकारी माधव खैरगे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विनोदी किस्स्यांनी बंदी बांधवाच्या चेहऱ्यावर एकच हास्य फुलले. दारु पिण्याचे, तंबाखू खाण्याचे दुष्परिणाम, लहान विषयावरुन भांडण, हाणामारी त्यामुळे होणारे परिणाम अशा विविध विषयांवर कलावंतांनी अतिशय समर्पक पथनाट्य सादर केले.सुमधूर लोकगीते गायली.हे जीवन सुंदर आहे, त्यामुळे येथून घरी गेल्यावर, झालं गेलं विसरा आणि चांगले आदर्श जीवन जगा, असा संदेशही गजानन वानखडे यांनी दिला. यावेळी बंदी बांधवांनी टाळ्या वाजवून प्रतिसाद दिला.

### दाते महाविद्यालयात मराठी विभागातर्फे काव्यस्पर्धा



**यवतमाळ** : मराठी विभागाद्वारे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी काव्यस्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश सिंगरू यांच्या मार्गदर्शनात हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटक व अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. ताराचंद कंठाळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. सचिन जयस्वाल, प्रा. गजानन लांजेवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयातील जास्तीत जास्त संख्येने विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले. विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर आधारित कविता यावेळी सादर केल्या, शेतकरी, आयुष्य, प्रेम, निसर्ग, धरती, पत्र, नदी, असे विविध विषय घेऊन विद्यार्थी आपल्या कवितेच्या माध्यमातून अभिव्यक्त झाले. या स्पर्धेत नयना शेंडे यांचा प्रथम तर सानिया निकोडे या विद्यार्थिनीचा द्वितीय क्रमांक मिळाला. या विद्यार्थिनींना विद्यापीठ स्तरावर होणाऱ्या कवी केशवसूत काव्यस्पर्धेसाठी पाठविण्यात येणार आहे. प्रास्ताविक प्रा. आशिष कांबळे यांनी केले. संचालन प्रा. स्नेहल सोनटक्के यांनी केले, तर आभार प्रा. नितेश गेडाम यांनी मानले. या कार्यक्रमाला प्रा. काजल वांढरे, प्रा. अनिरुद्ध नरखेडकर, प्रा. शुभम चांभारे यांनी कविता सादर केल्या. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मराठी विभाग व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

### इंदिरा महाविद्यालयात एआय, रोबोटिक्सवर कार्यशाळा

**कळंब** : येथील इंदिरा महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण, रसायनशास्त्र आणि भौतिकशास्त्र विभागाच्या वतीने आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि रोबोटिक्सवर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. पवन मांडवकर होते. मार्गदर्शक म्हणून विद्युत परमाणू शास्त्र अभियंता प्रिया अग्रवाल व संचिता आखरे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना आर्टिफिशियल इंटेलिजन्स व रोबोटिक्समधील नवनवीन संशोधन, प्रगती व उद्योग क्षेत्रातील संधी तसेच भविष्यातील करिअर याविषयी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. पतन मांडवकर म्हणाले, नवीन तंत्रज्ञान स्वीकारणे, सतत कौशल्य विकसित करणे, बदलत्या युगासोबत जुळवून घेणे ही काळाची गरज आहे. प्रास्ताविक प्रा. प्रशांत जवादे यांनी केले. संचालन प्रा. रूपेश आत्रात तर आभार डॉ. विकी वाटकर यांनी मानले. पाहुण्यांचा परिचय डॉ. कैलास नेमाडे यांनी करून दिला. यशस्वितेसाठी शारीरिक शिक्षण विभागाच्या संचालक शीतल राऊत यांच्या मार्गदर्शनात प्रा. सेहल खांडेकर, डॉ. सूरज देशमुख, प्रा. जवाहर बोदुलवार, प्रा. सखाराम सांगळे यांचा पुढाकार होता.

### राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांचा दौरा



**यवतमाळ, दि.५, महासागर प्रतिनिधी:** राज्याचे गृह, गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार व खनिकर्म राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम खालील प्रमाणे आहे. शनिवार दिनांक ६ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजता यवतमाळ येथे आगमण व चिंतामणी कृषी उत्पन्न बाजार समिती यार्ड, भोयर बायपास जवळ, एमआयडीसी लोहारा येथे आध्यात्मिक गुरू मोरारी बापू यांच्या रामकथा महोत्सवासाठी उपस्थित राहतील. सायंकाळी ५.३० वाजता वर्धाकडे प्रयाण करतील. सायंकाळी ५.३० वाजता वर्धाकडे प्रयाण करतील.

## आपले सरकार सेवा केंद्रासाठी पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा उद्या

**यवतमाळ, दि.५, महासागर प्रतिनिधी:** आपले सरकार सेवा केंद्रासाठी अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुसार पडताळणीत पात्र झालेल्या उमेदवारांची लेखी परीक्षा दिनांक ७ सप्टेंबर रोजी जिल्ह्यातील सर्व १६ तालुकानिहाय परीक्षा केंद्रांवर घेण्यात येणार आहे. परीक्षा केंद्रांची यादी व उमेदवारांचे प्रवेशपत्र www.yavatmal.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहेत. उमेदवारांनी परीक्षेला येतांना मुळ आधार कार्ड, पॅनकार्ड, मतदार ओळखपत्र, प्रवेशपत्र, सामाजिक क्षेत्रात राबविलेले उपक्रम अथवा सामाजिक क्षेत्रातील कार्याचा अनुभव असल्यास त्याच्या प्रत्येकी दोन छायांकित प्रती सोबत आणणे आवश्यक आहे. सदर प्रती उत्तरपत्रिकेसोबत जोडाव्यात. उमेदवार परीक्षेला अनुपस्थित राहिल्यास, त्यांचे परीक्षेतील गुण शून्य धरले जातील. परीक्षेत नकारात्मक गुणांकन नाही, त्यामुळे सर्व प्रश्न सोडवणे योग्य राहील. परीक्षेचे स्वरूपामध्ये लोकसेवा हक्क अधिनियम २०१५, संगणक, तांत्रिक ज्ञान, सामान्य ज्ञान व व्यक्ती महत्व यावर बहुपर्यायी प्रश्न राहतील. परीक्षा दिनांक ७ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी १२ वाजता या दरम्यान घेण्यात येईल. उमेदवारांनी सकाळी १०.३० वाजतापर्यंत परीक्षा केंद्रावर हजर राहणे आवश्यक आहे. सकाळी १०.४५ नंतर कोणत्याही उमेदवारास परीक्षेस बसू दिले जाणार नाही, असे निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी यांनी कळविले आहे.

**बसस्थानकातून दोघांचे मोबाइल उडविले:** वणी येथील बसस्थानकावरून दोन प्रवाशांचे मोबाइल उडविण्यात आल्याची घटना उडघकीस आली आहे. बजरंग विठ्ठल परबत (रा. निजामपूर, ता. रिसोड, जि. वाशिम) व राहुल मारोती कुंभारे (रा. राजूर कॉ., ता. वणी) या दोघांचे मोबाइल अज्ञात चोरट्यांनी शर्टच्या खिशातून उडविले. ही घटना ३ सप्टेंबरला घडली. ही बाब लक्षात आल्यानंतर दोघांनीही वणी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## सक्षमीकरणाऐवजी महिलांचे फायनान्सकडून खच्चीकरण




**मारेगाव, दि.५, महासागर प्रतिनिधी:** ग्रामीण भागातील महिलांच्या बचतीसाठी उभारलेले मायक्रो फायनान्सचे गट आज विकासाऐवजी आर्थिक संकटाचे जाळे ठरत आहेत. गरजेच्या वेळी घेतलेले छोटे कर्ज आता शेतकरी व महिलांच्या डोळ्यात पाणी आणत आहे. अनेकजण हप्त्याच्या तगाद्याने त्रस्त होत. आहे. तालुक्यातच नव्हे तर जिल्हाभर हा प्रश्न चिंतेचा विषय बनला आहे.

मायक्रो फायनान्स गटाकडून त्यांचे खच्चीकरण होत असल्याचे दिसून येत आहे. शेतीमालाला योग्य भाव मिळत नसल्याने, घरगुती खर्च व वैद्यकीय भागवण्यासाठी भागातील महिला मायक्रो फायनान्स गटातून कर्ज घेतात. सुरुवातीस हे कर्ज सहज मिळते, परंतु, त्याचे ' व्याजदर आणि हप्त्यांचा भार वाढत गेल्याने महिलांना जगणे कठीण गरजा ग्रामीण झाले. वेळेवर हप्ते न भरल्यास वसुलीसाठी दबाव आणला जातो. घेतलेले कर्ज काही ठिकाणी तर गावातच महिलांना अपमानास सामोरे जावे लागते. गावागावांत मायक्रो फायनान्स कंपन्यांनी बचत गटांच्या माध्यमातून आपले जाळे पसरवले आहे. सुरुवातीला महिलांना आकर्षित करण्यासाठी कमी व्याजदरांचे आश्वासन दिले जाते. मात्र, नंतर लपवलेले व्याज व अतिरिक्त शुल्कामुळे दुप्पट-तिप्पट वाढते. यामुळे सामान्य महिलांचा आर्थिक समतोल बिघडतो. तालुक्यातील अनेक कुटुंबांवर या कर्जाचे ओझे इतके वाढले आहे की घर चालवणे कठीण झाले आहे. आम्ही खंबीरपणे महिलांच्या पाठीशी उभी असून, त्यांच्या हक्कासाठी लढत राहील, अशी ग्वाही माजी जि. प. सभापती अरुणा खंडाळकर यांनी दिली.

## संयुक्त कुटुंबात वैयक्तिक त्याग मुख्य संस्कार: रोहित वनकर




**वणी, दि.५, महासागर प्रतिनिधी:** वर्तमान काळातील कुटुंब संरचनेतील बदल हे सामाजिक, आर्थिक, तांत्रिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाचे प्रतिबिंब आहे. आधुनिक जीवन शैलीमुळे स्वातंत्र्य वाढले, परंतु भावनिक नाती काही प्रमाणात कमी झाली. संयुक्त कुटुंब पद्धतीमध्ये स्वातंत्र्य कमी असेल तरी कुटुंबासाठी प्रत्येकाचा वैयक्तिक त्याग हा मुख्य संस्कार होता, असे प्रतिपादन प्राचार्य रोहित वनकर यांनी केले.

ते नगर वाचनालयात विदर्भ साहित्य संघ वणी व नगर वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित माझा गाव माझा वक्ता या व्याख्यानमालेचे ४८ वे पुष्प गुंफताना वर्तमानातील कुटुंब संरचनेतील परिवर्तन या विषयावर बोलत होते. अध्यक्षस्थानी विदर्भ साहित्य संघ वणीचे अध्यक्ष डॉ. दिलीप अलोणे होते.

प्रमुख अतिथी म्हणून समाजसेविका सावित्रीबाई फुले पुरस्कार प्राप्त राणानूर सिद्दिकी उपस्थित होत्या. भारतात कुटुंबे संयुक्त स्वरूपाचे होते. त्याला धर्म, परंपरा, शेतीप्रधान अर्थव्यवस्था, एकत्र राहण्याची गरज याचा आधार होता. परंतु १९ व्या शतकापासून शिक्षण, औद्योगिकरण, इंग्रजी शासन, समाजसुधारकांची चळवळ यामुळे कुटुंब संरचनेत बदल घडू लागली.

औद्योगिक क्रांतीमुळे लोक गावातून शहराकडे गेले. त्यामुळे संयुक्त कुटुंब तुटली शिक्षणामुळे स्त्रियांना नवीन संधी मिळाल्या कुटुंबातील पुरुषप्रधान वर्चस्व कमी झाले आणि स्त्री-पुरुष समानतेकडे वाटचाल सुरू झाली.

संयुक्त कुटुंबात आजी-आजोबा आणि इतर नातेवाइकांमुळे लहान मुलांचे संगोपन नीट आणि सुदृढ व्यक्ती होत होते. आता कुटुंबामध्ये वृद्ध नसल्यामुळे डे केअर प्ले स्कूलकडे मुलांना पाठवावे लागते. त्यामुळे मूल्ये, संस्कार, परंपरा, सामूहिक जबाबदारी यात कुठेतरी कमतरता येऊन व्यक्तिवाद, स्वातंत्र्य आणि करिअरकडे कुटुंबांचा कल दिसत असल्याचे ते म्हणाले. प्रास्ताविक सचिव गजानन कासावार यांनी केले. संचालन सचिव डॉ. अभिजीत अणे यांनी केले.

### महाळुंगी आश्रमशाळेत भटके विमुक्त दिन



**आर्णी** : महाळुंगी येथील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विजाभज आश्रम शाळेत भटके विमुक्त दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम, रक्तदान शिबिर, हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र, जातीचे व उत्पन्नाचे दाखले वाटप, आयुष्यमान भारत या आरोग्य योजनेविषयी जनजागृती करण्यात आली. प्राचार्य भूपाल राठोड यांनी कार्यक्रमाची रुपरेषा मांडली. यावेळी विविध विषयाला अनुसरून विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले. काही विद्यार्थ्यांनी बंजारा बोलीभाषेची वैशिष्ट्ये, चालीरीती आणि इतिहास सांगितला. आरोग्य विभागाच्या सहकार्याने आयोजित शिबिरात ३० पिशव्या रक्त संकलित करण्यात आले. विद्यार्थ्यांना ११० आयुष्मान कार्डचे वाटप झाले. हरित महाराष्ट्र-समृद्ध महाराष्ट्र अंतर्गत ७५ रोपं लावण्यात आली. ४२ विद्यार्थ्यांना जातीचे दाखले, उत्पनाचे दाखले आणि अधिवास प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. यावेळी अध्यक्षस्थानी प्राचार्य भूपाल राठोड होते. प्रमुख पाहुणे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यालयाचे मुख्याध्यापक गजानन कुकडे, वैद्यकीय अधिकारी मैथिली राठोड, कुणाल राठोड आदी होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. के.डी. चव्हाण यांनी केले. आभार पत्रे यांनी मानले.

: आरएनआय रजिष्ट्रेशन क्रमांक :
-२०१०/३५७९९-
महासागर यवतमाळ
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्णा तन्मुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर-१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, बस स्टँड चौक, होटल प्रकाश जवळ, यवतमाळ येथे प्रकाशित केले. संपादक-श्रीकृष्ण तनमुखदास चांडक मुख्य कार्यालय पोन-०७१२-२७६७६२८-९९२२९७००२३ स्थानिक संपादक-रघुवीरसिंह चौहान फोन-९४२३४३३२४४ (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांचेवर राहिल.)

# विविधा...

# फडणवीस आणि जरांगे, जिंकले कोण?

इंडिया कॉलिंग
डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

गणेशोत्सवाची धामधुम चालू असताना तब्बल पाच दिवस मुंबईत झालेल्या मराठा आंदोलनाने सर्व देशाचे लक्ष वेधून घेतले होते. मराठा- कुणबी एकच असा जीआर घेतल्याशिवाय मुंबई सोडणार नाही, असा निश्चय मनोज जरांगे यांनी जाहीर केल्यामुळे देवेंद्र फडणवीस यांच्या महायुती सरकारपुढे मोठा पेच निर्माण झाला होता.

आंदोलन सुरू केल्यावर जरांगे लवकर मागे हटत नाहीत आणि सरकारकडून लेखी आश्वासन मिळाल्याशिवाय उपोषण मागे घेत नाहीत हा आजवरचा अनुभव आहे. मराठवाड्यातील जालना जिल्ह्यातील एका लहान गावात पत्र्याच्या घरात राहणाऱ्या पायजमा आणि सदरा अशा साध्या पोशाखात वावरणाऱ्या, चेहऱ्यावर खुरटलेली दाढी असलेल्या मनोज जरांगे या नेत्याने मराठा समाजाचा मोठा विश्वास संपादन केला आहे.

आरक्षण मिळाल्याशिवाय या समाजाच्या लेकराबाळांना भविष्य नाही हे त्यांनी लोकांच्या मनावर ठसवले आहे. मराठा समाजाला सरसकट कुणबी म्हणून प्रमाणपत्र मिळावे व ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे, यासाठी त्यांनी संघर्ष उभारला आहे. मराठा समाजातील लक्षावधी तरूण त्यांच्या पाठिशी उभे आहेत.

महाराष्ट्रात शरद पवार, वसंतदादा पाटील यांच्यापासून अगदी अशोक चव्हाण, पृथ्वीराज चव्हाणापर्यंत एक डझनपेक्षा जास्त मराठा मुख्यमंत्री झाले पण त्यांनी कोणीही या समाजाला आरक्षण दिले नाही. एक म्हणजे त्यांच्या काळात मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी प्रखर आंदोलनही कधी झाले नव्हते आणि जरांगेंसारखा हट्टी व निश्चयी नेताही मैदानात उतरला नव्हता.

कोणत्याही राजकीय पक्षाचा टिळा न लावलेल्या जरांगेनी लक्षावधी मराठा तरूणांचा प्रचंड विश्वास संपादन केला आहे. म्हणूनच त्यांनी हाक मारल्यावर आंदोलनात सहभागी होण्यासाठी तरूणांच्या फौजा मिळेल त्या वाहनाने व सापडेल त्या मार्गाने धावत येतात हेच नेहमी दृश्य दिसते.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी गणेशोत्सवात मुंबईत येऊन धडकणार असे जरांगे यांनी चार महिन्यापूर्वीच जाहीर केले होते, ते २९ ऑगस्टला आझाद मैदानावर येऊन थडकले. त्यांच्या पाठापाठ हजारो आंदोलक मोटारी, बसेस, टेम्पो आदी वाहनानी मुंबईत येऊन पोचले. चार दिवस दक्षिण मुंबईचे जनजीवन पार विस्कळीत झाले होते. वाहतुकीचे तीन तेरा वाजले होते. लक्षावधी चाकररमान्यांचे हाल झाले.

न्यायालयाने आंदोलकांवर व सरकार ताशेरे मारल्यावर सरकारचे डोळे उघडले. रस्ते, पदपथ, रेल्वे स्टेशन्स आंदोलकांपासून मुक्त करा, स्वच्छ करा असे न्यायालयाने आदेश दिल्यावर मंत्रालय सतर्क झाले. देशाच्या आर्थिक राजधानीत अराजकासारखी परिस्थिती निर्माण झाली होती, आंदोलकांचे वर्तन फ्री फॉर ऑल होते. त्यांना वेसण घालणे महत्वाचे तर होतेच पण जरांगेंना त्यांच्या मागण्या मान्य झाल्याचे समाधान मिळणेही महत्वाचे होते.

२ सप्टेंबर रोजी दुपारी चार वाजता मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखेपाटील, उदय सामंत, शिवेंद्र राजे भोसले, माणिकराव कोकाटे, जयकुमार गोरे हे जरांगे यांच्याशी चर्चा करायला आझाद मैदानावर पोचले. तासाभरात त्यांच्या मागण्यांविषयक जीआर त्यांच्या हाती सोपवला आणि आपल्या आठ पैकी सहा मागण्या मान्य झाल्याचे समाधानही जरांगे यांना मिळाले.

राज्यात घराघरात टीव्हीच्या पडद्यावर कोट्यवधी जनता राज्याचे पाच मंत्री जरांगे यांना कसे समजावत आहेत हे पाहात होती. आरक्षणाचे काय होणार, कुणबी प्रमाणपत्र कधी मिळणार आणि ओबीसी प्रवर्गातून आरक्षण कधीपासून लागू होणार याची उत्सुकता तमाम मराठा समाजाला आहे. राधाकष्ण विखेंनी दिलेला जीआर वाचून जरांगे समाधानी झालेच आणि त्यांनी आझाद मैदानावर जमलेल्या तमाम आंदोलकांसमोर जिंकलो रे राजा, आपुन अशी घोषणा दिली.

मुंबईतील आंदोलनानंतर मनोज जरांगे हे मराठा समाजाचे हिरो ठरले. तसेच मराठा आंदोलन संयमाने हाताळल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर स्तुतीसुमनांचा वर्षाव होताना दिसतो आहे.

मराठा आरक्षणाच्या संघर्षात आंदोलक विरूध्द सरकार आणि जरांगे विरूध्द फडणवीस असे वातावरण निर्माण झाले होते. गेल्या वर्षी फडणवीस हे मुख्यमंत्री असताना आंतरवाली सराटी येथे आंदोलकांवर झालेल्या लठीमारानंतर जरांगे यांनी फडणवीसांना खलनायक ठरवले होते. त्यानंतर फडणवीसांना आंदोलक नेत्यांनी व विरोधी पक्षांनी जणू टार्गेट बनवले.

फडणवीस हे मराठा आरक्षण विरोधी आहेत असे चित्र रंगवले गेले. बामनीकावा, अनाजीपंत, कपटी, खोटारडा, पाताळयंत्री अशा शिवराळ भाषेचा वापर केला. पण देवाभाऊंनी अशा टीकेला एका शब्दानेही प्रत्युत्तर दिले नाही किंवा पोलिसांच्या फौजा पाठवून मुख्यमंत्र्यांची बदनामी केली म्हणून कारवाई केली नाही.

विरोधी पक्षातील एका गटाने तर फडणवीसांच्या विरोधात सोशल मिडियावर व्यावसायीक कंत्राट देऊन प्रचार मोहीम मोहीम चालवली. त्याचे सुरूवातीला केंद्र छत्रपती संभाजी नगर होते नंतर ते नवी मुंबईत हालविण्यात आले, त्याची सर्व माहिती फडणवीसांपर्यंत पोचली होती.

मराठा समाजाला पहिले आरक्षण दिले फडणवीसांनी आणि आता पुन्हा देऊ केले तेही फडणवीसांनीच. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून कर्ज वाटप, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्या, सारथीची स्थापना हे सर्व फडणवीसांनीच केले पण जरांगेंनी त्यांचे विरोधक समजून त्यांच्यावर टीकास्त्र सोडले. मनासारखा जीआर मिळाल्यावर जरांगे यांनी फडणवीसांचे आभार मानताना आता आपले वैर संपले असे जाहीर करून टाकले.

फडणविसांनी आंदोलकांच्या मागण्या मान्य झाल्याचे श्रेय घेतले नाही किंवा जरांगे यांनी उपोषण सोडावे म्हणून त्यांना सरबत देण्यास गेले नाहीत, उलट त्यांनी ते काम राधाकृष्ण विखेपाटलांवर सोपवले. आंदोलन मिटल्याचे सारे श्रेय मुख्यमंत्र्यांनी विखेपाटलांच्या उपसमितीला दिले. मराठा आंदोलन संपल्यावर सोशल मिडियावर धन्यवाद देवाभाऊ अशा पोस्टचा वर्षाव होत राहीला. देवाभाऊंचा मास्टर स्ट्रोक असेही कौतुक झाले. जरांगे व फडणवीस यांच्या अभिनंदनाचे फलक अनेक ठिकाणी लागले.

मराठा आरक्षण आंदोलनात एकनाथ शिंदे, अजितदादा पवार, गिरीश महाजन, चंद्रकांत पाटील हे मान्यवर कुठे दिसले नाहीत. विखेपाटील हे नवे संकट मोचक म्हणून पुढे आले. आता सरकारच्या जीआर विरोधात ओबीसी नेत्यांनी दंड थोपटले आहेत तर दुसरीकडे सरकारे मराठा समाजाच्या तोंडाला पुन्हा पाने पुसली अशी टीका सुरू झाली आहे. फडणवीसांचा जीआर म्हणजे एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असतानाच्या काढलेल्या जीआरची किंचित सुधारीत आवृत्ती आहे, जुनी दारू नवीन बाटली असे वर्णन केले जात आहे.

आंदोलन काळात समाज माध्यमांवर दिवंगत मुख्यमंत्री विलासराव देशमुखांच्या भाषणाची एक क्लिप प्रचंड व्हायरल झाली. व्यासपीठावर दिवंगत मुख्यमंत्री मनोहर जोशी, त्यांच्या शेजारी गोपीनाथ मुंडे व आर. आर. पाटील हे दिसत आहेत. विलासराव त्यांच्या भाषणात म्हणतात- आपण आरक्षणाच्या विरोधात नाही, गोरगरीबांना ते मिळालेच पाहिजे . मात्र जातीनिहाय आरक्षण देणार असाल तर भविष्यातही संघर्ष चालूच राहील.

आरक्षण हेआर्थिक निषकांवर मिळाले मिळाले पाहिजे. जातीनिहाय आरक्षण दिले गेले तर प्रत्येक जण आपली जात शोधत राहील. आर्थिक निकषावर आरक्षण दिले जावे यासाठी सर्वपक्षीय सहमती करायला हवी. महाराष्ट्राच्या नेतृत्वाने संकुचित विचार करता कामा नये.

## शाश्वत विकासाची दूरदृष्टीपूर्ण लोकचळवळ

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान

■ किरण वाघ
विभागीय संपर्क अधिकारी
मंत्रालय, मुंबई.

आपला भारत देश हा कृषिप्रधान आहे आणि गाव हे त्याचे प्राणकेंद्र आहे. त्यामुळे गावांचे प्रश्न सोडविल्याशिवाय आणि त्यांचा शाश्वत विकास साधल्याशिवाय देशाचा सर्वांगीण विकास शक्य नाही. शाश्वत विकास हा असा विकास आहे, जो सध्याच्या पिढीच्या गरजा भागविताना पुढील पिढ्यांसाठी साधन संपत्तीचे सातत्याने संवर्धन करत राहतो. म्हणूनच गावांचा शाश्वत विकास हा आपल्या राज्याच्या व राष्ट्राच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.

आज अनेक गावांमध्ये शिक्षण, आरोग्य, रोजगार, रस्ते, पिण्याचे पाणी, वीजपुरवठा या मूलभूत गरजांसह रोजगार, माहिती तंत्रज्ञान, शाळांमध्ये शिक्षणाचा उच्च दर्जा, शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी सर्वांगीण सुविधा, प्राथमिक आरोग्य केंद्रे तेथे औषधांची उपलब्धता, तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा अशा प्राथमिक चांगल्या सुविधा उपलब्ध करणे यासाठी शासन मोठ्या प्रमाणात काम करते.

या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने ग्रामीण विकासासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. अभियानाचा शुभारंभ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवशी १७ सप्टेंबर २०२५ रोजी होणार आहे. ही अंमलबजावणी केवळ स्पर्धात्मक राहणार नसून ग्रामविकास अभियानाला लोकचळवळीचे स्वरूप देणारी ठरेल.

हे अभियान राबविण्याची संकल्पना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आहे. २९ जुलै २०२५ रोजी राज्य मंत्रिमंडळाची यास मंजुरी मिळाली व अभियानाच्या अंमलबजावणीसाठी महत्वाचे पाऊल टाकले गेले. अभियान राबविण्यासाठी रूपये २९०.३३ कोटींची तरतूद करण्यात आली, त्यापैकी रूपये २४५.२० कोटी पुरस्कारांसाठी, तर उर्वरित निधी प्रचार, प्रशिक्षण आणि मार्गदर्शनासाठी वापरण्यात येणार आहे.

**अभियानाचे उद्दिष्ट**

या अभियानाचा मुख्य उद्देश गावागावात सुशासन प्रस्थापित करणे, ग्रामस्थांमध्ये आत्मनिर्भरता निर्माण करणे आणि विकासासाठी स्पर्धात्मक वातावरण तयार करणे आहे. योजना केवळ प्रशासकीय यंत्रणेपुरती मर्यादित नसून, ग्रामस्थांच्या थेट सहभागावर आधारलेली आहे.

ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामविकास विभाग शाश्वत विकास साधण्यासाठी ठिबक सिंचन, शेततळी, बंधारे, जलसंवर्धन, जलयुक्त शिवार यांसारख्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करत आहे.

सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन, रासायनिक खतांचा वापर टाळण्यासाठी प्रयत्न, आवास योजनांतर्गत घरे, महिलांना बचतगटांच्या माध्यमातून सक्षम करणे, तसेच दुग्धोत्पादन, मधमाशीपालन, मत्स्यव्यवसाय आणि कुक्कुटपालन यांना चालना देऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यावर भर देण्यात येत आहे. या प्रयत्नांना अभियानातून प्रोत्साहन मिळणार आहे.

**अभियानाचे ७ प्रमुख घटक**

१. सुशासनयुक्त पंचायत – पारदर्शक व लोकाभिमुख प्रशासन
२. सक्षम पंचायत – आर्थिक स्वावलंबन, कंपनी सामाजिक उत्तरदायित्व निधी (उरफ) व लोकवर्गणी
३. जलसमृद्ध, स्वच्छ व हरित गाव – पर्यावरण संरक्षण व पाणी व्यवस्थापन
४. योजनांचे अभिसरण – मनरेगा व इतर योजनांची प्रभावी अंमलबजावणी
५. संस्था सक्षमीकरण – शाळा, अंगणवाडी, आरोग्य केंद्रे यांची बळकटी
६. उपजीविका विकास व सामाजिक न्याय – रोजगार निर्मिती व महिला सक्षमीकरण
७. लोकसहभाग व श्रमदान – ग्रामस्थांचा प्रत्यक्ष सहभाग व श्रमदान

खरं तर सातवा घटक वैशिष्ट्यपूर्ण असून गावकऱ्यांचा थेट सहभाग व श्रमदान याचा अर्थ लोकसहभाग व श्रमदान यातून हे अभियान लोकचळवळ बनणे अपेक्षित आहे. अभियानाला प्रोत्साहन देण्याचे काम पुरस्काराच्या रूपाने होईल.

पुरस्कारांसाठी एकूण २४५.२० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. एकूण १९०२ यशस्वी स्थानिक स्वराज्य संस्थांना पुरस्कार देण्यात येणार आहेत. या गावांच्या विकास कामांसाठी या ग्रामपंचायतींना मोठा निधी उपलब्ध होईल.

**पुरस्कार रचना :**

राज्यात प्रथम विजेत्या ग्रामपंचायतीस ५ कोटी रुपयांचा राज्यस्तरीय पुरस्कार दिला जाईल. तर द्वितीय ३ कोटी रुपये, तृतीय २ कोटी रुपये पुरस्कार असेल.

**विभागस्तरीय पुरस्कार -**

प्रत्येक विभागात ३ ग्रामपंचायतीना पुरस्कार. प्रथम रुपये १कोटी, द्वितीय रुपये ८० लाख, तृतीय रुपये ६० लाख.

**जिल्हास्तरीय पुरस्कार -**

प्रत्येक जिल्ह्यात ३ ग्रामपंचायतीना पुरस्कार. प्रथम रू ५० लाख, द्वितीय रू ३० लाख, तृतीय रुपये २० लाख.

**तालुकास्तरीय पुरस्कार :-**

प्रत्येक तालुक्यात ३ ग्रामपंचायतीना पुरस्कार प्रथम रुपये १५ लाख, द्वितीय रुपये १२ लाख, तृतीय रुपये ८ लाख.

**विशेष पुरस्कार :** प्रत्येकी तालुक्यातील २ ग्रामपंचायतींना प्रत्येकी ५ लाख रुपये पुरस्कार आहे.

विभाग आणि राज्यस्तरावर पंचायत समित्यांसाठी आणि जिल्हा परिषदासाठी ही आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहे.

पंचायत समित्यांना ३ राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात येतील. प्रथम २ कोटी, द्वितीय १.५ कोटी, तृतीय १.२५ कोटी असे पुरस्कार आहे.

विभागस्तरीय पुरस्कारांमध्ये प्रथम १ कोटी, द्वितीय ७५ लाख, तृतीय ६० लाख रुपये असे आहे

जिल्हा परिषदांना अभियानाच्या उत्कृष्ट अंमलबजावणीसाठी राज्यात ३ जिल्हा परिषदांना पुरस्कार आहेत यात प्रथम ५ कोटी, द्वितीय ३ कोटी, तृतीय २ कोटी असे पुरस्कार दिले जातील.

या अभियानाचा कालावधी १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ असा असून, एकूण १०० गुणांच्या निकषांवर मूल्यांकन केले जाईल. पारदर्शक प्रशासन, आरोग्य, शिक्षण, महिला सक्षमीकरण, रोजगार, पर्यावरण, कर वसुली आणि लोकसहभाग यांचा विचार केला जाईल.

प्रत्येक ग्रामपंचायतीने दररोजचा अहवाल विशेष मोबाईल ॲप्लिकेशन आणि वेबसाईटवर सादर करावा लागेल. अभियानापूर्वी राज्यस्तरीय कार्यशाळा, जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय प्रशिक्षण, तसेच ग्रामसभांच्या माध्यमातून तयारी केली जाईल. व्यापक जनजागृतीसाठी कार्यशाळा, पोस्टर, बॅनर, सोशल मिडिया, यशोगाथा चित्रफीत आणि इतर साधनांचा उपयोग केला जाणार आहे.

राज्य आणि देशाच्या शाश्वत विकासासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण ही प्रगतीची पहिली पायरी आहे. सक्षम युवा पिढी घडवण्यासाठी गावांमध्ये डिजिटल वर्ग, ई-लर्निंग, पुस्तकालये, तसेच कौशल्याधारित प्रशिक्षण केंद्रे स्थापन करणे. यातून युवक युवतींना संगणक, मोबाईल रिपेअरिंग, इलेक्ट्रिक, शिवणकाम, कारागिरी अशा विविध व्यवसाय शिक्षणातून कौशल्य दिल्यास रोजगार निर्मिती व उद्योजकता वाढेल. अशा गावाच्या विकासावर परिणाम करणाऱ्या सर्व घटकांना चालना देण्यावर या निमित्ताने लक्ष दिले जात आहे.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान ही केवळ स्पर्धा नसून ग्रामीण महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाची दिशा आहे. प्रत्येक ग्रामस्थाने यात सहभाग घेतल्यास गावांचा चेहरामोहरा बदलून शाश्वत विकास साध्य होईल. हे अभियान खऱ्या अर्थाने लोकचळवळीचे दूरदृष्टीपूर्ण पाऊल ठरेल.

■ ■ ■

# बिहारमध्ये महाआघाडीचे पारडे जड!



अभय गोखले

बिहार मधील व्होटर अधिकार यात्रेत कॉंग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या बरोबर राजदचे नेते तेजस्वी यादव हेही सहभागी झाले आहेत. या यात्रेला बिहार मधील जनतेचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे.

या यात्रेतील शेवटच्या टप्प्यात एके ठिकाणी भाषण करताना तेजस्वी यादव यांनी स्वतःला मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार जाहीर करुन खळबळ माजवली.बिहार मध्ये लवकरच विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत.राजदच्या नेतृत्वाखालील महाआघाडीत कॉंग्रेस,डावे पक्ष आणि इतर छोट्या पक्षांचा समावेश आहे. महाआघाडीतील सर्वात मोठा पक्ष असलेल्या राजदचे नेते म्हणून तेजस्वी यादव यांचा मुख्यमंत्री पदावरील दावा समजण्यासारखा आहे.

व्होटर अधिकार यात्रेच्या दरम्यान जेंव्हा जेंव्हा राहुल गांधी यांना मुख्यमंत्री पदाच्या संभाव्य उमेदवाराबाबत विचारणा झाली तेंव्हा त्यांनी काही तरी गुळमुळीत उत्तर देऊन तो प्रश्न टाळला.तेजस्वी यादव यांनी बरेच दिवस वाट पाहिली आणि शेवटी स्वतःला मुख्यमंत्री पदाचा उमेदवार जाहीर करुन, राहुल गांधी यांची कोंडी करण्यात यश मिळवले.आता राहुल गांधी यांना त्याबाबत आपली भूमिका स्पष्ट करावीच लागेल.

बिहार मध्ये लवकरच होणाऱ्या विधानसभा निवडणुकांसाठी व्होटर अधिकार यात्रेद्वारे राहुल गांधी आणि तेजस्वी यादव यांनी चांगली वातावरण निर्मिती केली आहे. निवडणूक आयोगाने बिहार मध्ये जी विशेष सखोल फेरतपासणी मोहीम राबवली आहे, त्यावर राहुल गांधी आणि तेजस्वी यादव हे कडाडून टीका करत आहेत. ही मोहिम भाजपाच्या फायद्यासाठी राबवली जात असल्याचा आरोप राहुल गांधी यांनी केला आहे.यात्रेच्या दरम्यान व्होट चोर गद्दी छोड अशा घोषणा दिल्या जात असून,त्याचा जनमानसावर नक्कीच परिणाम होत आहे.

बिहार मधील विशेष सखोल फेरतपासणी प्रक्रियेत ६५ लाख मतदारांची नावे वगळण्यात आली असून त्या बाबतची कारणमिमांसाही निवडणूक आयोगाकडून स्पष्ट करण्यात आली आहे.जी नांवे वगळण्यात आली आहेत, त्यामध्ये मृत्यू पावलेले मतदार, कायम स्वरुपी राज्याबाहेर गेलेले मतदार, एकाहून अधिक ठिकाणी नांव नोंदवलेले मतदार यांचा समावेश आहे.निवडणूक आयोगाने वगळलेल्या मतदारांची यादी प्रसिद्ध केली असून,त्या बाबत आक्षेप नोंदवण्यासाठी पुरेसा वेळ दिला आहे.

लवकरच होणाऱ्या बिहार विधानसभा निवडणुकांसाठी राजद प्रणित महाआघाडी मधील जागा वाटप अद्याप पार पडलेले नाही.२०२० च्या विधानसभा निवडणुकीत राजदने ७५ जागा जिंकून प्रथम क्रमांक पटकावला होता. महाआघाडीतील कॉंग्रेसला १९ जागांवर विजय मिळाला होता. प्रतिस्पर्धी, रालोआ मधील भाजपाला ७४ जागांवर विजय मिळाला होता,तर संयुक्त जनता दलाने ४३ जागा जिंकल्या होत्या. या खेपेस महाआघाडी आणि रालोआ यांच्यातील जागा वाटप सोपे असणार नाही. महाआघाडीत सर्वात जास्त जागा राजदच्या वाट्याला येतील. मात्र कॉंग्रेसला गेल्याखेपेइतक्या जागा मिळण्याची शक्यता फार कमी आहे.

२०२० च्या विधानसभा निवडणुकीत महाआघाडीच्या जागा वाटपात, कॉंग्रेसला ७० जागा सोडण्यात आल्या होत्या. मात्र कॉंग्रेसला त्यापैकी फक्त १९ जागा जिंकता आल्याने महाआघाडीच्या एकूण कामगिरीवर त्याचा विपरीत परिणाम झाला होता. महाआघाडीचे बहुमत थोडक्यात हुकले होते.कॉंग्रेसची गेल्या खेपेची निराशाजनक कामगिरी पाहता या खेपेस जागा वाटपात कॉंग्रेसच्या वाट्याला पुर्वी इतक्या जागा येण्याची शक्यता दिसत नाही. महाआघाडीत काही पक्षांची नव्याने एंट्री झाल्याने, त्यांना काही जागा सोडाव्या लागतील.रालोआमध्येही जागा वाटप सोपे असणार नाही. गेल्याखेपेस भाजपा पेक्षा ३१ जागा कमी मिळूनही, संयुक्त जनता दल जागा वाटपात पुर्वी इतक्याच जागा मागण्याची शक्यता आहे. त्यामुळे भाजपा आणि संयुक्त जनता दल हे रालोआ मधील मित्र पक्ष समसमान जागा लढविण्याची शक्यता दिसत आहे. चिराग पासवान यांचा लोक जनशक्ती पार्टी हा पक्ष रालोआ मधील महत्वाचा घटक पक्ष आहे.मात्र या पक्षाची निश्चित भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नाही.रालोआमध्ये राहून, चिराग पासवान हे मुख्यमंत्री नितीशकुमार आणि त्यांच्या नेतृत्वाखालील सरकारवर टीका करत आहेत.

२०२० च्या विधानसभा निवडणुकीत चिराग पासवान हे स्वतंत्रपणे लढले होते. त्यांनी स्वबळावर विधानसभेच्या १३५ जागा लढवल्या होत्या. त्यांच्या पक्षाला त्या निवडणुकीत केवळ एक जागा जिंकता आली होती.ते स्वतंत्रपणे लढल्याचा सर्वात मोठा फटका संयुक्त जनता दलाला बसला होता. चिराग पासवान यांच्या पक्षाने मतविभागणी घडवून आणल्याने, संयुक्त जनता दलाला २५ च्या आसपास जागा गमवाव्या लागल्या होत्या.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत चिराग पासवान यांच्या पक्षाला पाच जागा सोडण्यात आल्या होत्या.त्यासर्व जागा जिंकून त्यांच्या पक्षाने शंभर टक्के यश मिळविले होते. त्यांच्या पक्षाने जिंकलेल्या लोकसभा मतदारसंघांत येणाऱ्या विधानसभेच्या ३० जागांपैकी २९ जागांवर त्यांच्या उमेदवारांनी आघाडी घेतली होती. याचा अर्थ चिराग पासवान हे जागा वाटपात किमान तीस जागा आपल्या पक्षाकरता मागतील, ही गोष्ट निश्चित आहे.

त्याशिवाय हिंदुस्थानी अवाम मोर्चा आणि राष्ट्रीय लोक मोर्चा या अनुक्रमे जितनराम मांझी आणि उपेंद्र कुशवाहा यांच्या पक्षांसाठी रालोआला काही जागा सोडाव्या लागणार आहेत. राहुल गांधी यांच्या व्होटर अधिकार यात्रेला बिहार मधील जनतेकडून जो भरघोस प्रतिसाद मिळाला, तो पहाता सध्यातरी महाआघाडीचे पारडे जड दिसत आहे.अर्थात दोन्ही आघाड्यांचे विधानसभा निवडणुकीतील यशापयश हे जागा वाटप कसे होते, यावर अवलंबून रहाणार आहे. जागा वाटपाच्या मुद्द्यावरून महाआघाडीसाठी कॉंग्रेस आणि रालोआसाठी चिराग पासवान हे डोकेदुखी ठरू शकतील.

■ ■ ■

# आजच्या आणि पूर्वीच्या शिक्षकातील सरस निरसता

शब्दस्पर्शी सुनील शिरपुरे
कमळवेल्ली, यवतमाळ.
७०५७१८५४७९

आजचे शिक्षक हे पूर्वीच्या शिक्षकांपेक्षा सरस आहेत का? हे सांगणे खूप अवघड झाले आहे. आधी पण शिक्षक चांगले होते आणि आता सुद्धा शिक्षक चांगले आहेत. प्रत्येक नोकरी प्रमाणे काही शिक्षक आधी पण चांगले नव्हते आणि आता सुद्धा चांगले नाहीत.

आधी शिक्षकांना तुटपुंज्या पगारावर काम करावे लागायचे आणि पदोन्नतीच्या संधी कमी होत्या. पण आता तसे नाही. शिक्षकांना चांगला पगार आहे. पदोन्नतीच्या संधीही उपलब्ध आहेत. कार्यक्षम आणि मेहनत घेणा-या व्यक्तींची नेमणूक होण्याची गरज आहे. शिक्षक हा आपल्या ज्ञानार्जनातून पिढी घडवत असतो. म्हणून फक्त सर्वोत्तम व्यक्तींनीच या क्षेत्रात उतरावे.

पण दुर्दैवाने नेमणुका करतांना बोकाळलेला भ्रष्टाचार बघता नवीन रुजू होणारे बहुतांशी शिक्षक पैसा देऊन ती नोकरी विकत घेत असतात. मग लाखो रुपये देऊन नोकरीला लागलेल्या शिक्षकांकडून तो चांगले शिकविल ही अपेक्षा आपण कशी करावी?

चांगला पगार आहे, सर्वोत्तम व्यक्तींची निवड करून नेमणूक केली, तर विद्यार्थ्यांना चांगले शिक्षक मिळतील. पण तसे होताना दिसत नाही. इतर नोकरीत आठवड्यात ४० तास काम करावे लागते. तुलनेत शिक्षकांना काम कमी असते. शिक्षकांनी त्या फावल्या वेळेचा उपयोग स्वतःला अद्यावत करण्यासाठी वापरावा ही अपेक्षा असते.

त्यांचे काही मित्र विद्यापीठाच्या अभ्यासक्रम मंडळात आहेत. अभ्यासक्रम बदलायचा तथा अद्यावत करण्याचा प्रयत्न केला तर प्राध्यापक मंडळी विरोध करतात. कशाला आमचे काम वाढवता असे त्यांचे म्हणने असते. कारण कधीतरी दहा-पंधरा वर्षांपूर्वी एखाद्या हुशार विद्यार्थ्याने तयार केलेल्या नोट्स वापरून शिकवण्याची सवय झालेली असते.

आज फार फरक दिसून येतो. निश्चितपणे चांगल्याकडून वाईटपणाकडे झाला आहे. शिक्षकातील काहीजण त्यांच्या वागण्यामुळे मान देण्यास पात्र नाहीत, तर अट्टल गुन्हे आणि गैरवर्तन करणारे आहेत.

शिक्षक म्हणून पदाचा गरिमा म्हणजे पदाचा आब राखणे, पदाची गरज, पावित्र्य व शान राखणे हे खरे तर त्यांचे कर्तव्य आहे. पण यातच अनेक जण वाईटरित्या उघडे पडतात. जसे दारू पिऊन मुलांसमोर येणे, आश्रम शाळेत मुलींबरोबर बलात्कार करणे, व्यसन करणे, शाळांतील पैसा खाणे, न शिकवणे, वाईट भाषा वापरणे, पेपर फोडणे, पैसे घेऊन मार्क देणे, मुलांकडून घरची कामे करून घेणे, बेशिस्त वर्तन, मुलींना फुस लावून पळवून नेणे अशा काही प्रकरणातून त्यांचे गुण उघड होताना दिसून येते.

जर शिक्षक त्यांचे काम व्यवस्थित करत नसतील तर त्यांना सरळ टर्मिनेट करावे. कारण शिक्षकच आता खोट्या गोष्टी करून, भ्रष्टाचार करून टीईटी देतात. त्यात खोटेपणा करतात.

आता शिक्षकांना परीक्षा नको म्हणतात. मुलांच्या खोट्या हजेरी लावून पगार घेणे, मुलींशी गैरवर्तन करणे असे सर्व दुर्गुण हल्ली त्यांच्यात भरले आहेत. हे पेपर मध्ये येणा-या विविध बातम्या वाचून कळते. खांद्यावर हात ठेवणे हे त्या व्यक्तीचे गुण जेव्हा मुलांसमोर येतात तेव्हा आदर्शच असावे. जसे तोंडात पानाचा तोबरा, हातात सिगरेट हे सर्व चुकीचे आहे. त्यांच्या वागण्यामुळे आज असे करणारे शिक्षक त्यांचा मान सन्मान हरवून बसले आहेत आणि आदरयुक्त मानसन्मान मिळवणे नाही, तर नाव कमावणे ही पूर्णपणे त्यांचीच जबाबदारी आहे.

पूर्वी शाळेतला शिक्षक सोडला, तर इतर कुठूनही ज्ञान मिळण्याची व्यवस्था नव्हती. आई-वडील शिकलेले असतील तर थोडी मदत होत असे. पण मुलांना शिकवण्याचा पूर्ण भार शाळेवर होता. एकदम 'ढ' विद्यार्थी शिकवणी लावायचा. यामुळे इतर मुलं चिडवायची आणि ते पालकांना परवडत सुध्दा नव्हते.

पूर्वी शिक्षा करण्याचा अधिकार होता. त्यामुळे शिक्षक मुलांना चोपून काढू शकत होते आणि घरी कळलं तर घरून वेगळा मार बसायचा. त्यामुळे मनात शिक्षकांविषयी भिती होती. गुरु म्हणजे देव असतो. शिक्षक कसाही असला तरी तो व्यक्ती आपल्याला ज्ञान देतो आहे, तो गुरु आहे असे संस्कार होते. त्यामुळे गुरु विषयी अपशब्द वापरले जात नव्हते. पूर्वी शिक्षक आपल्या कामाशी प्रामाणिक होते (सगळेच नाही पण मोठ्या प्रमाणात). ज्ञानदान करणे पुण्य कर्म मानले जायचे, त्यामुळे शिक्षणाचा दर्जा चांगला होता. कितीही वर्ष शिकवत असले तरी आपल्या विद्यार्थ्यांना हे शिक्षक ओळखू शकत होते. म्हणजे हजारो मुलांना शिकवलं तरी हा माझा विद्यार्थी असा प्रत्येकाशी त्यांचा भावनिक बंध होता. मुलांच्या मनात सुद्धा शिक्षकांविषयी प्रेम आणि आदर होता.

आताची परिस्थिती काय आहे? माहितीच्या उपलब्धतेमुळे माहिती सगळीकडे नदी सारखी वाहत आहे. मोबाईल उचलला की हवी ती माहिती मिळते. मग शिक्षक कशाला हवे? शिवाय शिकवणी वर्ग आहेतच की जिथे पैसे भरून ज्ञान मिळवता येतं. शाळेत का लक्ष द्यायचं? मुलांना काही म्हणण्याची मुभा नाही. मारणे तर दुरच मुलांना शिस्त लावण्यासाठी काही बोलणे सुध्दा शिक्षकांना कठीण होऊन बसले आहे. लगेच पालक शाळेत धावून जातात. त्यामुळे नोकरी जाण्याची भिती असते. आजकाल शिक्षक सर्विस देतो, ज्ञान नाही. अभ्यासक्रम पूर्ण करणे, मुलांचे मनोरंजन करणे आणि त्यांना परिक्षा उत्तीर्ण करण्यासाठी मदत करणे हे आजच्या शिक्षकाचे काम आहे. मी शाळेत जातो, दिलेला तास शिकवतो आणि पगार घेतो. मुलांच्या भविष्याशी माझे काही देणे घेणे नाही. पालक सरळ असे म्हणतात की, असा कसा माझा मुलगा-मुलगी नापास झाले. काय शिकवता तुम्ही? पैसे भरले आहेत तर मुलं पास झालीच पाहिजे. अशाप्रकारे पालकांची अरेरावी वाढत जात आहे.

ही झाली वरवरची कारणे, तर मुळ मुद्दा काय आहे? आजकाल ज्ञान फार कमी मुलांना हवं आहे. मुलांना फक्त पदवी प्राप्त करायची आहे. असं का? तर आपला अभ्यासक्रम फार जूना आहे, नवीन गोष्टी त्यात शिकवल्या जात नाहीत. एक इंजिनिअर जेव्हा पदवीधर होतो तेव्हा बरेचदा त्याला नोकरीवर जे काम करायचे आहे ते येतच नसते, ते शाळा, कॉलेज मध्ये शिकवले नसते. त्यासाठी कंपनीत वेगळे प्रशिक्षण देण्यात येते. मग शिक्षक जे शिकवतो त्याचा उपयोग काय? ऐकलं काय आणि नाही ऐकलं काय सारखंच. फक्त नावापुरतेच तास करायचे, शिकवणी वर्ग लावायचे आणि उत्तीर्ण झाले की काम झालं.

आजकाल मुलं शाळेत, महाविद्यालयात मौजमजा करण्यासाठी जातात. काही नावाजलेले शाळा-कॉलेज सोडली, तर इतर ठिकाणी नुसता बाजार भरला आहे. ग्रामीण भागातील सरकारी शाळेत शिकलेल्या मुलांना साधं अक्षर ज्ञानसुध्दा नसतं. ती मुलं शाळेत जातात ते विविध योजनेतून तांदूळ, जेवण मिळवण्यासाठी आणि शिक्षक येतात ते पगारासाठी. यातूनही जर एखादा शिक्षक शिस्त लावण्याचा प्रयत्न करतो, तर शाळा, कॉलेज प्रशासन त्यांनाच बाहेरचा रस्ता दाखवतात. काही ठिकाणी रेटिंग सिस्टीम असते, म्हणजे वर्ष अखेरीस मुलं आपल्या शिक्षकांबद्दल फिडबॅक देतात.

ते शिक्षक चांगले आहेत की नाही वैगरे. या रेटिंगवर शिक्षकांचे वेतनवाढ, पदोन्नती या गोष्टींचे निर्णय घेण्यात येतात. मग शिक्षक का मुलांशी पंगा घेईल? शिक्षक मग मित्रांसारखाच वागेल ना.

जेव्हा दोन मुलं अभियांत्रिकीला असताना एक सिनीयर असतो, जो दरवर्षी नापास होतो आणि शेवटच्या वर्षाची परीक्षा सोबत देते, ते त्यातही नापास होते. चार वर्षांची अभियांत्रिकीची पदवी त्यांनी आठ वर्षांत मिळवली.

आज ते एका पोलीटेक्निक विद्यालयात शिक्षक आहेत. मी असं म्हणत नाही की ते शिकवू शकत नाही. ते मुलांना भरपूर इंटर्नल मार्क्स देतात. मुलांसोबत त्यांचे फोटो फेसबुकवर सतत येत असतात आणि त्यांना दरवर्षी छान रेटिंग मिळतं. अशी देवाण घेवाण चालते.

बाकी शिक्षणाचा खेळ खंडोबा झाला आहे. शेवटी काय? दोष फक्त शिक्षकांचा नाही, तर सिस्टीमचा आहे. पण राजकारणी लोक जोपर्यंत शाळा, कॉलेज चालवतील तोपर्यंत बदलाची शक्यता आहे का? निश्चितच नाही.

■ ■ ■

## नागपूर आंतरराष्ट्रीय विमानतळ जीएमआरकडे हस्तांतरित करण्यासाठी हस्तक्षेप करा

# एआयडीचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना साकडे

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट असोसिएशन (एआयडी) चे अध्यक्ष आशिष काळे आणि कोषाध्यक्ष प्रा. राजेश बागडी यांच्या शिष्टमंडळाने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन नागपूर आंतरराष्ट्रीय विमानतळाचे संचालन जीएमआर एअरपोर्ट्स लिमिटेडकडे तातडीने हस्तांतरित करण्यासाठी हस्तक्षेप करण्याची मागणी केली. हा निर्णय विदर्भाच्या औद्योगिक व आर्थिक प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले.



आशिष काळे यांनी सादर केलेल्या निवेदनात विमानतळ प्रकल्पाशी संबंधित प्रश्न सोडवण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी सातत्याने केलेल्या प्रयत्नांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. सर्वोच्च न्यायालयातील प्रकरणात केलेल्या हस्तक्षेपासह हस्तांतरण प्रक्रियेची गती वाढवण्यासाठी घेतलेल्या पावलांबद्दलही आभार मानण्यात आले. काळे यांनी सांगितले की, गेल्या दोन वर्षांपासून एआयडी सातत्याने मुख्यमंत्री फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे या विषयाचा पाठपुरावा करीत आहे आणि या प्रक्रियेत दोन्ही मान्यवरांनी संपूर्ण सहकार्य दिले आहे.

भक्कम पायाभूत सुविधा आणि कार्यक्षम हवाई संपर्क हे विदर्भाच्या औद्योगिक व आर्थिक प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक आहेत. फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली या प्रदेशात लक्षणीय विकास झाला आहे. मात्र विमानतळाचे हस्तांतरण न होणे हे विदर्भाच्या संपूर्ण क्षमतेचा विकास रोखणारे सर्वात मोठे अडथळे आहे, असे काळे यांनी सांगितले.

असोसिएशनने पुढे स्पष्ट केले की, जीएमआरकडे संचालन आल्यानंतर नागपूरला नवीन देशांतर्गत मार्ग आणि थेट आंतरराष्ट्रीय उड्डाणे - विशेषतः आग्नेय आशियाकडे - उपलब्ध होतील. या सुधारणा व्यापार व पर्यटन बळकट करतील, नव्या गुंतवणुकीला चालना देतील, रोजगारनिर्मिती वाढवतील आणि या प्रदेशाला राष्ट्रीय तसेच जागतिक स्तरावर अधिक स्पर्धात्मक बनवतील. हा विषय आधीच केंद्रीय मंत्रिमंडळाने महाराष्ट्र सरकारकडे वर्ग केला असून, या टप्प्यावर मुख्यमंत्री यांचा हस्तक्षेप निर्णायक ठरणार आहे. याबरोबरच, एआयडी शिष्टमंडळाने राज्य सरकारबरोबर सुरू असलेल्या विविध औद्योगिक विषयांवरही चर्चा केली. मुख्यमंत्री यांनी पूर्ण सहकार्य देण्याचे आश्वासन दिले आहे. या मागणीची प्रत माननीय केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी तसेच नागपूरचे जिल्हाधिकारी आणि जिल्हा दंडाधिकारी डॉ. विपिन ईटनकर यांनाही पाठविण्यात आली आहे.

## ओबीसी संघटनांना ओबीसी वकील महासंघाचा पाठिंबा



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

ओबीसी वकील महासंघ बैठक तर्फे वकील आणि ओबीसी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांसोबत बैठक आयोजित करण्यात आली होती.

दि.2 सप्टेंबर रोजी हैदराबाद गॅझेटचा दाखला देऊन मराठा समाजाला ओबीसी आरक्षण मिळवून देण्याचा शासनाचा प्रयत्न हा ओबीसी समाजाच्या अधिकारांवर गदा आणणारा आहे. ओबीसी आरक्षण हे मागासलेपणाच्या आकडेवारीवर आणि सामाजिक वास्तवावर आधारित आहे; इतिहासातील काही कागदपत्रांवरून नवा समाज ओबीसीमध्ये आणण्याचा निर्णय हा अन्यायकारक ठरू शकतो. या जी.आर ची वैधता किती आणि संविधानिक कसोटी वर हा जी.आर किती खरा उतरणार तसेच पुढील न्यायालयीन लढाई साठी कशापद्धतीची रूप रेषा असावी या करिता ओबीसी वकील मंडळीची अत्यंत महत्त्वाची बैठक रविभवन, नागपूर येथे दि. ९ सप्टेंबर २०२५ रोजी पार पडली.

ओबीसी साठी प्रामाणिक पणे काम करणाऱ्या सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांना कायदेशीर बाबी समजून सांगून एकसूत्री रुपरेषा ठरवून शांततेने व परिणामकारक कसे काम करता येईल यावर वकील मंडळीचे, काय म्हणणे आहे ते समजून घेण्याकरिता आयोजित केलेली होती.

ओबीसी आरक्षणाला नुकसान नाही असे म्हणून चालणार नाही चोर वाटेने आपल्या आरक्षणावर गदा येऊ नये व पुढे असे जी. आर निघून ओबीसी प्रवर्ग संभ्रमित व भयग्रस्त होऊ नये याकरिता खालील ठराव ओबीसी वकील महासंघ ने या बैठकीत पारित केले. 1.शासनाने तात्काळ जातीनिहाय जनगणना करून 50% ची मयार्दा हटवून प्रवर्गाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण द्यावे.शासनाने मराठा आंदोलकांच्या दबावाखाली मराठ्यांचे ओबीसीकरण करणारा GR तात्काळ रद्द करून ओबीसींच्या आरक्षणाचे रक्षण करावे.

ओबीसी आरक्षण वाचविण्यासाठी कुठलीही कायदेशीर अडचण सोडविण्यासाठी आणि न्यायालयीन लढाई लढण्यासाठी सर्व प्रामाणिक ओबीसी संघटनांना ओबीसी वकील महासंघ कायदेशीर मार्गदर्शन करेल व उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालयात कायदेशीर लढाई लढेल. रस्त्यावरच्या व कायदेशीर लढाईसाठी ओबीसी वकील महासंघ सर्व प्रामाणिक ओबीसी संघटनांच्या सोबत राहील.

## कृषी पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

जिल्ह्यात दरवर्षी कृषि विभागामार्फत कृषि आणि संलग्न क्षेत्र तसेच फलोत्पादन क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या, कृषि उत्पादन आणि उत्पन्न वाढीकरिता योगदान देणाऱ्या शेतकऱ्यांचा तसेच कृषि विस्तारामध्ये बहुमोल कामगिरी करणाऱ्या व्यक्ती, संस्था, गट यांना डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न, वसंतराव नाईक कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण, कृषिभूषण (सेंद्रिय शेती), वसंतराव नाईक शेतीमित्र, उद्यान पंडीत पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी व कृषि विभागातील अधिकारी आणि कर्मचारी यांचेसाठी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषि सेवारत्न पुरस्कार इत्यादी पुरस्कार मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे हस्ते प्रदान करून सन्मानित करण्यात येते.

डॉ.पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कार, वसंतराव नाईक कृषि भूषण पुरस्कार, जिजामाता कृषि भूषण पुरस्कार, कृषि भूषण (सेंद्रिय शेती) पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार, युवा शेतकरी पुरस्कार, उद्यान पंडीत पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार सर्वसाधारण गट, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार आदिवासी गट, पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषि सेवारत्न पुरस्कार, उत्कृष्ट कृषि शास्त्रज्ञ पुरस्कार देण्यात येतात. प्रस्तावासोबत जोडावयाची कागदपत्रे - १) मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद केलेले विविध प्रपत्रे २) विहित नमुन्यातील अर्ज स्वयंघोषणा पत्र 3) दोन रंगीत पासपोर्ट साईज फोटो (स्टेपल न करता) ४) ७/१२, ८-अ चा उतारा ५) मूळ प्रतीतीला चारित्र्याचा दाखला तरी सर्व शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येते की, विविध कृषि पुरस्काराचे प्रस्ताव सादर करावे.

## छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला अनुसूचित जाती-जमाती आयोगाची तूर्तास स्थगिती

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :



सन १९७८ पासून गायरान जमिनीवर वास्तव्यास असलेल्या आदिवासी पारधी समाजातील व्यक्तींनी या जमिनीच्या मालकी हक्कासाठी अनेक वर्षांपासून आंदोलन केले होते. छत्रपती संभाजी नगरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी गायरान जागेवरील हे अतिक्रमण तात्काळ काढण्याचे आदेश दिले होते. या विरुद्ध पारधी समाजातील या व्यक्तींनी महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोगाकडे दाद मागितली होती. याबाबत आयोगाने सुनावणी घेवून गंगापूर, पैठण, वैजापूर तालुक्यातील पारधी समाजातील गत अनेक वर्षांपासून गायरान जमिनीवर वास्तव्य करत असल्याचे पुरावे लक्षात घेवून छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला आयोगाचे उपाध्यक्ष ॲड. धर्मपाल मेश्राम यांनी स्थगिती दिली. या सुनावणी दरम्यान, जिल्हाधिकाऱ्यांचे प्रतिनिधी, तहसीलदार, एकात्मिक आदिवासी प्रकल्प अधिकारी, वनपरिक्षेत्र अधिकारी आणि तक्रारदार केशव पवार यांच्यासह इतर पारधी बांधव उपस्थित होते.

पारधी समाजाकडे सन १९७८ पासूनचे वास्तव्याचे पुरावे महत्त्वाचे ठरले. जिल्हाधिकाऱ्यांना अतिक्रमण बेकायदेशीर असल्याचा ठोस पुरावा सादर करता आला नाही. आयोगाने जिल्हाधिकाऱ्यांना १५ दिवसांत अहवाल सादर करण्याचे निर्देश देत नाराजी व्यक्त केली. आयोगाची याबाबत पुढील निर्णय प्रक्रिया होईपर्यंत गायरान जमिनीवरील अतिक्रमण न हटवण्याचे आदेश दिले आहेत.

आयोगाने ग्रामपंचायत सरपंच, सचिव, तहसीलदार आणि गटविकास अधिकाऱ्यांना संयुक्तपणे पीडित पारधी समाजाला निवासी प्रयोजनासाठी जागा उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत.

## जगती फाउंडेशन आणि केयर हॉस्पिटल्सकडुन मासिक आरोग्याविषयी जनजागृती

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ५ :

जगती फाउंडेशनच्या तेजस्विनी आणि प्रेरणा या प्रतिष्ठित प्रमुख उपक्रमांनी केयर हॉस्पिटल्स सोबतच्या उरफ उपक्रमांच्या माध्यमातून गर्भाशयमुखाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग आणि मासिक पाळी स्वच्छता यावर केंद्रित जनजागृती सत्रे यशस्वीपणे आयोजित केली. या मोहिमेचा उद्देश तरुण महिलांना आवश्यक आरोग्य शिक्षण, प्रतिबंधात्मक उपाय आणि त्वरित निदानाचे महत्त्व याबाबत सक्षम करणे होता. त्याचबरोबर शाश्वत मासिक आरोग्याचे उपाय व त्याचे दीर्घकालीन फायदे यावरही भर देण्यात आला. राष्ट्रीय आरोग्य आकडेवारीनुसार, भारतातील महिलांमधील मृत्यूंना कारणीभूत असलेल्या कर्करोगांमध्ये गर्भाशयमुख आणि स्तनाचा कर्करोग हे सर्वात मोठे घटक आहेत. यामागील मुख्य कारण म्हणजे कमी जनजागृती, निदानातील उशीर आणि प्रतिबंधात्मक तपासण्यांचा अभाव. या त्रुटींना दूर करण्यासाठी तेजस्विनी आणि प्रेरणा सारखे प्रकल्प समाजाभिमुख शिक्षण व लवकर निदान यास प्रोत्साहन देऊन आरोग्य समतेतील तफावत कमी करण्याचे उद्दिष्ट साधत आहेत.

## ऑटोरिक्षा चोर पोलिसांच्या जाळ्यात

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :

गुन्हे शाखा युनिट २ च्या पथकाने मानकापूर ठाण्यात नोंद ऑटोरिक्षा चोरीच्या गुन्ह्याचा छडा लावून आरोपीला अटक केली. पोलिसांनी आरोपीकडून चोरीच्या ऑटोसह एकूण १ लाख ६० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. नीलेश राजेंद्र सोनवणे (२६) रा. लक्ष्मीनगर, गोधनी रोड असे अटकेतील चोराचे नाव आहे.

मेकोसाबाग परिसरात राहणारे पवन बच्चू मुलानी (४२) हे ऑटो चालक असून सध्या मानकापूरच्या गीतानगर परिसरात वास्तव्यास आहेत. गत ३० ऑगस्टच्या रात्री ८.३० वाजताच्या सुमारास त्यांचा एमएच-४९/एआर-६६०६ क्रमांकाचा ऑटो घरासमोर पार्क केला होता. मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात आरोपीने त्यांचा ऑटो चोरून नेला. दुसऱ्या दिवशी दुपारी ऑटो चोरी झाल्याची घटना उघडकीस आली. त्यांच्या तक्रारीवरून मानकापूर पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविला होता. या गुन्ह्याचा तपास मानकापूर पोलिसांसह गुन्हे शाखा युनिट २च्या पथकाकडूनही सुरू होता. आसपासच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि खबऱ्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारावर पोलिसांनी नीलेशला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने ऑटो चोरीची कबुली दिली.



शशिकांत मुजारीय, राधाकृष्ण नगर हुडकेश्वर रोड नागपूर येथील गणेश मूर्ती



लक्ष्मण तुकाराम आग्रे, साई मंदिर परिसर सावनेर



शेखरभाऊ दुंडे, रामटेक यांच्या कडील गणपती



रामटेक येथील माजी नगरसेवक उमेश महाजन यांच्या कडील गणपती

## महासागर प्रभाग वार्ता

### गडर लाइन जीर्ण,सांडपाणी रस्त्यावर सामान्यांचे आरोग्य धोक्यात

प्रदीप पौनिकर,
नागपूर दि. ५

प्रभाग क्रमांक ५, नवी मंगळवारी धम्मदीप नगर,कुंदनलाल गुप्ता नगर या परिसरातील जुन्या बांधलेल्या गडर लाईन जीर्ण झाल्या आहेत. या भागात ही समस्या मोठ्या प्रमाणात आहे. घाण पाणी रस्त्यावरून वाहत असल्याने हजारो नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

कुंदनलाल गुप्ता नगर येथील जुन्या गडर लाईन नादुरुस्त झाल्या आहेत. त्यामुळे गंभीर समस्या निर्माण झाली आहे. ३० ते ४० वर्षांपूर्वीच्या गडर लाईन त्या वेळची लोकसंख्या विचारत घेता टाकण्यात आल्या होत्या. आता त्या भागातील लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे, त्यामुळे गडर लाईन वरील भार वाढल्याने व त्या जीर्ण व जागोजागी नादुरुस्त झाल्याने वस्त्यात दुषित पाणी वाहत आहे.कुंदनलाल गुप्ता नगर भागात गडर लाईन तुंबल्याने रस्त्यावरून सांडपाणी वाहत आहे. पाऊस आला की अनेकांच्या घरातही हे पाणी आत शिरते.





सांडपाण्याच्या दुर्गंधीमुळे नागरिक त्रस्त आहेत आणि लोकांच्या आरोग्याला धोका निर्माण झालेला आहे. घाण पाणी वाहत असल्यामुळे रस्त्यावर चालणे कठीण झाले आहे.सांडपाणी जमिनीत मुरत असल्याने घरांना धोका निर्माण झाला आहे जुने घर पडण्याची शक्यता आहे यामुळे घरातील नागरिक दहशतीत आहे या संदर्भात आम आदमी पक्षाच्या वतीने सतरंजी पुरा झोनचे सहाय्यक आयुक्त यांना वेळोवेळी निवेदन देण्यात आले आहे तरीसुद्धा याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. जर या कामाकडे लक्ष दिले नाही तर आम आदमी पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे. यावेळी प्रदिप पौनिकर, किशन निमजे, विजय नंदनवार, हेमराज कुंभारे, अनिल संभे, नानक धनवानी, आरती दलाल, संदीप साखरे,केतन ठाकूर, दिपक कोदरलीकर, सुनिल गजभिये, मनोज फटींग, क्षितिज वंजारी, निलकंड टाकलीकर, हरिहर पराते, नागसेन सहारे, कृष्णा पाठराबे, अंशु बिरेवार, संजू पटले, राजकुमार किटाळीकर, जयघोष कोटांगले, अनिल चांदेकर तसेच आम आदमी पार्टीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

### पिपळा फाटा आऊटर रिंग रोड येथे कचऱ्याचे ढिगारे



मयूर वाजगे,
नागपूर दि. ५

पिपळा फाटा आऊटर रिंग रोड येथे कचऱ्याचे ढिगारे जमलेले असतात. पावसाचे पाणी यावर साचून डास व माश्यांची यावर पैदास होत आहे. पावसामुळे दुर्गंधी पसरून नागरिक त्रस्त आहे. रस्त्यावरून ये जा करणाऱ्या प्रवाशांनाही त्रास सहन करावा लागत आहे. यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

बातमीची दखल

### तुटलेला त्रिभाजक दुरुस्तीस सुरुवात नागरिकांनी व्यक्त केला कृतज्ञभाव

प्रमोद जांभूळकर,
नागपूर दि.५

तुटलेला त्रिभाजक देतोय मृत्यूला आमंत्रण या शीर्षकाने प्रसिद्ध झालेल्या बातमीची प्रशासनाने दखल घेतली असून त्रिभाजक दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे. प्रभाग क्रमांक ७ येथील कामठी मार्गावरून नागपूर ग्रामीण पोलिस मुख्यालय किंवा आर. टी. ओ. कडे जाणाऱ्या रस्त्यावरील वळणावर त्रिभाजक तुटल्यामुळे अपघातांची शक्यता वाढली होती .प्रशासनाच्या या तत्परतेमुळे परिसरातील अपघातांची शक्यता कमी होणार असून नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.



हेमराज जांभुळकर, अजय सहारे, अनुप राहाटे, जयेश गेडाम, विलास नितनवरे व प्रसेनजीत धाबर्डे या नागरिकांनी समाधान व्यक्त करत महासागर चे मनःपूर्वक आभार मानले.स्थानिक नागरिकांनी प्रशासनाच्या या उपक्रमाचे स्वागत करून रस्ते सुरक्षिततेबाबत पुढेही अशीच तत्परता दाखवावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

### इंदोरा प्रभागात कचऱ्याचा डोंगर! रहिवाशांचा संताप

प्रमोद जांभूळकर,
नागपूर दि. ५

प्रभाग क्रमांक ७, इंदोरा येथील लाईन क्रमांक ३ व ४ च्या समोर असलेल्या इंदोरा मैदानाच्या संरक्षण भिंतीलगत साचलेल्या कचऱ्यामुळे परिसरात राहणाऱ्या नागरिकांचे मोठे हाल होत आहेत. या ठिकाणीच ग्रीन जिम असल्याने व्यायामासाठी येणाऱ्या नागरिकांनाही दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत आहे.



रहिवासी रविंद्र जनबंधू यांनी सांगितले की कचरा उचलणारे कर्मचारी आपली जबाबदारी नीट पार पाडत नाहीत. अनेक वेळा सांगूनही ते कचरा उचलत नाहीत आणि काही बोलल्यास मुजोरी करतात.त्यामुळे साचलेल्या कचऱ्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून नागरिक त्रस्त झाले आहेत.लंकेश निकोसे म्हणतात ग्रीन जिमच्या आजूबाजूलाच कचऱ्याचे ढिगारे आहेत. अशा घाणीत व्यायाम कसा करायचा? श्वास घेणेदेखील कठीण झाले आहे.या समस्येकडे लक्ष वेधत मुरलीधर मेश्राम, बाळू नंदेश्वर, सतीश बागडे, सुनील कडबे, बंडू गजभिये, टिटू टेंभूर्णे, आनंद साखरे, विक्रम मेश्राम यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे तातडीने कारवाईची मागणी केली आहे.

### झोन कार्यालयाच्या दारातच कचऱ्याचा ढिगारा! नागरिक हैराण



प्रभू गजभिये,
नागपूर दि. ५

धंतोली झोन कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारापासून अवघ्या १० फूट अंतरावर कचऱ्याचा मोठा ढिगारा पाहून नागरिक आश्चर्यचकित झाले आहेत. स्वच्छतेचे जनतेला संदेश देणारे झोन कार्यालयच जर अस्वच्छतेचे प्रतीक ठरत असेल, तर संपूर्ण झोनमधील स्थिती कशी असेल, असा सवाल आता नागरिक विचारू लागले आहेत.

या कचऱ्याच्या ढिगाऱ्यातून दुर्गंधी पसरत असून, नागरिक व झोन कार्यालयात येणारे कर्मचारी यांना त्रास सहन करावा लागत आहे. यावर कोणतेही उपाय करण्यात आले नसल्याने स्थानिक रहिवाशांमध्ये नाराजीचा सूर आहे. झोन कार्यालयासमोरच जर कचऱ्याचा असा ढिगारा असेल, तर इतर वॉर्डांमध्ये काय अवस्था असेल, याची कल्पनाही करवत नाही अशी प्रतिक्रिया एका स्थानिक नागरिकाने दिली. संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालून स्वच्छतेसाठी आवश्यक उपाय करावेत, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.


# ऐतिहासिक सत्याशी प्रतारणा

**सध्या मुलांना चुकीचा इतिहास शिकवून मोठा प्रमाद केला जात आहे. अर्धवट आणि सोयीची माहिती देऊन इतिहासाचे अचूक ज्ञान देता येत नाही. ब्रिटिशांनी अनेक देशांवर राज्य केले; परंतु त्यांनी देशातील नागरिकांना चुकीचा इतिहास शिकवला नाही. मिळतील तिथून ज्ञानाचे कण गोळा केले. आपल्या ग्रंथालयांमध्ये एकांगी विचाराचे ग्रंथ ठेवले नाहीत. आपण मात्र राजकारणासाठी इतिहास बदलत आहोत, हे गंभीर आहे.**

दखल
**नंदकुमार काळे**

अलिकडेच 'एनसीईआरटी'च्या नव्या मॉड्यूलवरून वाद निर्माण झाला. या मॉड्युलमध्ये भारताच्या फाळणीसाठी जिना आणि ब्रिटिशांसह काँग्रेसला जबाबदार धरण्यात आले होते. हे पहिल्यांदाच सांगितले गेले नाही आणि त्यावरील वाद नवीन नाही. भारताची फाळणी हा असा बहुआयामी विषय आहे. त्याचे विविध पैलू अजूनही वेळोवेळी शोधले जात आहेत. भारताच्या फाळणीचे कारण मानली जाणारी एकमेव व्यक्ती म्हणजे मोहम्मद अली जिना. पूर्णपणे इस्लाम विरोधी जीवनशैली असलेल्या या व्यक्तीने या धर्माच्या नावाखाली वेगळा देश निर्माण करण्याचे ध्येय साध्य केले. जिना हे एक असे नेते होते, जे दृढ होते आणि तडजोड करत नव्हते. फ ुटीरतावादी मानसिकतेचा विशाल मुस्लिम समाज त्यांच्या मागे उभा राहिला नसता, तर पाकिस्तानचा जन्म झाला नसता. जिना धार्मिक शैली स्वीकारल्यावरच मुस्लिमांचे नेते बनू शकले असते. पाकिस्तानचे स्वतःचे लेखक अझीझ अहमद यांनी ते असे स्पष्ट केले आहे. ते म्हणतात, 'जिना मुस्लिम लोकांचे नेतृत्व करत नव्हते; परंतु मुस्लिम सहमतीने जिना यांचे नेतृत्व केले. त्यांची भूमिका एका स्पष्ट विचारसरणीच्या वकिलाची होती, जी आपल्या अशिलाच्या इच्छा अगदी अचूक शब्दात मांडू शकत होती.' भारत एकसंध राहिला असता तर काय झाले असते, यावर अनंत वादविवाद होऊ शकतात. तथापि, १९४६-४७ मधील घटनांवरून दिसून येते की फाळणी रोखणे शक्य होते; परंतु त्यासाठी किती किंमत मोजायची, हा ही प्रश्न होता. आता इतिहास घडून गेला आहे. त्याची मढी किती काळ उगळायची, यावर विचार केला पाहिजे.

ब्रिटिश सरकारने फेब्रुवारी १९४७ मध्ये ब्रिटिश संसदेत घोषणा केली होती, की ते जून १९४८ पर्यंत भारताकडे सत्ता सोपवतील. भारताची फाळणी ही ब्रिटिशांची योजना नव्हती. तसेच भारतात काम करणाऱ्या ब्रिटिश अधिकाऱ्यांनाही हे नको होते. सर्व पुरावे दर्शवतात की ब्रिटिश सरकारने त्यांनी निर्माण केलेले 'सुंदर साम्राज्य' अबाधित रहावे यासाठी अनेक प्रयत्न केले. त्यांना देश सोडायचाच नव्हता. भारतात मात्र स्वातंत्र्य चळवळ जोरात होती. भारतातून घेऊन जाता येणाऱ्या संपत्तीचा मोह ब्रिटिशांना सुटत नव्हता. त्या वेळी दुसरे जागतिक महायुद्ध नुकतेच संपले होते. जगाचा भूगोल बदलत होता. भारताच्या फाळणीला महात्मा गांधी, पंडित नेहरू, लॉर्ड माऊंटबॅटन यांना जे जबाबदार धरतात, ते आपले पूर्वज त्या काळात काय करत होते, त्यांची भूमिका काय होती, हे सांगत नाहीत. ब्रिटिशांचे लांगुलचालन करणाऱ्या, त्यांना मदत करणाऱ्या आणि स्वातंत्र्ययुद्धापासून अलिप्त राहणाऱ्यांना खरे तर इतरांवर खापर फोडण्याचा अधिकारच नाही; परंतु सत्तेचा दुरुपयोग करून चुकीच्या इतिहासाची मांडणी करून सध्याच्या विरोधी पक्षावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न वारंवार केला जात आहे. राजकारणाच्या कुरघोडीत ऐतिहासिक सत्याचा विलाप केला जात आहे. भारताच्या स्वातंत्र्ययुद्धातील व्यक्तिमत्त्वांचा संघर्षदेखील फाळणीचे एक प्रमुख कारण होते. जिना आणि काँग्रेस नेत्यांमध्ये एकमेकांबद्दल खूप वैर होते.



नेहरू हे जिना यांना 'मध्यम वकील' आणि कमी शिक्षित मानत होते, तर जिना नेहरू यांना 'अहंकारी ब्राह्मण' मानत होते. जिना यांच्यामध्ये हट्टीपणा, उदासीनता आणि सहज चिडचिड होणे असे अनेक दोष होते; परंतु त्यांच्यात आत्मविश्वास आणि चिकाटीसारखे गुण होते. जिना हलकेफ ुलके किंवा फक्त बढाईखोर नव्हते. जिना पाकिस्तानबद्दल गंभीर नव्हते आणि ते फक्त स्वतःचे महत्त्व वाढवण्यासाठी बढाई मारत होते, असे गृहीत धरणे ही नेहरू यांची चूक होती. या गैरसमजामुळे नेहरू यांनी जिना आणि मुस्लिम लीगकडे दुर्लक्ष केले आणि कॅबिनेट मिशन योजना स्वीकारल्यानंतर १० जुलै १९४६ रोजी मागे हटले. याचे वाईट परिणाम झाले. कॅबिनेट मिशनबाबत नेहरू यांच्या विधानानंतर लगेचच जिना यांनी २७ जुलै १९४६ रोजी या योजनेला दिलेला पाठिंबा मागे घेतला. यासोबतच त्यांनी पाकिस्तानची मागणी करण्यासाठी १६ ऑगस्ट १९४६ रोजी 'डायरेक्ट क्शन' दिवसाची हाक दिली. त्या वेळी बंगालचे प्रांतीय राज्य मुस्लिम ंच्या हातात होते आणि शाहिद सुहरावर्दी हे कम ंडमध्ये होते. त्यांनी मुस्लिमांना हिंसाचारासाठी उघड चिथावणी दिली. 'डायरेक्ट क्शन'मध्ये पश्चिम बंगालमध्ये मोठ्या प्रमाणात रक्तपात झाला आणि सुमारे तीन हजारजणांचा बळी गेला. हजारो जखमी झाले. कलकत्त्यातील भयानक हत्याकांडानंतर फक्त लॉर्ड वेव्हेल तिथे गेले. गांधी, नेहरू आणि जिना यांच्यापैकी कोणीही तिथे गेले नाही. त्यानंतरही वेव्हेल अविभाजित भारत राखण्याचा प्रयत्न करत राहिले; परंतु त्याची किंमत त्यांना मोजावी लागली. त्यांना अपमानास्पदपणे राजीनामा द्यावा लागला.

या सुमारास ब्रिटिश सरकार काँग्रेस आणि मुस्लिम लीग यांच्यात सहमती होण्याची जास्त वाट पाहत नव्हते. फेब्रुवारी १९४७ मध्ये त्यांनी लॉर्ड माउंटबॅटन यांची व्हाईसरॉय म्हणून नियुक्ती करण्याची आणि जून १९४८ पर्यंत भारतात सत्ता हस्तांतरित करण्याची घोषणा केली. माउंटबॅटन २२ मार्च १९४७ रोजी भारतात पोहोचले. त्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वाने सर्वांना प्रभावित केले. जर कोणी माउंटबॅटनच्या आकर्षणापासून पूर्णपणे अप्रभावित राहिले असतील तर ते म्हणजे जिना. जिना आपल्या प्रतिस्पर्ध्याला किंवा शत्रूला त्याच्या भावनांचा अंदाज येऊ देत नव्हते; जेणेकरून समोरची व्यक्ती त्याचा फायदा घेऊ शकत नसे. म्हणूनच जिना कोणाच्याही स्तुतीने किंवा सौजन्याने प्रभावित झाले नाहीत. माउंटबॅटन यांच्या पहिल्याच बैठकीत गांधी यांनी प्रस्ताव दिला की जिना यांना अंतरिम सरकारचे प्रमुख म्हणून नियुक्त करावे आणि त्यांच्या मंत्रिमंडळात कोणाला समाविष्ट करायचे किंवा नाही हे ठरवण्याचे काम जिना यांच्यावर सोपवावे, जेणेकरून परस्परातील वाद संपतील आणि सत्ता हस्तांतरणाचा मार्ग स्पष्ट होईल. सुरुवातीला माउंटबॅटन यांनी या प्रस्तावावर विचार करण्याचे आश्वासन दिले; परंतु इतर काँग्रेस नेत्यांचा दृष्टिकोन पाहून त्यांनी ते अव्यवहार्य मानले आणि तसे प्रयत्न सोडून दिले. त्यांना आढळले की नेहरू-पटेल यांनी आधीच फाळणीचा निर्णय घेतला होता. अखेर माउंटबॅटन यांनी ३ जून १९४७ रोजी फाळणीच्या प्रस्तावाची रूपरेषा दिली, जी दोन्ही पक्षांनी स्वीकारली. नेहरू-पटेल यांनी फाळणी स्वीकारल्यानंतर गांधीजींनीही आपला विरोध सोडला.

या पार्श्वभूमीवर महात्मा गांधी आणि जवाहरलाल नेहरू यांच्याबद्दल अनेक चुकीच्या गोष्टी 'सोशल मीडिया'वर पसरवल्या जात आहेत, ज्यांचा तथ्यांशी काहीही संबंध नाही. भारतातील उजवी विचारसरणी गांधी आणि नेहरू यांना खलनायक सिद्ध करण्याचा प्रयत्न करत आहे. या मालिकेत गांधी यांना खलनायक सिद्ध करण्यासाठी बरेच खोटे पसरवले जात आहे. 'सोशल मीडिया'च्या युगात लोक व्हॉट्स प आणि फेसबुकवर येणारे संदेश खरे मानून आपले मत बनवतात. गांधी हे भारत आणि पाकिस्तानच्या फाळणीचे समर्थक किंवा जबाबदार आहेत, असे सांगितले जात असले, तरी त्याबाबतचे सत्य वेगळेच आहे. महात्मा गांधी यांच्याबद्दलची अनेक पुस्तके वाचल्यानंतर गांधी कधीही फाळणीचे समर्थक नव्हते, हे पटू शकेल. 'सारे जहाँ से अच्छा' हे गाणे लिहिणारे मोहम्मद इक्बाल यांनी १९३० मध्ये पहिल्यांदा मुस्लिमांसाठी वेगळ्या देशाची मागणी केली. त्या वेळी जिना काही काळ राजकारणापासून दूर राहिले; पण इक्बाल यांनी त्यांना मुस्लिमांचे नेतृत्व करण्यास सांगितले. मुस्लिम कट्टरपंथीयांनी मोहम्मद अली जिना यांच्या नेतृत्वाखाली ही मागणी पुढे नेली. १९३३ मध्ये तिसऱ्या गोलमेज परिषदेदरम्यान रहमत अली यांनी मुस्लिमांसाठी वेगळ्या देशाचा, 'पाकिस्तान'चा उल्लेख केला. कालांतराने ही मागणी वाढतच गेली. त्या वेळी उपस्थित असलेल्या हिंदू कट्टरपंथी संघटनांनी ही मागणी पुढे नेली आणि धार्मिक आधारावर हिंदू आणि मुस्लिमांसाठी स्वतंत्र देशाची मागणी केली.




अहमदाबाद येथील हिंदू महासभेच्या १९३७ च्या अधिवेशनात स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणाले, 'आजचा भारत एकसंध राष्ट्र असू शकत नाही. येथे दोन राष्ट्रे असतील, एक हिंदू आणि एक मुस्लिम.' १९४५ मध्येही सावरकर यांनी द्विराष्ट्र सिद्धांत मांडला. 'दोन राष्ट्रांच्या मुद्द्यावर माझे जिना यांच्याशी कोणतेही मतभेद नाहीत. आपण हिंदू स्वतः एक राष्ट्र आहोत आणि हे एक ऐतिहासिक सत्य आहे की हिंदू आणि मुस्लिम यांची दोन भिन्न राष्ट्रे आहेत.' गांधी, नेहरू, पटेल यांच्यावर दोषारोप करणारे आता पाठ्यपुस्तकांपर्यंत आणि सातत्याने खोटे संदेश पसरवण्यापर्यंत पोहोचले आहे. म्हणून हे वास्तव लक्षात घेतले पाहिजे.

✦✦✦

# कंपन्यांच्या कामगिरीला फटका का?

**अलिकडच्या काळात कंपन्यांच्या महसुलातील वाढ मंदावण्यास प्रामुख्याने ऊर्जा, कोळसा, आयटी सेवा, पोलाद या क्षेत्रांच्या कामगिरीमध्ये झालेला बिघाड कारणीभूत ठरला आहे. कंपन्यांच्या व्याज आणि करपूर्व नफ्यामध्ये घट होण्याची शक्यता 'क्रिसिल'ने नोंदवली आहे. इस्रायलचा गाझातील धुमाकूळ, ट्रम्प-पुतीन यांच्यामधील अयशस्वी चर्चा, अमेरिकेतील आयात शुल्कातील वाढीचा परिणाम कंपन्यांच्या कामगिरीवर होत आहे.**

परामर्श
**हेमंत देसाई**, ज्येष्ठ पत्रकार



चालू आर्थिक वर्षातील अलिकडील तिमाहीमधील भारतीय कंपन्यांच्या महसुलातील वाढ मंदावून जेमतेम चार ते सहा टक्केच राहील, असा अंदाज 'क्रिसिल' या पतमानांकन संस्थेने वर्तवला आहे. आधीच्या दोन तिमाहींमध्ये वाढीचा हा दर सात टक्के होता. ही घसरण तशी चिंताजनक म्हणावी लागेल. कंपन्यांच्या महसुलातील वाढ मंदावण्यास प्रामुख्याने ऊर्जा, कोळसा, आयटी सेवा, पोलाद या क्षेत्रांच्या कामगिरीत झालेला बिघाड कारणीभूत ठरण्याची शक्यता आहे. कंपन्यांच्या व्याज आणि करपूर्व महसुलात गेल्या वर्षाच्या तुलनेत चार टक्के वाढ होईल. त्याच वेळी व्याज आणि करपूर्व नफ्यात दहा ते तीस आधारबिंदूंनी घट होण्याची शक्यता असल्याचे 'क्रिसिल'ला वाटते. त्यासाठी आयटी सेवा, वाहननिर्मिती, एफएमसीजी क्षेत्रातील कंपन्यांची असमाधानकारक कामगिरी कारणीभूत ठरेल. मोसमी पावसाचे वेळेआधी आगमन आणि भू राजकीय तणावामुळे निर्माण झालेली अनिश्चितता याचा परिणाम काही क्षेत्रांवर दिसून येणे अपेक्षित आहे. त्यात उन्हाळ्यातच पाऊस पडल्यामुळे विजेची मागणी कमी झाली. त्यामुळे ऊर्जा क्षेत्राच्या महसुलात गेल्या वर्षीच्या तुलनेत आठ टक्के घट होऊ शकते. विजेची मागणी कमी असल्यामुळे तिच्या बरोबर कोळशाच्या मागणीतही घट झाली. रशिया-युक्रेन युद्ध, गाझा पट्टीतील इस्रायलचा धुमाकूळ आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची रशियाचे अध्यक्ष पुतीन यांच्याबरोबर झालेली अयशस्वी भेट याचाही फटका बसला आहे आणि यापुढेही बसण्याची शक्यता आहे. अमेरिकेतील आयात शुल्कात वाढ झाल्यामुळे अनेक प्रकल्प लांबणीवर पडल्याचा परिणाम या कंपन्यांच्या कामगिरीवर होत आहे.

आजघडीला अनेक निर्मिती प्रकल्पांमध्ये देखभालीसाठी नियोजित बंद पाळण्यात आले आहेत. त्यामुळे पोलादाच्या किमतीतही घसरण झाली आहे. वाहननिर्मिती आणि बांधकाम क्षेत्राची वाढदेखील जेमतेम आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादनात ६.४ टक्क्यांपर्यंत वाढ होईल, असा होरा व्यक्त केला आहे. यापूर्वी त्यांनी त्यापेक्षा २० आधारबिंदूंनी कमी वाढ होईल, असे म्हटले होते. परंतु या नव्या अंदाजामुळे डोक्यात हवा जाण्याचे कारण नाही. गेल्या महिन्यात देशातील माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस अर्थात टीसीएस या सर्वात मोठ्या कंपनीने आपल्या मनुष्यबळात दोन टक्क्यांच्या कपातीची योजना जाहीर केली. हे दोन टक्के प्रमाण म्हणजे तब्बल १२ हजार व्यक्तींच्या नोकऱ्या गेल्या आहेत. गेल्या वर्षभरात, म्हणजेच एकट्या २०२४ मध्ये जगभरातील ४२२ कंपन्यांनी १ लाख ३६ हजार कर्मचाऱ्यांना नोकरीवरून काढून टाकले. यात आयबीएम, इंटेल, सिस्को या बड्या कंपन्यांची नावे आहेत. या कंपन्याच अडचणीत आल्या असतील, तर इतर लहान-मोठ्या कंपन्यांची गोष्टच वेगळी. त्याचबरोबर त्यांच्या सावलीखाली वाढलेल्या अनेक स्टार्टअप कंपन्यांनीही आपल्या असंख्य कर्मचाऱ्यांना घरी बसवले आहे. २०२५ मध्ये गुगल, कॉग्निझंट, पल, डेल या कंपन्यांमध्ये एकाएकी नोकरीतून मुक्त करण्याची प्रक्रिया अनेक लोकांना अनुभवावी लागली आहे.

दरम्यान, ऑटोमेशन तसेच 'एआय'मुळे नवनवीन तंत्रज्ञानात गुंतवणुकीची अपरिहार्यता एकीकडे तर दुसरीकडे मंदावलेल्या वर्क ऑर्डसमुळे अनेक कंपन्यांच्या नफ्याच्या प्रमाणावर मर्यादा आल्या आहेत. त्यामुळे उत्पादनखर्च घटवण्याचा एक भाग म्हणून कमी कर्मचाऱ्यांमधून जास्तीत जास्त काम करून घेतले जात आहे. 'एआय' संबंधित स्वयंचलनाचा परिणाम भारतात आधीच दिसू लागला आहे. विशेषतः स्टार्ट अप आणि आयटी क्षेत्रामध्ये २०२५ च्या पहिल्या पाच महिन्यांमध्ये भारतातील स्टार्ट अप्सनी तीन हजार सहाशेपेक्षा अधिक कर्मचाऱ्यांना कामावरून कमी केले आहे. यामागे खर्चकपात आणि ऑटोमेशन तंत्रज्ञानाचा वापर हे कारण आहे. उदाहरणार्थ, 'ओला इलेक्ट्रिक'ने आपल्या फ्रंटएंड ऑपरेशन्समध्ये स्वयंचलन केल्यानंतर एक हजार कर्मचाऱ्यांना कामावरून कमी केले. त्याचप्रमाणे भारताच्या अर्थव्यवस्थेचा एक मजबूत आधारस्तंभ असलेल्या आयटी क्षेत्रात २०२४ मध्ये पन्नास हजारांपेक्षा जास्त कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्या गेल्या आहेत. विशेषतः एंट्री-लेव्हल प्रोग्रामर आणि सॉफ्टवेअर टेस्टर्स यांच्या. कारण त्यांच्या भूमिका आता 'एआय' द्वारे अधिक सहज पार पाडल्या जात आहेत.




'एआय' चा प्रभाव फक्त तंत्रज्ञान कंपन्यांपुरता मर्यादित नाही, तर उत्पादन, लॉजिस्टिक्स आणि ग्राहक सेवा यासारख्या क्षेत्रांमध्येही कमी-कौशल्य आणि पुनरावृत्तीपूर्ण कामांवर आधारित भूमिका धोक्यात आल्या आहेत. भारतासाठीचा अंदाज फारच गंभीर आहे. चाळीस ते पन्नास टक्के वर्तमान पांढरपेशा नोकऱ्या पुढील काळात नष्ट होऊ शकतात. यामुळे मोठ्या प्रमाणात उपजीविका धोक्यात येऊ शकतात आणि भारताच्या ग्राहकाधारित आर्थिक विकासाच्या धारणेला धोका निर्माण होऊ शकतो. 'एआय' स्वीकारामुळे निर्माण होणाऱ्या नोकरी गमावण्याचा धोका आणि बेरोजगारीला रोखण्यासाठी भारताने एक बहुआयामी धोरण राबवायला हवे. यात कामगार बदल, तंत्रज्ञान सुलभता आणि तथ्याधारित धोरणनिर्मिती यांचा समावेश असावा. सर्वप्रथम, मानवी श्रमाला पूरक ठरणाऱ्या नवकल्पनांना प्रोत्साहन देणे महत्त्वाचे आहे. 'स्टॅनफोर्ड इन्स्टिट्यूट फॉर ह्युमन सेंटर्ड आर्टिफिशीयल इंटेलिजिन्स' च्या 'इम्पॅक्ट ऑफ एआय ऑन वर्कर प्रॉडक्टिव्हिटी'च्या अभ्यासानुसार 'एआय' चा वापर झाल्यानंतर १४ टक्के कामगार उत्पादकता वाढली आहे. दुसरे म्हणजे, कंपन्यांनी अशा कर्मचाऱ्यांचे पुनर्नियोजन करण्यासाठी धोरण तयार करणे गरजेचे आहे. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या (आयएलओ) सल्लयानुसार अशा पुनर्वसनावर भर दिला पाहिजे. याशिवाय, डिजिटल, हरित अर्थव्यवस्था, अचूक उत्पादन आणि ग्राहक सेवाक्षेत्रांमध्ये पुनःकौशल्य प्रशिक्षण आणि कौशल्यवृद्धी कार्यक्रमांमध्ये धोरणात्मक गुंतवणूक करणे आवश्यक आहे.

केवळ जागतिक परिस्थितीला दोष न देता व्यापार-उद्योगाच्या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी सरकारने पावले टाकली पाहिजेत. आजही भारतात नवीन उद्योग सुरू करणे, नवीन कंपनी स्थापणे, तोट्यातील कंपनी बंद करणे या गोष्टी सोप्या नाहीत. एक खिडकी योजना, ईझ ऑफ डुइंग बिझिनेस याच्या कितीही गप्पा मारल्या, तरी प्रत्यक्षात उद्योजकांना येणाऱ्या अडचणी असंख्य आहेत. खालच्या पातळीवरचा भ्रष्टाचार अजिबात कमी झालेला नाही. वेगवेगळे परवाने आणि मंजुऱ्या घेण्यासाठी आजही पैसे चारावे लागतात. भारतात वस्तू आणि सेवा कर म्हणजेच जीएसटीचा शुभारंभ होऊन १ जुलै रोजी सात वर्षे पूर्ण झाली. 'एक देश एक कर' असे जीएसटीचे मूळ स्वरूप अपेक्षित होते. प्रत्यक्षात तसे घडलेले नाही. या कराची अंमलबजावणी सुरू झाली, तीच मुळी ०, ५, १२, १८, २८ टक्के आणि त्याखेरीज अधिभार अशी. म्हणजे करदराच्या कमीत कमी पायऱ्या असाव्यात, या तत्त्वालाच आपण पहिल्यापासून तिलांजली दिली आहे. आजपर्यंत जीएसटीसंबंधी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली ५५ बैठका झाल्या असून अद्यापही या करातील गुंतागुंत कमी झालेली नाही. १५ ऑगस्ट रोजी लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील नागरिकांना दिवाळीत मोठी भेट मिळेल, जीएसटीमध्ये लक्षणीय सुधारणा करण्यात येतील आणि त्यातून लोकांना आणि उद्योगांना मोठ्या प्रमाणावर करसवलती मिळतील, असे म्हटले होते.

केंद्र सरकारने १२ टक्के आणि २८ टक्के या स्लॅब रद्द करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. २०१७ मध्ये जीएसटी लागू झाल्यापासून या करात २७ वेळा बदल करण्यात आले तर पंधरा वेळा विविध वस्तूंवरील कर कमी करण्यात आले. मात्र ज्या वस्तूंवर सध्या २८ टक्के कर तो आता १८ टक्क्यांवर येईल, असा अंदाज आहे. यामध्ये मोटरसायकल, सायकल, काही ट्रॅक्टर्स, विजेवर चालणारी सिंचन उपकरणे, एसी, पंखे आणि इतर उत्पादनांचा समावेश आहे. तसेच १२ टक्क्यांचा स्लॅब बंद झाल्यास त्या अंतर्गत येणाऱ्या वस्तू, म्हणजे कंडेन्स्ड मिल्क, बटर, तूप, चीज स्प्रेड, खजूर जॅम, फ्रूट जेली, नट्स, डायबेटिक फूड, उपचारांसाठी वापरला जाणारा ऑक्सिजन वगैरेंबाबत या प्रकारे करकपात लागू झाल्यास मागणी वाढून अर्थव्यवस्थेस पुन्हा एकदा उभारी येईल, अशी अपेक्षा आहे. केंद्र सरकारने लवकरात लवकर या दिशेने ठोस पावले टाकायला हवीत.

✦✦✦

## हैदराबाद गॅझेटियरमध्ये नोंद मिळाली म्हणून
# सर्टिफिकेट मिळणार नाही

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

महसूलमंत्री तथा मंत्रिमंडळाच्या ओबीसी उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मराठा आरक्षणाच्या जीआरसंबंधी एक महत्वपूर्ण विधान केले आहे. केवळ हैदराबाद गॅझेटियरमध्ये नोंद आढळली म्हणून कुणालाही जात प्रमाणपत्र मिळणार नाही. कोणत्याही प्रमाणपत्राला आव्हान देता येऊ शकते, असे ते म्हणालेत. त्यांच्या या विधानामुळे मराठा आरक्षणाच्या मुद्यावरील वाद आणखीच चिघळण्याची शक्यता आहे.



बावनकुळे आज नागपूरच्या दौऱ्यावर होते. तिथे पत्रकारांशी वातालाप करताना त्यांनी मराठा आरक्षणाचा जीआर, हलाल टाउनशिप, नागपूर जिल्हा परिषद निवडणुकीत लागू करण्यात आलेले झिरो रोस्टर आदी विविध मुद्यांवर भाष्य केले.

तसेच मंत्री छगन भुजबळ मराठा आरक्षणाच्या मुद्यावर नाराज नसल्याचाही दावा केला. हैदराबाद गॅझेटच्या अंमलबजावणीवर ज्येष्ठ मंत्री छगन भुजबळ यांची कोणतीही नाराजी नाही. त्यांचे काही आक्षेप व संभ्रम आहेत. ते दूर केल्या जातील. एखाद्या वाक्यावर संभ्रमावस्था असेल तर त्यावर चर्चा करून तोडगा काढला जाईल, असे ते म्हणाले.

### म्हणून प्रमाणपत्र देणार नाही

यावेळी त्यांनी केवळ नोंद मिळाली म्हणून कुणालाही कुणबी प्रमाणपत्र मिळणार नसल्याचाही दावा केला. केवळ हैदराबाद गॅझेटियरमध्ये नोंद मिळाली म्हणून त्या आधारावर कुणालाही प्रमाणपत्र दिले जाणार नाही. अधिकारी हे नियमाप्रमाणे सही करतील. या प्रकरणी कोणत्याही प्रमाणपत्राला आव्हान देता येऊ शकते, असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी हलाल टाउनशिपची निर्मिती करणाऱ्यांवर कारवाई करण्याचीही ग्वाही दिली.

सरकार हलाल टाऊनशिप सारख्या कोणत्याही टाउनशिपला मान्यता देणार नाही. हलाल पूर्णपणे बाहेर काढून टाकू. हलालचा बोर्डही काढून टाकू. हलालच्या नावावर राज्यात कुठेही टाउनशिप होणार नाही. या प्रकरणी संबंधितांवर कारवाई होईल, असे ते म्हणाले.

नागपूर जिल्हा परिषद निवडणुकीत लागू करण्यात आलेल्या झिरो रोस्टर संदर्भात अनुसूचित जाती-जमातीच्या लोकांनी उच्च न्यायालय, नागपूर येथे याचिका दाखल केली आहे.

या रोस्टरमुळे काही जिल्हा परिषद सर्कलमध्ये फिरते आरक्षण लागू झाले नाही आणि त्यामुळे आरक्षणाचा लाभ मिळाला नाही, असे अर्जदारांचे म्हणणे आहे. यावर बोलताना बावनकुळे यांनी याचिका दाखल करणे हा याचिकाकर्त्याचा अधिकार आहे. राज्य शासन कुठलाही अधिनियम कधीही वापरू शकते, ५ रोस्टर झाले, ६ व्या रोस्टरसाठी लोक मिळत नाही, विधी विभागाचे ओपिनियन घेऊन रोस्टरचा निर्णय घेतला, आम्ही आमची बाजु मांडू असे ते म्हणाले.

### ठाकरेंची प्रशंसा

नेहमी टीकेची झोड उठवणाऱ्या शिवसेनेच्या (ठाकरे गट) मुखपत्रातून यंदा राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर कौतुकाची थाप देण्यात आली आहे.

मराठा आरक्षणाच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सामनामधून फडणवीस यांच्या संयमी व संवेदनशील भूमिकेचे जाहीर कौतुक करण्यात आले आहे. मुख्यमंत्र्यांनी तोडगा काढला आणि आंदोलनाचा शेवट गोड झाला, अशा शब्दांत फडणवीस यांच्या भूमिकेचा गौरव करण्यात आला आहे. यावर बोलताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, उद्धव ठाकरे यांच्याकडून हीच अपेक्षा आहे.

# मराठ्यांना ओबीसींमधून आरक्षण नकोच!

## मुख्यमंत्र्यांची भेट घेत श्रीमंत मुधोजीराजे भोंसलेंनी दर्शविला विरोध

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :

मराठा आंदोलकांच्या मागणीनंतर राज्य सरकारने हैदराबाद गॅझेटियरचा स्वीकार करून त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात शासकीय अधिसूचना (जीआर) काढली आहे. परंतु, याला काही ओबीसी नेत्यांनी, संघटनांनी विरोध केला आहे.

राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री तथा ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी देखील या जीआरवर आक्षेप नोंदवला आहे. या जीआरविरोधात न्यायालयात धाव घेणार असल्याचे भुजबळ यांनी स्पष्ट सांगितले आहे. या सर्व वादामध्ये श्रीमंत राजे मुधोजी भोंसले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत मराठा समाजाच्या आरक्षणावर वेगळी भूमिका घेतली आहे. त्यांनी मराठांना ओबीसींमधून आरक्षण देण्यास विरोध केला आहे.

मराठा आरक्षणाच्या अनुषंगाने नुकतेच मनोज जरांगे पाटील यांचे मुंबईच्या आझाद मैदानांवर आंदोलन झाले. यात मराठ्याना काय मिळाले? हा प्रश्न आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला माझा पांठिबा आहे. परंतु, त्यांनी जी मागणी केली की मराठ्यांना ओबीसीमधून



आरक्षण द्या. या मागणीतुन मराठ्याना काय साध्य झाले? हा प्रश्न निर्माण होतो.

मराठवाड्याच्या काही जिल्ह्यात ५८ लाख कुणबी नोंदी सापडल्या. त्यात अर्थतांतच काही त्रुटी आहेत. परंतु ज्यांच्या नोंदी आहेत त्यांना लाभ नक्कीचं मिळावा. कागदपत्राची पुर्ततः करण्यात या लाभाचा टक्का निश्चितचं घसरणार यात शंका नाही. त्यामुळे उर्वरीत अंदाजे २.५० कोटी मराठ्याचे काय आहे? आसा प्रश्न मराठ्यांना सतावतो आहे.

मराठा आरक्षणाच्या अनुषंगाने माझे व्यक्तिगत मत आहे की, मराठ्याना मराठा म्हणूनच सरसकट आरक्षण मिळावे. त्यामुळे हा पेच निर्माण होणार नाही. संपर्ण महाराष्ट्रातील मराठ्यानां मराठा म्हणूनच मराठा आरक्षणाचा फायदा होईल. मराठ्याना मराठा म्हणूनच सरसकट आरक्षण कृपया द्यावे. जेणे करून ५८ लाख कुणबी नोंदी वाले मराठे आणि उर्वरीत २.५० करोड मराठ्यानांना मराठा आरक्षणाचा फायदा होईल. माझी या निवेदानाच्या माध्यामातुन शासनाला एक विनंती आहे की, मराठ्धाचे नुकसान कृपया होऊ देऊ नका, मुधोजी महाराज निवेदनात म्हणाले.

दरम्यान, मराठा आरक्षणावरून ओबीसींचा वाढता विरोध पाहता मुख्यमंत्री म्हणाले होते की, मराठवाड्यात इंग्रजांचे राज्य नव्हते. मराठवाड्यात निजामाचे राज्य होते. त्यामुळे मराठवाड्यातील जातींसंदभार्तील पुरावे हे इतर ठिकाणी मिळत नाहीत. ते केवळ निजामाकडेच म्हणजेच हैदराबाद गॅझेटमध्ये सापडतात. आपण तिथले पुरावे ग्राह्य धरले आहेत. त्या पुराव्यांनुसार जे खरे कुणबी आहेत त्यांनाच हे प्रमाणपत्र मिळणार आहे. त्यामुळे मला असे वाटते की ज्यांचा हक्क आहे अशांनाच लाभ मिळेल. कोणालाही खोटेपणा करता येणार नाही, असा हा जीआर आहे.

## हा जीआर सरकारला महागात पडणार..

### ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांचा इशारा



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ५ :

मराठा आरक्षणासाठी हैदराबाद आणि सातारा गॅझेटबाबतचा जीआर सरकारने मनोज जरांगे यांच्या आंदोलनाला घाबरुन दिला असला तर हा निर्णय सरकारला पुढे चांगलाच महागात पडणार आहे. केवळ ओबीसीचं नाही तर सर्वच मागासवर्गीयांचा आरक्षण संपवणारा हा निर्णय आरक्षणाचा बट्ट्याबोळ उडवणारा असल्याची जोरदार टीका ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांनी केली आहे.

महाराष्ट्र बंद केला, जाळपोळ केली, बस जाळली म्हणून आरक्षण द्या असं होत नाही. मनोज जरांगे यांच्या धमक्यांना आता सरकारने किती भीक घालायची हा त्यांचा प्रश्न आहे. आमचं फक्त आमच्या ओबीसीच्या आरक्षणाला धक्का लागू नये एवढीच आमची भूमिका असल्याचेही प्रकाश शेंडगे यांनी म्हटले आहे.

गॅझेटिअरमध्ये प्रत्येक समाजाचीच नोंद असल्यामुळे पुढच्या काळामध्ये बंजारा समाज, धनगर समाज याबरोबरच इतर सर्व समाज सुद्धा आरक्षणाची मागणी करेल आणि त्यानंतर सरकारला ते द्यावेच लागेल असा सावधनतेचा इशाराही शेंडगे यांनी दिला आहे. सग्या सोयऱ्या संदर्भातला शासन निर्णय बदलता येत नाही म्हणून तीच भाषा सरकारने या शासन निर्णयात मांडल्याचेही विधान प्रकाश शेंडगे यांनी यावेळी केले आहे. मराठ्यांसाठी शासन निर्णय घेत असेल तर धनगरांसाठी का निघू नये बंजारा समाजासाठी का निघू नये? असा सवाल देखील प्रकाश शेंडगे यांनी उपस्थित केला आहे.

### तायवाडे मागे का फिरले?

कोणत्या १२ मागण्या मान्य केल्या, त्याचा शासन निर्णय निघाला का ? शासन निर्णय न घेताच बबन तायवाडे यांनी उपोषण कसं सोडलं? असा प्रश्न प्रकाश शेंडगे यांनी बबन तायवडे यांच्या उपोषणावर बोलताना केला आहे. गेल्यावेळी अशाच मागण्या मान्य झाल्या होत्या, मात्र त्याचे किती शासन निर्णय निघाले? एकही नाही निघाले ना? जरांगे यांच्याप्रमाणेच तायवाडे यांनी सुद्धा शासन निर्णय काढत नाही तोपर्यंत मंत्र्यांना फिरू देणार नाही असं म्हणायला पाहिजे होतं, असेही ते म्हणाले.

## लक्ष्मण हाकेंना अटक करा

### खामगाव शहर ठाण्यात दाखल

■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. ५ :

ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी मराठा आरक्षणविषयक शासन निर्णयाची (अध्यादेशाची) प्रत फाडल्यावर वातावरण चांगलेच तंग झाले आहे. लक्ष्मण हाके यांच्यावर फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करावा व त्यांना तत्काळ अटक करावी, अशा मागणीची लेखी तक्रार आज शुक्रवार, ५ सप्टेंबर रोजी खामगाव शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली.

जरांगे पाटील यांचे समर्थक कार्यकर्ते मनोज ढगे पाटील यांनी ही तक्रार दिली आहे. ते म्हणाले की, मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण दिल्यानंतर ओबीसी नेते लक्ष्मण हाके हे दोन समाजात तेढ निर्माण होईल आणि राज्यात दंगलसदृश परिस्थिती निर्माण होईल, असे वादग्रस्त वक्तव्य करत आहेत. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. परिणामी, त्यांना अटक करण्याची मागणी आम्ही तक्रारीतून केली आहे.

# अनुकंपा तत्त्वावरील १० हजार जागा भरणार

## राज्य सरकारचा मोठा निर्णय : चतुर्थ श्रेणीतील जागाही भरल्या जाणार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या अनुकंपा तत्त्वावरील नोकऱ्यांबाबत राज्य सरकारने अखेर मोठा निर्णय घेतला आहे. राज्यभरात जवळपास ९६५८ रिक्त जागा असून, या सर्व जागा येत्या १५ सप्टेंबर २०२५ पर्यंत भरण्यात येणार आहेत.

राज्याच्या इतिहासात पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणावर अनुकंपा तत्त्वावरील भरती होत असल्याने प्रतीक्षेत असलेल्या जवळपास दहा हजार उमेदवारांना मोठा दिलासा मिळणार आहे.

विशेष म्हणजे, यावेळी चतुर्थ श्रेणीतील जागाही भरल्या जाणार आहेत. आतापर्यंत या श्रेणीतील बहुतेक पदे खासगी कंत्राटदार मार्फत भरण्यात येत होती. मात्र आता अनुकंपा वरील जागा थेट पात्र वारसांना मिळणार आहेत. त्यामुळे अनेक कुटुंबांना आर्थिक स्थैर्य आणि नोकरीच्या माध्यमातून सुरक्षितता मिळेल. ही नियुक्ती प्रक्रिया जिल्हा प्रशासनाच्या देखरेखीखाली पार पडणार आहे. १५ सप्टेंबर २०२५ पासून जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली ही भरती सुरू होईल. यामुळे मृत शासकीय कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना अजार्पासून ते नियुक्ती पर्यंतच्या टप्प्यातील अडचणी कमी होणार आहेत.

### अनुकंपा धोरण म्हणजे काय?

अनुकंपा धोरण १९७३ पासून लागू असून, राज्यातील शासकीय आणि निमशासकीय संस्थांमध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचे सेवेत असताना निधन झाल्यास त्यांच्या कुटुंबातील पात्र वारसाला त्या विभागात नोकरी देण्याची तरतूद यात आहे. हे धोरण प्रामुख्याने गट-क (लिपीक) आणि गट-ड (चतुर्थ श्रेणी) पदांसाठी लागू आहे. त्यामुळे वारसांना आर्थिक मदत आणि स्थैर्य मिळून कुटुंब चालविण्याची जबाबदारी पार पाडणे सोपे होते.

राज्य सरकारच्या या निर्णयामुळे प्रतीक्षेत असलेल्या उमेदवारांमध्ये मोठा आनंद पसरला आहे. अनेक कुटुंबे आपल्या पालकांच्या मृत्यूनंतर नोकरीसाठी भटकत होती. आता सुमारे दहा हजार कुटुंबांचे स्वप्न पूर्ण होणार आहे.

: साप्ताहिक संवाद :

## लष्करी व मुलकी क्षेत्रासाठी
# ड्रोनचा वापर



ड्रोन सारख्या तंत्रज्ञानाचा वापर हा कृषी, उद्योग व्यवसाय आणि इतर अनेक क्षेत्रात यशस्वी झाल्यानंतर आता ड्रोन तंत्रज्ञानाचा विकस लष्करी आणि मुलकी क्षेत्रासाठी आणि व्यापारी हेतूनेही झपाटयाने होत आहे. आपले दैनंदिन जीवन सुकर करणे आणि सीमांचे रक्षण करणे या दोन्ही उद्देशांची पूर्तता करू शकणाऱ्या या तंत्रज्ञानाविषयी उद्योजक डॉ. रवींद्र उटगीकर यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

**ड्रोन सारख्या अभिनव तंत्रज्ञानाचा वापर कोणकोणत्या क्षेत्रात होत आहे?**

■ ड्रोन या तंत्राची अचूकता,नेमकेपणा,आणि कार्यक्षमता आणि उत्पादकता लक्षात घेता ड्रोनचा वापर हा अनेक क्षेत्रांमध्ये सातत्याने वाढताना दिसतोय. कोरोना महासाथी च्या काळात या तंत्रज्ञानाने जगभरातील आरोग्यसेवांना गती आणि व्याप्ती देण्यात मोठा हातभार लावला होता. दुर्गम ठिकाणी आरोग्य सेवासुविधा पुरविण्यात या तंत्राचा मोठा वाटा होता. आपत्कालीन परिस्थितीत दुर्घटना स्थळाची तात्काळ पाहणी करून त्याची नेमकी माहिती आणि छायाचित्र उपलब्ध करून देण्य्साठी देखील ड्रोन हे तंत्र महत्वाचे ठरले.

भूकंप, दुष्काळ किंवा एखादी आपत्ती असेल तर याच ड्रोन च्या आधारे अगदी ढिगाऱ्याखाली जाऊन ड्रोनच्या साहाय्याने माणसांचा मागमूस घेता येणे शक्य झाले आहे. पायाभूत सोयी सुविधांसोबतच शेती क्षेत्रात अगदी माती परीक्षणापासून ते कीटकनाशक आणि औषधी फवारणी पर्यंतची अनेक काम याच ड्रोन तंत्राने सुलभ झालेली आहेत. आणखी अनेक क्षेत्रात हा वापर वाढतोय.

लोकरंग

**ड्रोन तंत्राचा वापर आता लष्करी आणि मुलकी क्षेत्रांसाठी देखील होणार आहे?**

■ भारत आणि पाकिस्तान या दोन देशांमध्ये मे २०२५ मध्ये झालेल्या चकमकीमुळे ड्रोन तंत्रज्ञान चर्चेत आले. खरे तर त्याच्याही आधी युक्रेन युद्धात या तंत्राचा वापर केला गेला. त्यानंतर अपेक्षेप्रमाणे आता अमेरिका आणि चीन या उभय देशांनी द्रोन तंत्रज्ञानाच्या विकासात आघडी घेतली असून या तंत्राचा वापर लष्करात युद्धासाठी आणि मुलकी क्षेत्राच्या टेहळणीसाठी देखील सुरु केला आहे.

फ्रांस,जर्मनी इस्त्रायल सारख्या देशांमध्ये देखील आता याच तंत्राचा वापर सर्रास वाढलेला आहे. आपल्याकडे अगदी दुर्गम भागात ड्रोन नमो दीदी या योजनेमुळे आता ड्रोन चा वापर हा महिलांच्या उन्नतीसाठी देखील फायदेशीर ठरतो आहे.

**ड्रोन या तंत्राची जोखींम आणि भविष्यातील आव्हान काय आहेत?**

■ उत्तम प्रतीचे छायाचित्रण आणि व्हिडीओ चित्रण हे ड्रोन च्या सहहायाने सुलभ झाले आहे खरे मात्र, पुरेशा नियामक तरतुदी अभावी ड्रोनचे हेच वैशिष्ट्य डोकेदुखी ठरू शकते याचा अनुभव भारतात येऊ लागलेला आहे. चोऱ्या करण्यापासून इतरांच्या घरात अंडी खाजगी आयुष्यात डोकावण्या पर्यंत वेगवगेळ्या कारणासाठी ड्रोनचा चुकीचा होत असलेला वापर लक्षात घेता पोलिसांसाठी ही आता डोकेदुखी ठरत आहे. या बरोबरच नागरिकांच्या जीवितहानीची आणि देशाच्या सुक्षिततेची देखील जोखीम स्पष्ट दिसू लागली आहे. मात्र हे आव्हान लक्षात घेता या ड्रोन तंत्राचे योग्य नियमन केल्यास हेच तंत्रज्ञान अनेक अर्थाने फायद्याचे ठरू शकते हे नक्की.

■ ■ ■

## मुंबईत सुंदरी सिल्कचा साडी मेळा



चेन्नईची प्रसिद्ध कापड कंपनी सुंदरी सिल्क, मुंबईकरांसाठी ७ आणि ८ सप्टेंबर २०२५ रोजी 'द साडीज मेळा' आयोजित करत आहे. हा दोन दिवसीय कार्यक्रम वांद्रे पश्चिम येथील कॅशे - द आर्ट अँड क्राफ्ट्स गॅलरी येथे सकाळी ११ ते रात्री ९ या वेळेत खुला असेल.

या प्रदर्शनात भारतीय वस्त्रकलेचा समृद्ध वारसा अनुभवता येईल. येथे पारंपरिक कांजीवरम सिल्क साड्या, खास वधूसाठीचे पोशाख, तसेच कांची कॉटन, महेश्वरी आणि प्रिंटेड कॉटनचे विविध प्रकार उपलब्ध असतील. यासोबतच, ग्राहकांना आकर्षक तयार कपड्यांचे पोशाख आणि चांदीच्या 'अथिरष्टम' दागिन्यांची खास मालिका देखील पाहता येईल, ज्यामुळे हे प्रदर्शन भारतीय कलाकुसर आणि कारागिरीचा एक खराखुरा उत्सव ठरेल.

या प्रदर्शनाबद्दल बोलताना, सुंदरी सिल्कचे व्यवस्थापकीय भागीदार मनमोहन राम म्हणाले, मुंबईने नेहमीच आम्हाला प्रेम आणि आदराने स्वीकारले आहे आणि 'द साडीज मेळा' पुन्हा एकदा शहरात आयोजित करताना आम्हाला खूप आनंद होत आहे. हे प्रदर्शन फक्त कपड्यांचे प्रदर्शन नसून, आपल्या वारशाचा, कलेचा आणि हातमागावरील साड्यांच्या चिरंतन आकर्षणाचा उत्सव आहे. आम्ही मुंबईतील आमच्या ग्राहकांशी पुन्हा जोडले जाण्यास आणि सुंदरी सिल्कच्या प्रत्येक निर्मितीमागील कथा त्यांच्यासोबत शेअर करण्यास उत्सुक आहोत.

आठ दशकांपेक्षा जास्त जुना वारसा असलेल्या सुंदरी सिल्कने आधुनिकतेला सामावून घेत भारतीय हातमागाचे सार जपले आहे. 'द साडीज मेळा' साडीप्रेमी, नववधू आणि वस्त्रकलेची आवड असणाऱ्या प्रत्येकाचे स्वागत करत आहे.

■ ■ ■

## नाकोडा ग्रुपचा पटेल बेवरेजसोबत को पॅकिंग करार संपन्न




नाकोडा ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज लिमिटेडने पटेल बेव्हरेजेस प्रायव्हेट लिमिटेडच्या उत्पादनांचे उत्पादन, पुरवठा आणि सह-पॅकिंग त्यांच्या ट्रेड-नेम/ब्रँड नाव NOCTRL सह आयोजित करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. नाकोडा ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज लिमिटेडला पेये, सॉफ्ट ड्रिंक आणि एनर्जी ड्रिंक सेगमेंटच्या ग्राहक उत्पादन सेगमेंटमध्ये प्रवेश मिळेल ज्यामुळे कंपनीची उत्पादन श्रेणी वाढेल आणि पटेल बेव्हरेजेस प्रायव्हेट लिमिटेडला नवीन क्लायंट मिळतील आणि त्यांच्या उलाढालीत आणि क्षमता वापरात वाढ होईल.

कंपनीच्या उत्पादनांमध्ये विविध प्रकारच्या मखानांचा देखील समावेश आहे ज्यांना चांगली मागणी आहे. नाकोडा ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज लिमिटेडकडे त्यांच्या प्रीमियम अन्न उत्पादनांची वाढती मागणी पूर्ण करण्याची उत्पादन क्षमता आहे आणि तज्ञांकडून त्याचे निरीक्षण केले जाते.

१९८९ मध्ये स्थापित, नाकोडा ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज लिमिटेड हे प्रीमियम-गुणवत्तेच्या टुटी फ्रुटी (डाइस्ड चेलोरी), सुकामेवा, धान्य आणि डाळींच्या उत्पादन आणि व्यापारात एक प्रमुख नाव आहे. सुरुवातीला मालकी हक्क म्हणून स्थापन झालेली ही कंपनी २०१३ मध्ये एका खाजगी मर्यादित कंपनीत विकसित झाली, ज्यामुळे वाढ आणि नावीन्यपूर्णतेचा एक नवीन अध्याय सुरू झाला.

३ दशकांच्या कौशल्यासह, कंपनीने अन्न उत्पादनांच्या विस्तृत श्रेणीच्या उत्पादन आणि वितरणात आणि मूल्यवर्धित ऑफरिंगमध्ये स्वतःला एक अग्रणी म्हणून स्थापित केले आहे. नागपूरमध्ये मुख्यालय असलेल्या कंपनीला देशभर कार्यक्षम आणि वेळेवर वितरण सुनिश्चित करून, अखंड लॉजिस्टिक फायद्यांचा फायदा होतो. ■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# ब्लड मून, रेड मून पाहायची संधी

■ महासागर प्रतिनिधी
चंद्रपूर, दि. ५ :



भारतात ७ सप्टेंबरला दिसणार खग्रास चंद्रग्रहण

भारतातून खग्रास चंद्रग्रहण ७ सप्टेंबरला दिसणार असून खगोल आणि विज्ञान अभ्यासकांना हे ब्लड मून, रेड मून पाहण्याची चांगली संधी मिळणार आहे. रात्री ९.२७ मिनिटांनी खंडग्रास ग्रहणाला सुरवात होऊन १२.२२ वाजेपर्यंत ते पाहता येईल अशी माहिती खगोल अभ्यासक आणि स्काय वॉच ग्रुप चे अध्यक्ष प्रा सुरेश चोपने ह्यांनी दिली आहे.

यंदाच्या वर्षी फारसे ग्रहण भारतातून दिसले नाही. त्यामुळे हेच खग्रास चंद्र ग्रहण चांगल्या पद्धतीने पाहण्याची संधी मिळणार आहे. हे ग्रहण एकूण ५ तास २७ मिनिटे दिसणार आहे,त्यात छायाकल्प चंद्रग्रहनाची सुरवात रात्री ९ वाजता होईल. खंडग्रास ग्रहणाची सुरुवात ९.५७ वाजता होईल तर खग्रास ग्रहण रात्री ११ वाजता सुरू होईल आणि ते रात्री १२.२२. वाजेपर्यंत दिसेल.ह्याच दरम्यान चंद्र लाल रंगाचा दिसेल म्हणून त्याला ब्लड मून, रेड मुन असे म्हटल्या जाते. खग्रास स्थिती ही २ तास ७ मिनिटांची असेल. आकाशात ढगाळ हवामान नसेल तर त्या ठिकाणी खूप सुंदर ग्रहण पाहता येईल. कुठलीही अंधश्रद्धा न बाळगता ग्रहणाचा खगोलीय आणि वैज्ञानिक पद्धतीने निरीक्षण आणि अभ्यास करावा असे आवाहन चोपणे ह्यांनी केले आहे.

### २१ सप्टेंबरला शेवटचे सूर्यग्रहण

२१ सप्टेंबरला या वर्षीचे शेवटचे सूर्यग्रहण दिसणार आहे,परंतु ते भारतातून दिसणार नाही. न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया, पॅसिफिक, अटाटिक आणि न्यूझीलंड ह्या देशातील काही भागातूनच ही सूर्यग्रहण पाहता येणार आहे अशी माहिती स्काय वॉच ग्रुप तर्फे देण्यात आली आहे.

## अंत्यसंस्काराची तयारी अन् चमत्कार!

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :

त्र्यंबकेश्वर तालुक्यातील एका तरुणाच्या आयुष्याने मृत्यूशी झालेली लढाई साऱ्यांना थक्क करून सोडली आहे. अंत्यविधीची तयारी सुरू असताना घडलेला धक्कादायक ट्विस्ट पाहून गावकऱ्यांपासून नातेवाईकांपर्यंत सर्वांच्या डोळ्यांत आश्चर्य दाटून आलं.

१९ वर्षीय भाऊ लचके या तरुणाचा चार दिवसांपूर्वी अपघात झाला होता. डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्याला रुग्णालयांदरम्यान फिरवण्यात आलं. जिल्हा शासकीय रुग्णालयात बेड नसल्याने नातेवाईकांनी त्याला खासगी हॉस्पिटलमध्ये दाखल केलं. तिथे तीन दिवस उपचार सुरू राहिले. मात्र, डॉक्टरांनी रुग्ण ब्रेनडेड आहे असं सांगत नातेवाईकांना घरी घेऊन जाण्याचा सल्ला दिला. हताश कुटुंबीय रुग्णाला गावी घेऊन आले.

गावात आल्यावर सर्वांनी त्याला मृत मानून अंत्यसंस्काराची तयारी सुरू केली. शोकाकुल वातावरणात अचानकच भाऊ लचकेला खोकला आला आणि त्याचे हातपाय हलले. त्याच्या जिवंत असल्याचं लक्षात येताच एकच खळबळ उडाली. घाबरलेल्या नातेवाईकांनी पुन्हा त्याला रुग्णालयात नेलं.सध्या तो जिल्हा शासकीय रुग्णालयात व्हेंटिलेटरवर उपचार घेत आहे. त्याची प्रकृती चिंताजनक असली तरी रुग्ण ब्रेनडेड नसल्याचं प्रशासनाने स्पष्ट केलं असून, याप्रकरणी संपूर्ण चौकशी केली जाणार आहे, अशी माहिती जिल्हा शल्यचिकित्सकांनी दिली.

## जश्ने ईद मिलादुन्नबी मिरवणुकीचे
# काँग्रेसच्या आमदारांकडून स्वागत

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :



नागपूर शहरात पार पडलेल्या जश्ने ईद मिलादुन्नबीच्या मिरवणुकीत काँग्रेस पक्षाने उत्साहात सहभाग घेतला आणि सामाजिक ऐक्याचा झगमगता संदेश दिला. मुस्लिम समाजाच्या श्रद्धा आणि परंपरांचा सन्मान करत काँग्रेसच्या नेत्यांनी मिरवणुकीचे स्वागत पुष्पवर्षा करून केले. या मिरवणुकीत श्रद्धा आणि राजकीय सहभाग यांचा संगम पाहायला मिळाला.

मिरवणुकीची सुरुवात परचम कुशाई या पारंपरिक विधीने झाली. नागपूर शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष व आमदार विकास ठाकरे, आमदार अॅड. अभिजीत वंजारी यांनी मिरवणुकीचे स्वागत केले आणि शुभेच्छा दिल्या. तसेच प्रदेश महासचिव अतुल कोटेचा, महापालिकेतील माजी विरोधी पक्ष नेता संजय महाकाळकर, प्रदेश उपाध्यक्ष अॅड. आसिफ कुरेशी, शहर उपाध्यक्ष प्रा. दिनेश बानाबाकोडे, उपाध्यक्ष आशिष दिक्षित, युवक काँग्रेसचे तौषिक अहमद, महेश श्रीवास, महिला काँग्रेसच्या माजी शहर अध्यक्षा नॅश अली, अब्दुल शकील, धरम पाटील, गोपाल पटटम, मेहुल अडवानी, विश्ववेश्वर अहिरकर, प्रमोद ठाकुर, राजेश साखरकर, नयन तरवटकर, शंकर रणदिवे, नईम खान, इप्तेखार अहमद, अब्दुल निहाज नाजू, शगीर खान, अतीक कुरेशी, कविता घुबडे, माया धापोडकर, बालू शेख, फजलर्रहमान, मंगेश राऊत, एजाज भाई, प्रमोद चिचघरे, पापा मियाँ, संतोष सिंह, रिजवान असारी यांनी उपस्थित राहून मुस्लिम समाजाला ईद मिलादुन्नबीच्या शुभेच्छा दिल्या.

ही मिरवणूक केवळ धार्मिक उत्सव नव्हते, तर एक सामाजिक संदेश होता. राजकीय पक्ष समाजाच्या प्रत्येक घटकासोबत स्नेहाने जोडलेले असावेत. काँग्रेसचा सहभाग म्हणजे एकतेचा उत्सव, जिथे धर्म, राजकारण आणि समाज एकत्र येऊन मानवतेचा झेंडा उंचावतात. हाच तो क्षण होता, जिथे श्रद्धा आणि समरसता एकत्र नाचत होती, आणि काँग्रेसने त्या नृत्यात आपली भूमिका प्रभावीपणे बजावली.

या कार्यक्रमात काँग्रेसने केवळ धार्मिक सहभागच नव्हे, तर सामाजिक बांधिलकीही दर्शवली. मुस्लिम समाजाशी एकात्मता राखत, त्यांच्या आनंदात सहभागी होण्याचा प्रयत्न पक्षाने केला. मिरवणुकीत पारंपरिक वेशभूषा, धार्मिक झेंड्यांचे प्रदर्शन, आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी वातावरण आनंदमय झाले होते.

याप्रसंगी शहराध्यक्ष व आमदार विकास ठाकरे यांनी जश्ने ईद मिलादुन्नबीच्या मुस्लिम समाज बांधवांना आणि शिक्षक दिनाच्या सर्व शिक्षकांना शुभेच्छा दिल्या. सर्वांनी हा सण शांती आणि सद्भावनेसह साजरा करावा, आपसात भाईचारा कायम ठेवावा, असे आवाहनही त्यांनी केले.